# श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. १०/२००८.** **दिनांक १५.११.२००८**

**स्थळ - शिर्डी कार्यालय** **वेळ- दुपारी २.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शिर्डी येथे शनिवार दिनांक १५ नोव्हेंबर, २००८ रोजी दुपारी २.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस-वशी-०४-१६५९६-२००८, दि.१२.११.२००८ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते. त्यानुसार सदरहू सभा शनिवार दिनांक १५ नोव्हेंबर, २००८ रोजी दुपारी २.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात मा. अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | मा.श्री.जयंत मुरलीधर ससाणे,अध्यक्ष | ०२ | मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग |
| ०३ | मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे | ०४. | मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे |
| ०५ | मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर | ०६. | डॉ.पी.एल.तिवारी |
| ०७. | मा.सौ.सुमित्रा कैलास कोते | | |

मा.श्री.किशोर रा. मोरे
कार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती नसल्याने अर्धा तास मा.सदस्यांची वाट पाहून नंतर दुपारी २.३० वाजता सभेचे कामकाज मा.अध्यक्ष, श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत मा.श्री शंकरराव गेणूजी कोल्हे, मा.श्रीमती रिम्पल लोहिया, मा.कॅप्टन सुरेश वासूदेवा यांनी फॅक्स पत्राव्दारे व मा.श्री. राधाकृष्ण एकनाथराव विखेपाटील, मा.श्रीमती उर्मिला प्रदिप जाधव, मा.श्री समि खतीब, मा.श्री.रमाकान्त गणेश कर्णिक, मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर व मा.श्री कृष्णचंद्र श्यामसुंदर पाण्ड्ये यांनी दूरध्वनीवरुन कळविले आहे. त्याची नोंद घेण्यात येऊन, समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करण्यात आली.

**विषय नं.०१ दिनांक १८.१०.२००८ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे**

**निर्णय क्र.८१८** दिनांक १८.१०.२००८ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या. परंतू सदस्यांना सदर प्रती वेळेत न मिळाल्याने सदरहू विषय पूढे ढकलण्यात आला.

**विषय नं.०२ दिनांक १८.१०.२००८ रोजी शिर्डी येथे झालेल्या आस्थापना उपसमिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.८१९** दिनांक १८.१०.२००८ रोजी शिर्डी येथे झालेल्या आस्थापना उपसमिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या. परंतू सदस्यांना सदर प्रती वेळेत न मिळाल्याने सदरहू विषय पूढे ढकलण्यात आला.

**विषय नं.०३ दिनांक २४.१०.२००८ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त**

**निर्णय क्र.८२०** दिनांक २४.१०.२००८ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या. परंतू सदस्यांना सदर प्रती वेळेत न मिळाल्याने सदरहू विषय पूढे ढकलण्यात आला.

**विषय नं.०४ ०१. (अ) जमा खर्च तक्ता सप्टेंबर,२००८.**

**(ब) माहे सप्टेंबर,२००८ मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/-चे मर्यादेत केलेल्या खर्चाच्या तक्त्याची नोंद घेणे.**

**(क) गुंतवणूक तक्त्याची नोंद घेणे.**

**(ड) माहे -ऑक्टोबर,२००८ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**

**(इ) माहे -ऑक्टोबर, २००८ मध्ये श्री साईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र.८२१** (A)माहे सप्टेंबर,-२००८ मधील जमा रु १४,७९,५२,६०८.५९ आणि खर्च रुपये १२,२८,३७,२५३.८१ चा तक्ता, मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर रक्कम रुपये २५ हजार पर्यंतच्या सर्वसाधारण खर्चाचा तपशील माहे सप्टेंबर,२००८ रुपये ३,७४,४२९.०० चा तक्ता, दिनांक ६.११.२००८ अखेर संस्थानची गुंतवणूक रुपये ३,०३,४८,६६,०२२.०० चा तक्ता, माहे ऑक्टोंबर,२००८ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या सोने चांदी, कापड व इतर वस्तूसह आलेल्या एकूण अनुक्रमे रुपये ७,२३,३५,१२४.०० देणगीचा तक्ता, माहे ऑक्टोंबर, २००८ मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तुचा रुपये २,५१,२६२.०० चा अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.

**०२. श्रीसाईनाथ रुग्णालय माहे -ऑक्टोबर, २००८ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र.८२१** (B) साईनाथ रुग्णालयात माहे ऑक्टोंबर,२००८ मध्ये साईनाथ रुग्णालयातील रुग्णांना अंतररुग्ण रुपये ७१,१८५.०० बाह्य रुग्ण रुपये ४६,९४१.०० थॅलसेमिया व हिमोफेलिया रुपये ४६,६००.०० ० वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली

**०३. साईबाबा रुग्णालयात माहे-ऑक्टोबर, २००८ या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदानाची नोंद घेणे.**

**निर्णय क्र.८२१** (C) श्रीसाईबाबा रुग्णालयामध्ये माहे ऑक्टोंबर, २००८ मध्ये रुपये ५३,५९,९००.०० देण्यात आलेल्या अनुदान तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, मान्यता देण्यात आली.

**०४. माहे -ऑक्टोबर,२००८ मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र.८२१** (E) माहे ऑक्टोंबर,२००८ मध्ये संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर लावलेल्या ३८,६८४ कर्मचाऱ्यांच्या/कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली

**०५. बांधकाम प्रगती तक्त्याची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र.८२१** (F) बांधकाम प्रगती अहवाल दर्शविणारा तक्ता "अ" व "ब" त्याच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पूरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली . (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**०६. पाणी तपासणी अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र.८२१** (G) माहे ऑक्टोंबर, २००८ मध्ये संस्थान पाणीपुरवठा योजने अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या संस्थानचे परिसरातील पिण्याच्या पाण्याचे नमूने (सॅम्पल्स) मे.एनव्हायरो लॅब, नाशिक यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यांचेकडून आलेले तपासणी अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**विषय नं.०५ श्रीसाईबाबा रुग्णालयाकरीता फर्निचर खरेदीकामी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणे बाबत**

**निर्णय क्र.८२२** श्रीसाईनाथ रुग्णालयातील फर्नीचर हे वापरुन खराब झालेले असल्यामुळे श्री साईनाथ रुग्णालयाचे शस्त्रक्रिया गृहामध्ये तसेच विविध वार्ड / विभागामध्ये लागणारे इन्स्ट्रुमेंट ट्रॉली, स्ट्रेचर ट्रॉली, ड्रेसींग टॉली व इतर फर्निचर इत्यादी वापरुन खराब झालेले असल्यामुळे त्यांना दैनंदिन कामकाजात ते वापरता येत नाही म्हणून, श्री साईनाथ रुग्णालयाने डि.पी. क्रमांक ८००२ दि.२३/०२/२००८ अन्वये फर्निचरची मागणी केलेली होती.

उपरोक्तप्रमाणे मागणी केलेले फर्निचर विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहीरात देऊन निविदा मागवून खरेदीकामीचा अंदाजे रु.१९,७०,६४०/- इतक्या खर्चाचा प्रस्ताव दि.१४/०५/२००८ चे मा. वैद्यकिय समिती सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. सदरचे खरेदीकामी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहीरात देऊन निविदा मागविणे बाबत निर्णय झालेला होता.

त्यानुसार उपरोक्त खरेदीकामी संस्थानचे जनसंपर्क कार्यालयामार्फत दैनिक महाराष्ट्र टाईम्स - मुंबई, दैनिक लोकमत - नाशिक या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.१६/०६/२००८ ते दि.२८/०६/२००८ अखेर संस्थानच्या शिर्डी कार्यालयात १० व मुंबई कार्यालयात १० निविदा विक्रिसाठी ठेवण्यात आल्या होत्या व निविदा स्विकारण्याची अंतीम मुदत दि.३०/०६/२००८ अखेर ठेवण्यात आली होती. तसेच जास्तीत जास्त तुलनात्मक दर मिळणेकामी या क्षेत्रातील २१ नामांकित अधिकृत विक्रेत्यांना इकडील पत्र क्र.८५५७ दि. १२/०६/२००८ अन्वये वर्तमान पत्रातील जाहिराती बाबत अवगत करण्यात आले होते. त्यास अनुसरुन ०८ बंद निविदा प्राप्त झालेल्या होत्या. प्राप्त झालेल्या ०८ सिलबंद निविदा दि.१७/०८/२००८ रोजीचे मा.उपसमिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून त्यांचा तुलनात्मक तक्ता सोबत सादर केला आहे. उपरोक्त दरांचे तक्त्यामध्ये पुरवठा धारकांनी दिलेल्या दरानुसार खालीलप्रमाणे खर्च येणार आहे -

| Sr. No. | Name of Party | Amt. in Rs. | Item Sr.No. quoted items |
|---|---|---|---|
| १ | M/s. Jalaram Steel Furniture Pvt.Ltd., Surat | १,६४,३६९.५० | Sr.No. १२,१४ |
| २ | M/s. K.B. Electronics Corporation, Mumbai | १०,६२,१००.०० | Sr.No. १,२,३,६,८,१७,१८ |
| ३ | M/s. Janak Healthcare Pvt.Ltd., Mumbai | १७,०६,६९९.०० | Sr.No. १ to ९, १७ to २० |
| ४ | M/s. Shree Hospital Equipments, Ichalkaranji | १२,२५,४१०.०० | Sr.No. १ to १४, १७ to २० |
| ५ | M/s. Rahul Enterprises, Nanded | ९,५२,९६०.०० | All Items |
| ६ | M/s. Sudarshan Flexible Packaging Pvt.Ltd.,Nashik | १७,३९,९०५.०० | All Items |
| ७ | M/s. Satpuda Engineering Pvt.Ltd., Nashik | १८,१६,५६६.०० | Sr.No. १ to ११, १७ to २० |
| ८ | M/s. Hitra Equipments, Mumbai | ११,१०,३७२.०० | Sr.No. २,३,५,७,८,१७,१८,२० |

उपरोक्त निविदाधारकांना मालाचा नमूना समक्ष घेऊन आजचे सभेपुढे चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

उपरोक्त निविदाधारकांपैकी खालील ४ निविदाधारक चर्चा / वाटाघाटीसाठी उपस्थित होते.
मे. जनक हेल्थकेअर प्रा. लि., मुंबई - दिलेली सुट - No Discount
मे. के. बी. इलेक्ट्रॉनीक्स, मुंबई - दिलेली सुट - ५%
मे. राहुल एंटरप्रायजेस, नांदेड - दिलेली सुट - २ %
मे. सातपुडा इंजिनीअरींग, नाशिक - दिलेली सुट - No Discount
मे. जलाराम स्टील फर्नीचर, सुरत - E-mail व्दारे - ७.५ % सुट

| Sr.No. | Name of Party | Amt. in Rs. | Amount After Discount | Item Sr.No. quoted items |
|---|---|---|---|---|
| 1 | M/s. Jalaram Steel Furniture Pvt.Ltd., Surat | 1,64,369.50 | 1,52,863.63 | Sr.No. 12,14 |
| 2 | M/s. K.B. Electronics Corporation, Mumbai | 10,62,100.00 | 10,08,995.00 | Sr.No. 1,2,3,6,8,17,18 |
| 3 | M/s. Janak Healthcare Pvt.Ltd., Mumbai | 17,06,699.00 | 17,06,699.00 | Sr.No. 1 to 9, 17 to 20 |
| 4 | M/s. Shree Hospital Equipments, Ichalkaranji | 12,25,410.00 | Absent | Sr.No. 1 to 14, 17 to 20 |
| 5 | M/s. Rahul Enterprises, Nanded | 9,52,960.00 | 9,33,900.80 | All Items |
| 6 | M/s. Sudarshan Flexible Packaging Pvt.Ltd., Nashik | 17,39,905.00 | Absent | All Items |
| 7 | M/s. Satpuda Engineering Pvt.Ltd., Nashik | 18,16,566.00 | 18,16,566.00 | Sr.No. 1 to 11, 17 to 20 |
| 8 | M/s. Hitra Equipments, Mumbai | 11,10,372.00 | Absent | Sr.No. 2,3,5,7,8,17,18,20 |

यावर चर्चा होऊन मे. राहुल एंटरप्रायजेस, नांदेड यांचे दर सर्वात निम्नत्तम असून त्यांनी सर्व आयटम्सकरीता दर दिलेले आहेत. तेंव्हा त्यांच्या फर्नीचरचा नमुना शिर्डी येथे समक्ष बोलवून किंवा त्यांचे कंपनीत जाऊन समक्ष पाहणी करुन त्यांचे फर्नीचरचा दर्जा योग्य वाटल्यास त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अन्यथा सदर विषय फेर मान्यतेसाठी मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

**विषय नं.०६** **श्री साईबाबा रुग्णालयातील एमआरआय विभागासाठी Boyles Anasthesia Machine खरेदीकामी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणे बाबत**

**निर्णय क्र.८२३** श्री साईबाबा रुग्णालयातील MRI विभागासाठी Boyles Anaesthesia खरेदीकामीचा अंदाजे रु. ९,५६,०००/- चे खर्चाचा प्रस्ताव दि.२२/०९/२००७ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. सदरचे खरेदीकामी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहीरात देऊन निविदा मागविणे बाबत निर्णय झालेला होता. त्यास अनुसरुन उपरोक्त खरेदीकामी सकाळ- पुणे (टुडे), टाइम्स ऑफ इंडीया - मुंबई, लोकमत - औरंगाबाद, अकोला, नागपुर इंडीयन एक्सप्रेस - पुणे, दै. गावकरी नाशिक या वतर्मान पत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.२१/०२/२००८ ते दि.०६/०३/२००८ अखेर संस्थानच्या शिर्डी कार्यालयात ५ निविदा व मुंबई कार्यालयात १५ निविदा विक्रिसाठी ठेवण्यात आल्या होत्या व निविदा स्विकारण्याची अंतीम मुदत दि.०८/०३/२००८ अखेर ठेवण्यात आली होती. तसेच सदरचे जाहिरातीबाबत अवगत करणेसाठी एकुण २८ पुरवठा धारकांना इकडील पत्र क्र. २७७९ दि. २२/०२/२००८ अन्वये कळविण्यात आले होते. सदर खरेदीकामी शिर्डी व मुंबई कार्यालयात ०५ निविदाची विक्री झालेली होती व खालीलप्रमाणे दोनच सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या होत्या -

०१. मे. सुमित हेल्थकेअर प्रा. लि., मुंबई
०२. मे. विप्रो जीई हेल्थकेअर प्रा. लि., पुणे

उपरोक्तप्रमाणे खरेदीकामी दोनच निविदा प्राप्त झालेल्या होत्या, त्यामुळे सदर खरेदीकामी दि. २०/०३/२००८ चे टिपणीन्वये जनसंपर्क विभागामार्फत वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात येऊन फेर निविदा मागविण्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. सदरचे मंजुरी अन्वये उपरोक्त खरेदीकामी टाईम्स ऑफ इंडीया - मुंबई, महाराष्ट्र टाईम्स-मुंबई या वतर्मान पत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.१६/०४/२००८ ते दि.२८/०४/२००८ अखेर संस्थानच्या शिर्डी कार्यालयात ३ निविदा व मुंबई कार्यालयात ७ निविदा विक्रिसाठी ठेवण्यात आल्या होत्या व निविदा स्विकारण्याची अंतीम मुदत दि.३०/०४/२००८ अखेर ठेवण्यात आली होती. तसेच सदरचे जाहितातीबाबत अवगत करणेसाठी एकुण २० पुरवठा धारकांना इकडील पत्र क्र. ५७२६ दि. १६/०४/२००८ अन्वये कळविण्यात आले होते. त्यास अनुसरुन सदर खरेदीकामी एकुण ०५ निविदा प्राप्त झालेल्या होत्या त्या खालीलप्रमाणे-

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१ | मे. उमा इंडस्ट्रीज, कलकत्ता |
| ०२ | मे. गायत्री सर्जिकल ॲन्ड इक्विपमेंट, नवापुर-ठाणे |
| ०३ | मे. विप्रो जीई हेल्थकेअर प्रा. लि., मुंबई |
| ०४ | मे. सर्जिलिंक, श्रीरामपूर |

| | |
|---|---|
| ०५ | मे. रेसकेअर मेडीसीस (इं) प्रा.लि., मुंबई |

उपरोक्तप्रमाणे दोन्ही जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या एकुण ७ तांत्रिक निविदा दि. १४/०५/२००८ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे समक्ष आलेल्या असून त्यांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे. सदरचा तुलनात्मक तक्ता डॉ. दिवेकर - प्रवरा हॉस्पिटल-लोणी, डॉ. आशिष पाठक - बिर्ला हॉस्पिटल-पुणे यांना दाखविण्यात आला होता. डॉ. दिवेकर यांनी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील मे. विप्रो जीई हेल्थकेअर, पुणे यांनी दिलेल्या GE Datex Ohmeda Aestiva - ५ MRI Anaesthesia Machine हे मॉडेल घेण्याची शिफारस केलेली आहे, तसेच डॉ. आशिष पाठक यांनी देखील Datex Ohmeda याच कंपनीचे मशिन घेण्याची शिफारस केली असून फक्त त्यामध्ये Halothane Vaporiser ऐवजी Sevoflurane घेण्यास सुचविले आहे.

वरीलपैकी अ.नं. १ ते ५ मधील अ.नं. १ ते ४ यांनी Technical व Commercial निविदा एकाच बंद पाकीटात दिलेल्या असल्यामुळे Technical Bid उघडते वेळेसच Technical व Commercial निविदा उघडलेल्या होत्या. तर उर्वरीत ३ Commercial सिलबंद निविदा दि. १७/०८/२००८ चे मा. उपसमिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या आहेत. त्यांचा तुलनात्मक तक्ता आजचे सभेत सादर करण्यात आला होता.

तज्ञांनी केलेल्या शिफारशीनुसार सदरचे खरेदीकामी रु. ११,८०,०००/- इतका खर्च येईल.

त्यानुसार निविदाधारकांना आजचे सभेपुढे चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते.

उपरोक्त निविदाधारकांपैकी खालील ३ निविदाधारक चर्चा / वाटाघाटीसाठी उपस्थित होते. त्यांनी खालीलप्रमाणे सूट देऊ केली.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव | देऊ केलेली सुट |
|---|---|---|
| ०१ | मे. गायत्री सर्जीकल इक्विपमेंट, भोईसर | No Discount (AMC Charges ३ % & CMC Charges ५ % for ५ Years) |
| ०२ | मे. विप्री जीई हेल्थकेअर, मुंबई | No Discount. |
| ०३ | मे. विप्री जीई हेल्थकेअर, पुणे | (तक्त्यात दाखविलेप्रमाणे) |
| ०४ | मे. उमा सर्जिकल इंडस्ट्रीज, कोलकता | फॅक्सव्दारे दर वाढविलेबाबत कळविले आहे. |
| ०५ | मे. सुमित हेल्थकेअर, मुंबइ | ३% फॅक्सव्दारे |

Tender for Boyles Anaesthesia Machine for MRI Compatible –

| **Description / Specification** | | **Wipro GE Healthcare, Mumbai** | **Uma Industries, Kolkata** | **Gayatri Surgical, Thane** | **Rescare Medisys, Mumbai** | **Wipro GE Healthcare, Pune** | **Summit Healthcare, Mumbai** | **Surgilink , Shrirampur** | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **Anaesthesia Machine - MRI Compatible (Isoflurane / Sevoflurane, Halothane)** | | | | | | | | | |
| **Model -** | | GE Datex-Ohmeda Aestiva / 5 MRI Anaesthesia Machine | Medicare Omega NM | **Model-** Sansei Plus MRI **Make** - Takaoka | **Model** - Frontline Genius **Make** - Blease England. | Datex-Ohmeda S/5 Aestiva / 5 with 7900 Ventilator | **Model-** 8607220 Fabius **Make** - Fabius MRI | **Model** - Frontline Genius **Make** - Blease England. | |
| Anaesthesia Machine with Vaporiser with Ventilator for 300 Gauses, 1.5 T actively shielded magnetic field | | Comply | Non Magnetic General Anaesthesia Machine Double Cylinder Attachment for Oxygen, Ventilator Connection Outlet , Ventilator- Nufield 200Penlon | Yes | Yes | Yes | Upto 400Guass and upto 3 T | **3 gas Model-**$O_2$, $N_2O$, Air UK Specification English Labels, Complete with. Monitoring shelf, plastic coated work surface, Rear cable tidy, simplex flow meter with Hypoxic Guard, O2 flush, 2 x V-brackts, Common Gas outlet side grab rails and Independently braked front castors. | |
| Broad patient range from neonates to compromised adults | | Comply | | Yes | Yes | Yes | Yes | Pediatrics to Adult | |
| Battery back-up for atleast 30 Min. | | 45 Mins. | 60 ibf/ in2 | No | Yes | 45 Mins. | 45 Mins. | | |
| **Parameter** | **Range** | | | | | | | | |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Tidal volume ($V_T$) | 20 to 1500 ml | Comply | 10ml - 300ml (Newton Valve ) 50ml - 2000 ml (Standard Valve) | Yes | Yes | | 20-1500 ml | 20 to 1400ml | | | |
| Airway pressure ($P_{inspired}$) | 5 to 60 cm H2O | Comply | - | Yes | Yes | | 5 to 60 cm H20 | 5 to 65 cm H20 | | | |
| Flow | 1 to 120 LPM | Comply | - | Yes | Yes | | 1 to 120 L/Min | 10 to 85 L/Min | 0.2 to 1 L/Min | | |
| Breaths Per Minute (Rate) | 4 to 150 BPM | 4-100 bpm | - | Yes | Yes | | 4 to 100 BPM | 4 to 60 | | | |
| I:E ratio | 2:1 to 1:8 | Comply | Continuously Variable and dependant on chosen I & E Settings Minute volume plus 0.1 litre/cycle to power fluid logic circuit | Yes | Yes | | Yes | 4:1 to 1:4 | 1:2 | | |
| Airway pressure limit ($P_{limit}$) | 12 to 100 cm H2O | Comply | | Yes | Yes | | 12 to 100cm H20 | Yes | 20-80cm $H_2O$ | | |
| PEEP | OFF, 4 to 30 cm H2O | Comply | | Yes | Yes | | Off, 4 to 30 cm H20 | Yes | | | |
| **Ventilation Modes-** | | | | | Yes | | Yes | Yes | | | |
| Pressure control(pc) | | Comply | | Yes | Yes | | Yes | Yes | | | |
| Volume Control(vc) | | Comply | | Yes | Yes | | Yes | Yes | | | |
| Pressure Regulated Volume Control (PRVC) | | Pressure - Support with Apnea Backup Ventilation. | | No | Yes | | Yes | Yes | | | |
| **Other Accessories** | | | | | | | | | | | |
| Patients circuit for Adult / Paed./ Neonatal with humidifier Isofluorane & Halothane vaporiser Test Lung for Adult / Paed. / Neonatal HME Filter. | | Reusable Patient ckt for adult & Paed - 1 set each, HMEF filters for Adult & Paed Patient - 1 box each, Test Lung for Adult & Paed - 1 each. Isoflurene & halothene Vaporiser - 1 each. Do not supply specific Humidifier & Neonetal Ckts for Anaestesia. | Yes | Yes | Yes | | Yes | Yes | **Reusable adult patient circuit Datum Vaporiser for Isoflurane & Halothane** | | |
| **Accessories :** | | Adult & paed Reusable ckt -1set each HMEF - Audlt & Paed-1 box each Test Lung-Adult & Paed - 1 each Isoflurane Vap - 1 No.Halothane Vap-1 | | | | | | | | | |
| | | | | | Basic Cost in US$ - | 48000 | | Basic Cost in EURO- | 44050 | Basic Cost in US$ - | 50000.00 |
| | | | | | App.Cost in Rs.@ Rs.40/- Per Doller | 1920000.00 | | App.Cost in Rs.@ Rs.60/- Per EURO | 2643000.00 | App.Cost in Rs.@ Rs.40/- Per Doller | 2000000.00 |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | Custom Dusty 9.4 % | 180480.00 | | Custom Dusty 9.4 % | 248442.00 | Custom Dusty 9.8 % | 196000.00 |
| | | | | | Clearance Charges 1% = | 19200.00 | | Clearance Charges 1% = | 26430.00 | Clearance Charges 3% = 60000.00 | 60000.00 |
| **Total Amount in Rs.** | | 1180000.00 | 764260.00 | 727875.00 | | 2119680.00 | 1650000.00 | | 2917872.00 | | 2256000.00 |
| **Warranty** | | 1 Year | 1 Year | 1 Year | 1 Year | | 1 Year | 1 Year | | | |
| **Amc / CMC Charges** | | AMC / CMC details not given | AMC / CMC details not given | AMC / CMC details not given | AMC | CMC | AMC / CMC details not given | AMC | CMC | AMC / CMC details not given | |
| **1st Year** | | | | | 38400.00 | 115200.00 | | 60000.00 | 232000.00 | | |
| **2nd Year** | | | | | 42240.00 | 126000.00 | | 66000.00 | 260000.00 | | |
| **3nd Year** | | | | | 47000.00 | 138500.00 | | 75000.00 | 313500.00 | | |
| **4th Year** | | | | | 53400.00 | 154000.00 | | 85400.00 | 347000.00 | | |
| **5th Year** | | | | | 60200.00 | 175500.00 | | 93200.00 | 411500.00 | | |
| **Payment Terms** | | | | | | | 100% LC on our principal GE Healthcare | 100 % Irrevocable of L/C in favour of Draeger Medical Germany. | Through L/C | | |
| | | | | | | | | | | | |
| **Rate After Negotiation** | | 1180000.00 | 923344.80 | AMC Charges 3 % & CMC Charges 5 % for 5 Years | | Absent | 23000 USD | | | | |
| | | | | | | | (A) Cost in INR @ Rs. 52/- = 1196000.00 | | | | |
| | | | | | | | (B) Custom Duty 22.5% = 269100.00 | | | | |
| | | | | | | | (A)+(B) = 1465100.00 | | | | |
| | | | | | | | (C) Clearance Charges 2.4% = 35162.40 | | | | |
| | | | | | | | Total (A)+(B)+(C)= 1500262.40 | | | | |
| | | | | | | | Bank Commssion will be paid by Party | | | | |
| | | | | | | | Payment Through L/C | | | | |
| **Experts Recommendation -** | **Dr. Divekar, Pravara Medical Trust-Loni & Dr. Ashish Pathak, Birla Hospital-Pune, both Doctors has recommended Model Datex Ohmeda Aestiva - 5 MRI Aneasthesia Machine, Dr. Pathak suggested that instead of Halothane Vaporiser go for Sevoflurane.** | | | | | | | | | | |

यावर चर्चा होऊन तज्ञांचे शिफारशीनुसार मे. विप्री जीई हेल्थकेअर - पुणे, मुंबई यांनी एकाच मॉडेलचे दर दिलेले आहेत. मे. विप्री जीई हेल्थकेअर - मुंबई यांनी भारतीय रुपयात तर मे. विप्री जीई हेल्थकेअर - पुणे यांनी डॉलरमध्ये दर दिलेले आहेत. आजचे सभेत चर्चा / वाटाघाटीनंतर मे. विप्री जीई हेल्थकेअर - पुणे यांनी US Doller मध्ये देऊ केलेली किंमत स्विकारुन त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, तसेच त्यांना पेमेंट L/C व्दारे करण्यात येऊन कस्टम डयुटीमध्ये सुट मिळणेकामी वित्त व्यवस्थापक यांनी शासनाकडे प्रस्ताव सादर करावा. कस्टम डयुटीत सुट न मिळाल्यास सदरची रक्कम मे. विप्री जीई हेल्थकेअर - पुणे यांना २२.५ % प्रमाणे अदा करण्यात यावी. Bank Charges हे निविदाधारकांकडून वसुल करण्यात यावे, असे ठरले.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.०७** **श्री साईनाथ रुग्णालयातील विविध मशिन्सचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणे बाबत.**

**निर्णय क्र.८२४** श्री साईनाथ रूग्णालयात नियमीतपणे वापरात असलेले अंदाजे ३० कंपन्यांचे एकुण रू. १,२५,०००००/- (अक्षरी रू.एक कोटी पंचवीस लाख मात्र) इतक्या रकमेचे एकुण १२३ नग मेडिकल इक्वीपमेंट व मशिनरी

आहेत. सदर मशीन्स पैकी एकुण ४६ नग मशीन्सचे दुरुस्ती व देखभालीकरीता मा. व्य. समितीच्या विविध निर्णयांन्वये दरवर्षी एकुण ११ कंपन्यांकडे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करण्यात येते. सदर वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट कालावधीत कंपन्यांनी त्यांच्या नियमीत भेटी तसेच आवश्यकतेनुसार तातडीच्या भेटी देउन दुरूस्ती व देखभाल करीत आहे. तसेच सदरचे सर्व मशिन व्यवस्थित काम देत आहेत. सदर मशीन्सपैकी एकुण ४६ नग मशीन्सचा वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट / वॉरंटी कालावधी संपलेला असल्याने पुढील कालावधीत सर्व मशिन्सने व्यवस्थित काम देणेसाठी त्या त्या कंपन्यांशी वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणे गरजेचे आहे. तसेच मा. व्य. समितीच्या दि. २०/०५/२००७ च्या सभेतील विषय क्र. ३३ निर्णय क्र. ३८६ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

"दरवर्षी संस्थानमधील महत्वाच्या मशीनरींचे (यामध्ये उदा. प्रसादालयातील विविध मशीनरी, विद्युत विभागातील विविध मशीनरी, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध मशीनरी, एअरकंडीशनर्स, वायुवीजन यंत्रणा, वगैरे) वार्षीक मेन्टेनन्स सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट अथवा रिस्क प्रोटेक्शन टाईप सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट हे त्या त्या मशीनरीच्या उत्पादक कंपनीला अथवा संबंधीत मशीनरीच्या उत्पादक कंपनीने निर्देशीत केलेल्या त्यांच्या अधिकृत सर्व्हिस डीलरला देण्यात यावे असे ठरले."

सोबतच्या परिशीष्ट 'अ' मध्ये दिलेल्या अ. क्र. १ ते १३ अन्वये एकुण ४६ मशीन्सचे विविध कंपन्यांकडे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकामी संबंधित कंपन्यांच्या प्रतिनीधींशी मा. व्य. समिती सभेपुढे प्रत्यक्ष वाटाघाटी करुन वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचे दर निश्चीत करता येतील असे मत आहे.

तरी श्री साईनाथ रुग्णालयाच्या एकुण ४६ नग मशीन्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचे दर विविध कंपनी प्रतिनीधींशी प्रत्यक्ष वाटाघाटी करुन ठरविण्यासाठी व यापुढील एक वर्षाचे कालावधीकरीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकरीता दर निश्चित केल्यानंतर येणाऱ्या एकुण रकमेच्या खर्चास आणि सदरची संबंधित रक्कम विविध कंपन्यांना आगाउ पाठविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, याकामी उपवैद्यकिय संचालक, वैद्यकिय संचालक,प्रशासकीय अधिकारी यांनी कंपन्यांचे प्रतिनिधी समक्ष बोलावून दिलेल्या दरामध्ये चर्चा / वाटाघाटी करुन निर्णय घ्यावा असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.०८** **श्री साईबाबा रुग्णालयातील विविध मशिन्सचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणे बाबत.**

**निर्णय क्र.८२५** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये एकुण अंदाजे ७२ कंपन्यांचे अंदाजे एकुण रू.२८,३१,७२,६५१.७४ इतक्या रकमेचे विविध मेडिकल इन्स्टुमेंट व मशिनरी खरेदी करण्यात आले आहेत. सदर मशीन्स पैकी दुरुस्ती व देखभालीकरीता मा. व्य. समितीच्या विविध निर्णयांन्वये दरवर्षी अंदाजे एकुण १४२ नग मशीन्सचे संबंधीत कंपन्यांकडे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करण्यात येते. सदर वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट कालावधीत कंपन्यांनी त्यांच्या नियमीत भेटी तसेच आवश्यकतेनुसार तातडीच्या भेटी देउन दुरूस्ती व देखभाल करीत आहे. तसेच सदरचे सर्व मशिन व्यवस्थित काम देत आहेत. वरील १४२ नग मशीन्सपैकी एकुण ४२ नग मशीन्सचा वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट / वॉरंटी कालावधी संपलेला असल्याने पुढील कालावधीत सर्व मशिन्सने व्यवस्थित काम देणेसाठी त्या त्या कंपन्यांशी वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणे गरजेचे आहे. तसेच मा. व्य. समितीच्या दि. २०/०५/२००७ च्या सभेतील विषय क्र. ३३ निर्णय क्र. ३८६ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

"दरवर्षी संस्थानमधील महत्वाच्या मशीनरींचे (यामध्ये उदा. प्रसादालयातील विविध मशीनरी, विद्युत विभागातील विविध मशीनरी, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध मशीनरी, एअरकंडीशनर्स, वायुवीजन यंत्रणा, वगैरे) वार्षीक मेन्टेनन्स सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट अथवा रिस्क प्रोटेक्शन टाईप सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट हे त्या त्या मशीनरीच्या उत्पादक कंपनीला अथवा संबंधीत मशीनरीच्या उत्पादक कंपनीने निर्देशीत केलेल्या त्यांच्या अधिकृत सर्व्हिस डीलरला देण्यात यावे असे ठरले."

सोबतच्या परिशीष्ट 'अ' मध्ये दिलेल्या अ. क्र. १ ते १९ अन्वये एकुण ४२ मशीन्सचे विविध कंपन्यांकडे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकामी संबंधित कंपन्यांच्या प्रतिनीधींशी मा. व्य. समिती सभेपुढे प्रत्यक्ष वाटाघाटी करुन वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचे दर निश्चीत करता येतील असे मत आहे.

तरी श्री साईबाबा हॉस्पिटलमधील एकुण ४२ नग मशीन्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचे दर विविध कंपनी प्रतिनीधींशी प्रत्यक्ष वाटाघाटी करुन ठरविण्यासाठी व यापुढील एक वर्षाचे कालावधीकरीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकरीता दर निश्चित केल्यानंतर येणाऱ्या एकुण रकमेच्या खर्चास आणि सदरची संबंधित रक्कम विविध कंपन्यांना आगाऊ पाठविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, याकामी उपवैद्यकिय संचालक, वैद्यकिय संचालक, प्रशासकीय अधिकारी यांनी कंपन्यांचे प्रतिनिधी समक्ष बोलावून दिलेल्या दरामध्ये चर्चा / वाटाघाटी करुन निर्णय घ्यावा असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.०९** **श्रीसाईनाथ रुग्णालयातील लेजर सर्जरी इक्वीपमेंट खरेदीकामी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणे बाबत.**

**निर्णय क्र.८२६** श्री साईनाथ रुग्णालयातील नाक, कान, घसा या विभागात सध्या सर्वसाधारण प्रकारच्या शस्त्रक्रिया करण्यात येतात. इतर मोठ-मोठ्या नामांकित रुग्णालयात नाक, कान, घसा या लेजर सर्जरीज केल्या जातात, अशा या अत्याधुनिक लेजर सर्जरीमुळे रुग्णांची सर्जरी करणे अतिशय सोपे झालेले आहे. यामुळे रुग्णांस त्रास कमी होतो व वेळही कमी लागतो तसेच रक्त कमी जाते. अतिशय अवघड शस्त्रक्रिया या लेजर पध्दतीने केल्या जातात, व शस्त्रक्रिया यशस्वितेचे प्रमाण देखील जास्त असते. तेंव्हा श्री साईनाथ रुग्णालयात लेजर शस्त्रक्रिया करावयाचा प्रस्ताव आहे.

लेजर सर्जरी इक्विपमेंटने नाक, कान, घसा या विकारावर खालील शस्त्रक्रिया केल्या जातात.

01. Ear Surgery for Polyp, Vascular Tumors, Otosclerosis.

02. Nasal Surgery - Endoscopic Assisted Laser DCR, Turbinectomy, Polyp, 03. Removal Choanal atresia.

04. Throat Surgery Tonsil, Mucosal Tumors, Leucoplakiya etc.

05. Laryngeal surgery Vocal cord Polyps, Vocal Nodules, Vocal Cord Paralysis.

त्यानुसार श्री साईनाथ रुग्णायातील नाक, कान, घसा या विभागासाठी लेजर सर्जरी इंक्विपमेंट खरेदी कामी विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२५,००,०००/- चे खर्चाचा प्रस्ताव दि.१६/०३/२००८ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. सदरचे खरेदीकामी निर्णय क्र. २३४ अन्वये विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहीरात देऊन निविदा मागविणे बाबत निर्णय झालेला आहे.

त्यास अनुसरुन उपरोक्त खरेदीकामी टाईम्स ऑफ इंडीया - मुंबई, महाराष्ट्र टाईम्स-मुंबई या वतर्मान पत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.१६/०४/२००८ ते दि.२८/०४/२००८ अखेर संस्थानच्या शिर्डी कार्यालयात ३ निविदा व मुंबई कार्यालयात ७ निविदा विक्रिसाठी ठेवण्यात आल्या होत्या व निविदा स्विकारण्याची अंतीम मुदत दि.३०/०४/२००८ अखेर ठेवण्यात आली होती. तसेच सदरचे जाहिरातीबाबत अवगत करणेसाठी एकुण ०७ पुरवठा धारकांना इकडील पत्र क्र. ५७२८ दि. १६/०४/२००८ अन्वये कळविण्यात आले होते. त्यास अनुसरुन सदर खरेदीकामी एकुण ०४ निविदा प्राप्त झालेल्या होत्या त्या खालीलप्रमाणे-

01. M/s. Lancer Medical Technical Pvt.Ltd., Ahmedabad.

02. M/s. Shailtec, Mumbai.

03. M/s. Biolitec India Pvt.Ltd., Vadodara ̶ Baroda.

04. M/s. Advanced Clinical Research (P) Ltd., Bangalore.

उपरोक्तप्रमाणे जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या एकुण ४ सिलबंद तांत्रिक निविदा (Technical Bid) मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०७/०७/२००८ चे सभेपुढे समक्ष उघडण्यात आल्या होत्या. सदर निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात येऊन तो मुंबई येथील इ.एन.टी. तज्ञ डॉ. मिलिंद नवलाखे व डॉ. हेतल मारफतीया यांना दाखविण्यात आलेला आहे. त्यांनी सेलीटॅक, मुंबई यांचे दोन मॉडेल पैकी एक मॉडेल घेण्याबाबत शिफारस केलेली आहे.

तसेच सदरचे खरेदीकामी प्राप्त झालेल्या ४ निविदाधारकांचे Commercial Bid दि. ०६/०९/२००८ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेली आहेत. तज्ञांनी शिफारस केल्याप्रमाणे सेलीटॅक, मुंबई यांचे दोन मॉडेलपैकी Vellas ३० BK Surgical Diode Laser या मॉडेलचे दर हे कमी म्हणजे रु. १२,८६,४३८/- इतके आहेत. त्यानुसार तज्ञांनी केलेल्या शिफारसीप्रमाणे सदरचे खरेदीकामी रु. १२,८६,४३८/- इतका खर्च येईल.

उपरोक्त निविदा धारकांना आजचे सभेपुढे चर्चा / वाटाघाटी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

01) M/s. Lancer Medical Technical Pvt. Ltd., Ahmedabad- दिलेली सुट - २%

02) M/s. Shailtec, Mumbai - दिलेली सुट - (One CO2 Laser Demo Unit will be given free of cost] which costing App. Rs.1.5 Lac)

03) M/s. Biolitec India Pvt.Ltd., Vadodara – Baroda - दिलेली सुट - रु. ४,२५,०००/-

04) M/s. Advanced Clinical Research (P) Ltd., Bangalore -दिलेली सुट - No Disocunt

| Sr. No. | Description | Make | Advanced Clinical Research, Bangalore | | Lancer Medical, Ahmedabad | | Shailtec, Mumbai | | | | Biolitec India, Baroda | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ENT Multi Specialty 980nm Diode Laser Machine | | Make / Model | Rate Per Incl. All Tax | Make / Model | Rate Per Incl. All Tax | Make / Model | Rate Per Incl. All Tax | Make / Model | Rate Per Incl. All Tax | Make / Model | Rate Per Incl. All Tax |
| | | | Ceramoptec GmbH, Germany | 1499680.00 | DIODE LASER MACHINE | 705060.00 | Model- CTL Poland Make | 24800 Euro | Model- VELLAS 30 BK SURGICAL DIODE LASER | 1286438.00 | Biolitec AG, Germany | 1349920.00 |
| | | | Model : LD-15 | | SLT-DL30 | | 30 Watts Diode laser 360 µ inner dia | App in Rs 1490000.00 | | | Model - D-25 | |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | 220 µ, 600µ optic fiber<br>DCR Hand Piece<br>ENT Hand Piece<br>Dental bleachine hand Piece<br>Surgical Hand Piece<br>Laryngeal Hand piece local make<br>Safety Goggles<br>varicose vein set | | | | | |
| | | | Size-12cm x 26cm x 30cm | | | | | | 1 Fiber 400 µ 9 INNER DIA 360U, Footswitch, fiber srtripper, 1 no. goggles. Power 30w, modes cw, single, repeat Pulse duration 10us 1000ms Repetition rate 0.5Hz Red diode 635nm, power < 5nm | | Size-18cm x 22cm x37cm | |
| | Wave Length | 980nm | Yes | | 795nm to 980nm± 5nm non-tunable | | | | | | Yes | |
| | Optical Power | 30 Watt | No | | 0.10-30 Walts CW | | | | | | Yes | |
| | Aiming Beam | 635nm, 4mW | Yes | | 3mW (Max) ± at 650nm± 20nm | | | | | | Yes | |
| | | | | | 200µm, 400µm, 600µm, 1000µm, contract and non contract fibers with SMA 905 connector | | | | | | Yes | |
| | Operating Mode | CW, Pulsed | Yes | | User adjustable from 200 microsecounds to CW, single shot,Multi Shot, constant wave modes with repletion from single pule to 1KHz | | | | | | Yes | |
| | Pulse Duration / Interval | 0.01-99.9 sec | No | | Single shot, Multi Shot,constant wave modes with repletion from single pule to 1KHz | | | | Additional accessories<br>200µ fiber<br>400µ fiber<br>600µ fiber<br>ENT Hand Piece<br>DCR Hand Piece<br>Laryngeal Hand piece local make<br>varicose vein set<br>Surgical Hand Piece<br>Dental bleachine hand Piece<br>Goggles for 980nm | | Yes | |
| | **Accessories:** | | | | | | | | | | | |
| | **DCR & ENT Application** | | | | | | | | | | | |
| 1 | 360 µ fiber | 1 No. | Yes | | N.Q. | | | | | | Yes | |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 600 µ fiber | 1 No. | | | | | | | | | | |
| 3 | 220 µ fiber | 1 No. | | | | | | | | | | |
| 4 | Hand Piece DCR | 2 No. | | | | | | | | | | |
| 5 | Hand Piece ENT | 7 No. | | | | | | | | | | |
| 6 | Laryngeal Hand Piece | 1 No. | | | | | | | | | | |
| 7 | Safety Goggles | 3 No. | | | | | | | | | | |
| | **Smile Pro Dental :** | | | | | | | | | | | |
| 8 | Bleaching Hand Piece | 1 No. | Yes | | N.Q. | | | | | | Yes | |
| 9 | Surgical Hand Piece | 1 No. | | | | | | | | | | |
| | **Varicose Vein Application** | | | | | | | | | | | |
| 10 | Tip Guide Wire (0.0035") | 1 No. | Yes | | N.Q. | | | | | | Yes | |
| 11 | Sheath (5Fr) | | | | | | | | | | | |
| 12 | 360 µ fiber | | | | | | | | | | | |
| 13 | Entry Needle | | | | | | | | | | | |
| | **Warranty** | | 2 Year Warranty | | Warranty Not Given | | 1 year Warranty only for equipment not for accessories. | | 1 year Warranty only for equipment not for accessories. | | 2 Year Warranty | |
| | **Total Amt. in Rs.** | | | **1499680.00** | | **705060.00** | | **1490000.00** | | **1286438.00** | | **1349920.00** |
| | **Rate After Negotiation** | | | No Discount | | 690958.80 | No Discount | | One CO2 Laser Demo Unit will be given free of cost] which costing App. Rs.1.5 Lac | | | 924920.00 |

यावर चर्चा होऊन तज्ञांचे शिफारशीनुसार M/s. Shailtec, Mumbai यांचे VELLAS 30 BK SURGICAL DIODE LASER हे मॉडेल रु. १२,८६,४३८/- इतक्या रुपयात खरेदी करावे. त्यांचेकडून आजचे सभेत ठरलेप्रमाणे एक CO2 Laser Demo Unit मोफत घेण्यात येऊन त्यांना भारतीय रुपयात पेमेंट करण्यात यावे, असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.१० द्वारावती इमारत रबराईज्ड क्वॉयर मॅट्रेसेस (गादया) खरेदी कोटेशन उघडून वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.८२७** **(अ)** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १८ ऑक्टोबर, २००८ रोजीचे सभेतील निर्णयानुसार व्दारावती या निवासस्थान इमारतीसाठी खरेदी करण्यांत आलेल्या सिंगल बेडस्साठी आवश्यक असणाऱ्या रबराईज्ड क्वॉयर मॅट्रेसेस खरेदीकामी गोदरेज, स्पीलवेल, सेंच्युरी, करलॉन, रिलॅक्सवेल या उत्पादक कंपन्यांकडून थेट दरपत्रके मागविणेस व त्याकामी येणारे योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता मिळालेली आहे.

सदरहू निर्णयानुसार रबराईज्ड क्वॉयर मॅट्रेसेसच्या गोदरेज, स्पीलवेल, सेंच्युरी, करलॉन, रिलॅक्सवेल या उत्पादक कंपन्यांना इकडील पत्र जावक क्रमांक एसएसएस / बांधकाम / १५९०६/२००८, दिनांक २७ ऑक्टोबर, २००८ अन्वये खाली नमूद केलेल्या सविस्तर तपशीलानुसार (Technical Specifications) व विहीत अटी शर्तीनुसार दिनांक १० नोव्हेंबर, २००८ अखेर सिलबंद दरपत्रके सादर करणेबाबत कळविणेत आलेले होते.

| Sr. No. | Description | Required Qty. |
|---|---|---|
| 01 | Supply of RUBBERISED COIR MATTRESS<br>Having Size 75 Inch x 36 Inch ( 1905 mm x 915 mm ) with as per detailed specifications given in Annexure 'A' | 948 Nos. |

## Annexure A

| **Sr.No.** | **Parameters** | **Specifications** |
|---|---|---|
| 01 | Mattress | Quilted |
| 02 | Thickness – Mattress | 4 Inch |

| | | |
|---|---|---|
| 03 | Dry Rubberised Content (DRC) | 20 to 25 % |
| 04 | Latex Type | Centrifuged |
| 05 | RC Pad Density | 70 to 75 gm/dcm$^3$ |
| 06 | PU Foam Density | 18 to 20 gm/dcm$^3$ |
| 07 | Bonded Foam Thickness | 20 to 22 mm |
| 08 | Nature of Tapestry | Cotton |
| 09 | Tapestry | 120 to 140 GSM |
| 10 | Fabric | Anti Microbial Treatment |

**(ब)** उपरोक्त परिच्छेदात नमुद केल्याप्रमाणे, व्दारावती इमारतीसाठी खरेदी करावयाच्या रबराईज्ड क्वॉयर मॅट्रेसेस खरेदीकामी संबंधित उत्पादक कंपन्यांकडून ०५ सिलबंद दरपत्रके प्राप्त झालेली आहेत. त्यापैकी रिलॅक्सवेल (श्री व्यंकटेश्वरा क्वॉयर प्रॉडक्टस् प्रा.लि., सिकंदराबाद) या कंपनीचे सिलबंद दरपत्रक दिनांक ११ नोव्हेंबर, २००८ रोजी प्राप्त झालेले आहे. तसेच स्पीलवेल (शीला फोम प्रा.लि.,सिल्व्हसा) या उत्पादक कंपनीने दिनांक १० नोव्हेंबर, २००८ रोजीचे विनंती अर्जान्वये, दरपत्रक सादर करणेसाठी थोडा अवधी मिळावा, अशी विनंती केली होती. त्यानुसार स्पीलवेल कंपनीने उशीरा म्हणजे दिनांक १३ नोव्हेंबर, २००८ रोजी सिलबंद दरपत्रक सादर केलेले आहे. प्राप्त झालेल्या सर्व सिलबंद दरपत्रकांचा तपशील खालीलप्रमाणे :

| Sr.No. | Name of the Company |
|---|---|
| 01 | Godrej & Boyce Mfg. Co. Ltd., Pune |
| 02 | Centuary Fibre Plates Pvt. Ltd.,Urali Devachi,Pune |
| 03 | Kurlon Limited, Pisoli, Pune |
| 04 | Relaxwell (Sri Venkateswara Coir Products Pvt.Ltd., Secunderabad ) |
| 05 | Sleepwell C/o Sethi & Sethi, Pune |

यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरविण्यात आले की, Rc Pad Density ७० ते ७५ ऐवजी १०० gm/dcm३ डेनसीटी असलेल्या गाद्या मजबूत व जास्त काळ टिकाऊ असल्यामूळे सदर स्पेसिफिकेशन्सप्रमाणे पुरवठादार यांचेकडून सुधारित दर घेण्यात यावे. त्यानंतर लगेचच पुरवठादार यांनी खालीलप्रमाणे सुधारित दर सादर केले

| Sr.No | Name of Party | Qty (Nos) | Supply of rubberized Coir Mattress havind size 75"X36" (190mmx915mm) | |
|---|---|---|---|---|
| | | 948 | 75gm/dcm3 coir mattress (Per Nos.Rs.) | 100gm/dcm3 coir mattress (Per Nos.Rs.) |
| 01 | Godrej & Boyce Mfg. Co. Ltd., Pune | | 2624.00 | 2624.00 |
| 02 | Centuary Fibre Plates Pvt. Ltd.,Urali Devachi,Pune | | 2174.00 | **2353.00** |
| 03 | Kurlon Limited, Pisoli, Pune | | 1988.00 | 2390.00 |
| 04 | Relaxwell (Sri Venkateswara Coir Products Pvt.Ltd., Secunderabad ) | | 2109.00 | 2391.00 |
| 05 | Sleepwell C/o Sethi & Sethi, Pune | | 2303.00 | 3925.00 |

सुधारित तपशिलानुसार पुरवठादार यांनी उपरोक्तप्रमाणे सादर केलेल्या दरावर चर्चा होऊन, Centuary Fibre Plates Pvt. Ltd.,Urali Devachi,Pune यांनी रुपये २३५३.०० प्रति नगाप्रमाणे गाद्या पुरविण्याचे मान्य केल्याने व त्यांचे दर निम्नतम स्वरुपाचे असल्याने त्यांचे दर स्विकारण्यात यावे व त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.११ साईआश्रम प्रकल्पासाठी परिसर विकास (External Services) बांधकामाकरीता आलेल्या निविदा उघडून त्यावर निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.८२८** मा. व्यवस्थापन समितीचे निविध निर्णयांन्वये, शिर्डी साई ट्रस्ट्, चेन्नई व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे संयुक्त विद्यमाने साई आश्रम प्रकल्पाचे बांधकाम सध्या प्रगतीपथावर आहे. सदर प्रकल्पाचे परिसर विकास कामांसाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि. २८/०७/२००७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६४३ अन्वये रुपये २०,४३,७२,४००.०० मात्रचे खर्चास मंजुरी घेण्यात आली आहे. त्यानुसार आर्किटेक्ट व कन्सलटंट यांचेकडून सदर कामाचे अंदाजपत्रक, स्पेशिफिकेशन, नकाशे व निविदा तयार करुन घेण्यात आल्या व दि. २१/०७/२००८ चे टिपणी अन्वये वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे व संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या . त्यानुसार खालील ०५ ठेकेदारांनी को ऱ्या निविदा विकत घेतल्या होत्या.

१.पार्श्वनाथ डेव्हलपर्स, लि, नवि दिल्ली
२.अश्विनी इन्फ्राडेव्हलमेंटस प्रा.लि., मुंबई
३.एस.एन. ठक्कर प्रा.,लि, मुंबई

४.बिटकॉन इंडिया इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हपर्स, प्रा.लि., मुंबई
५.मे.जे.एम.म्हात्रे, रायगड

सिलबंद निविदा सादर करणेसाठी दि. १८/०९/२००८ पर्यंत मूदत देण्यात आली होती. परंतू मे. पार्श्वनाथ डेव्हलपर्स, नवि दिल्ली यांनी सदर कामाचे निविदेबाबत दि. ०३/०९/२००८ व दि. १३/०९/२००८ रोजीचे पत्रान्वये काही स्पष्टीकरण मागितली होती व निविदा सादर करणेसाठी मूदतवाढीची मागणी केली होती. त्यानुसार दि. १६/०९/२००८ रोजीचे टिपणी अन्वये मूदतवाढीस मंजुरी घेऊन दि. ०१/१०/२००८ पर्यंत मूदतवाढ देणेत आली. त्यानुसार सर्व ठेकेदार यांना दि. १७/०९/२००८ रोजीचे पत्रान्वये सिलबंद निविदा सादर करणेकामी दि. ०१/१०/२००८ पर्यंत मूदत दिल्याबद्दल कळविण्यात आले.

याप्रमाणे देण्यात आलेले विहीत मूदतीत फक्त मे. पार्श्वनाथ डेव्हलपर्स, नवि दिल्ली यांची एकच सिलबंद निविदा प्राप्त झाली होती.

दरम्यान महाराष्ट्र शासनाचे सार्वजनीक बांधकाम विभागामार्फत सन २००८-२००९ या वर्षासाठीची दरसुची प्रसिध्द करण्यात आली. सदर दरसुची दि. १५/०८/२००८ पासून अमंलात आलेली आहे. यापुर्वी वरिलप्रमाणे मागविण्यात आलेल्या निविदा हया सन २००७-२००८ चे दरसुचीवर आधारीत होत्या. त्यावेळी बांधकाम साहित्याचे बाजारभावातही मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली होती.

विषयांकीत कामासाठी वरीलप्रमाणे फक्त एकच निविदा प्राप्त झाली होती. त्यानुसार याकामी नविन दरसुची नुसार निविदा तयार करुन फेर निविदा मागविणे आवश्यक होते.

त्यानुसार आर्किटेक्ट डी.ओ. निकम, पुणे व प्रकल्प सल्लागार मे. डॉर्श कन्सल्ट (इ) प्रा. लि., मुंबई यांचेकडून सन २००८-२००९ चे दरसुचीनुसार अंदाजपत्रक व निविदा तयार करुन घेण्यात आल्या व सदरकामी वर्तमान पत्रात व संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात देऊन फेर निविदा (Second Call) मागविण्यात आल्या. निविदा विक्रीचा कालावधी हा दि. १५/१०/२००८ ते दि. २५/१०/२००८ पर्यंत ठेवण्यात आला. यापुर्वी ज्या ठेकेदारांनी निविदा विकत घेतल्या होत्या, त्यांना सदर निविदा विनामुल्य देण्यात आल्या सदर मूदतीत खालील ठेकेदारांनी कोऱ्या निविदा विकत घेतल्या.

०१. पार्श्वनाथ डेव्हलपर्स, लि, नवि दिल्ली
०२. अश्विनी इन्फ्राडेव्हलमेंटस प्रा.लि., मुंबई
०३. एस.एन. ठक्कर प्रा.,लि, मुंबई
०४. बिटकॉन इंडिया इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हपर्स, प्रा.लि., मुंबई
०५. मे.आर.के. मधानी ॲण्ड कंपनी, मुंबई
०६. मे. रतन हाऊसींग डेव्हपमेंटस लि. कानपूर

सिलबंद निविदा सादर करणेसाठी ठेकेदार यांना दि. ०३/११/२००८ पर्यंत मूदत देण्यात आली होती. विहित मदूतीत फक्त मे. पार्श्वनाथ डेव्हलपर्स लिमिटेड, नवि दिल्ली यांची एकच सिलबंद निविदा प्राप्त झाली आहे.

तरी मे. पार्श्वनाथ डेव्हलपर्स लिमिटेड, नवि दिल्ली यांचेकडून प्राप्त झालेल्या साई आश्रम प्रकल्पाचे परिसर विकास कामाचे (External Services) निविदेवर निर्णय होणेचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,याकामी एकच निविदा प्राप्त झालेली असल्याने आर्किटेक्ट डी.ओ निकम व डॉर्श कन्सल्ट इंडिया यांचे सल्ल्याने सदर प्रकल्पासाठी फेरनिविदा मागविण्यात याव्यात असे ठरले. (कार्यवाही- बांधकाम विभाग)

**विषय नं.१२** **श्रीसाई प्रसादालयासाठी थर्मिक फ्लुईड हीटर रुम बांधकामाकरीता आलेल्या निविदा उघडून त्यावर निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.८२९** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**विषय नं.१३** **स्कार्पिओ/ इनोव्हा वाहनांचे कोटेशन उघडून निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र.८३०** दि.१८.१०.२००८ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत झालेल्या चर्चेनुसार, संस्थानचे मा.सदस्य, अधिकारी यांचे कार्यालयीन वापराकरीता एक महिंद्रा स्कॉर्पिओ किंवा एक ईनोव्हा वाहन खरेदी करावे असे ठरले होते.

वरील निर्णयानुसार, एक महिंद्रा स्कॉर्पिओ खरेदी करणे कामी महिंद्रा कंपनीचे अधिकृत डिलरकडून जा.नं.एसएसएस/वाहन/१६३५५/२००८ दि.०८/११/२००८ ने तसेच एक ईनोव्हा वाहन खरेदी करणे कामी टोयोटा कंपनीचे अधिकृत डिलरकडून जां.एसएसएस/वाहन/१६३५६/२००८ दि.०८/११/२००८ ने खालील प्रमाणे कोटेशन्स बोलावण्यात आलेली होती.

| **अ)** | **एक- टोयोटा ईनोव्हा करीता** | **ब)** | **एक- महिंद्रा स्कॉर्पिओ करीता** |
|---|---|---|---|
| ०१. | लक्झरी टोयोटा,मुंबई | ०१. | श्रीराम ऑटोमोबाईल्स,अहमदनगर |
| ०२. | मधुबन टोयोटा,मुंबई | ०२. | जितेंद्र मोटर्स, प्रा.लि., नाशिक |
| ०३. | शिनराई टोयोटा,मुंबई | ०३. | एन.बी.एस.इंटरनॅशनल, लि, मुंबई |
| ०४ | वासन टोयोटा,नाशिक | ०४. | महिंद्रा & महिंद्रा कंपनी लि.,मुंबई |
| ०५ | मिलेनियम टोयोटा,ठाणे | | |

०६. डि.एस.के.टोयोटा, अहमदनगर.

तथापि महिंद्रा उत्पादक कंपनीकडून टाकण्यात आलेल्या निर्बंधानुसार, कंपनीकडून नेमुण दिलेल्या कार्यक्षेत्रा बाहेर वाहन देता येत नसल्याने अहमदनगर जिल्ह्या करीता नेमण्यात आलेले अधिकृत डिलर श्रीराम ॲटोमोबाईल्स, अहमदनगर यांचेकडूनच कोटेशन प्राप्त झालेले असून उर्वरित तिनही डिलर्स यांनी कोटेशन देण्यास असमर्थता दर्शविलेली आहे. प्राप्त झालेली कोटेशन खालील प्रमाणे.

**अ) एक- टोयोटा ईनोव्हा करीता**

०१. वासन टोयोटा,नाशिक

०२. डि.एस.के.टोयोटा, अहमदनगर.

**ब) एक- महिंद्रा स्कॉर्पिओ करीता**

०१. श्रीराम ऑटोमोबाईल्स,अहमदनगर

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत उघडण्यात येऊन,कोटेशनसादरकर्त्यांना चर्चा/वाटाघाटीसाठी समक्ष बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

**अ) एक- टोयोटा ईनोव्हा करीता**

| अ.नं. | कोटेशन सादर कर्त्याचे नाव | कोटेशनमधील दर रुपये | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | वासन टोयोटा,नाशिक | ११,०९,०००.०० | अनुपस्थित |
| ०२ | डि.एस.के.टोयोटा, अहमदनगर/पुणे | ११,०८,०००.०० | १०,८०,०००.०० |

**ब) एक- महिंद्रा स्कॉर्पिओ करीता**

| अ.नं. | कोटेशन सादर कर्त्याचे नाव | कोटेशनमधील दर रुपये | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | श्रीराम ऑटोमोबाईल्स,अहमदनगर | ९,९०,९००.०० | ९,६५,९००.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन,संस्थानचे वापराकरिता एक-टोयोटा ईनोव्हा किंवा एक-महिंद्रा स्कॉर्पिओ ऐवजी दोन टोयोटा ईनोव्हा मे. डि.एस.के.टोयोटा, पुणे यांचेकडून त्यांनी देऊ केलेल्या निम्नतम दराने खरेदी करण्यात याव्यात,असें ठरलें. (कार्यवाही-वाहन विभाग प्रमुख)

**विषय नं.१४ कन्याशाळासाठी संगणक व फर्निचर खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून चर्चा/ वाटाघाटीने निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.८३१** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०६.०९.२००८ मधील निर्णय क्र.६९७ (अ) अन्वये श्री साईबाबा कन्या विदया मंदिरामध्ये इयत्ता ५ वी ते १० वी या वर्गातील अभ्यासक्रमामध्ये कार्यानुभव या विषयांतर्गत माहिती व तंत्रज्ञान या विषयाचे प्रात्याक्षिकासाठी आवश्यक असणारे संगणक संच व फर्निचर खरेदी करणेस व त्याकामी येणारे रक्कम रु.११,४४,५००/- पर्यंतचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार दि.०१ ते ०३.१०.२००८ चे दरम्यान वर्तमानपत्रात जाहिरात देऊन दि.०३.१०.२००८ ते दि.१३.१०.२००८ अशी निविदा विक्री मुदत ठेवणेत आलेली होती. तसेच निविदा स्विकारणे मुदत दि.१५.१०.२००८ अशी ठेवणेत आलेली होती. मुदतीअंती प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव व गांव |
|---|---|
| ०१. | आर.डी.डाटा सिस्टीम्स, नाशिक |
| ०२. | सोहम ट्रेडींग कार्पोरशन, नाशिक- |
| ०३. | रोहरा कॉम्प्युटर प्रॉडक्टस, मुंबई |

उपरोक्त सर्व निविदाधारकांना आजचे सभेपुढे चर्चेसाठी आमंत्रित करणेत आले होते. परंतू संगणकाच्या मॉडेलमध्ये बदल झाल्याने नविन मॉडलचे संगणक खरेदीकामी फेर कोटेशन मागविण्यात यावेत,असें ठरलें. (कार्यकारी-अधिक्षक,खरेदी विभाग)

**विषय नं.१५ नविन लेबर व सिक्यूरिटी ठेकेदार नेमणेसाठी निविदासादरकर्त्यांना चर्चा/वाटाघाटीसाठी बोलावून निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.८३२** संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल कामगार पुरविणारे मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.,पुणे व मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्यूरिटी (इंडिया) लि., नाशिक, लेबर कॉन्ट्रॅक्टर तसेच सुरक्षा कर्मचारी पुरविणारे मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि.,मुंबई, सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर, मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी अॅन्ड अलाईड सर्व्हिसेस प्रा.लि.पुणे, श्री साईबाबा हॉस्पीटल सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर व मे ईगल आय एन्टरप्राईज, वापी (गुजरात), माजी सैनिक, सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर यांचे कॉन्ट्रॅक्ट/कराराची वाढीव मुदत दि.३१-१२-२००८ अखेर संपत आहे.

संस्थानला अकुशल, कुशल कामगार व अनुभवी सुरक्षा कर्मचारी, माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुढील एक वर्ष कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने पुरविणेसाठी नविन ठेकेदारांची/ कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेसाठी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दीस देवून, मान्यता प्राप्त ठेकेदारांकडून "सिलबंद निविदा" मागविणेत आल्या होत्या. त्याप्रमाणे मान्यता प्राप्त कंत्राटदारांकडून/ठेकेदारांकडून संस्थानचे शिरडी कार्यालयास ३८ व मुंबई कार्यालयास ०७ अशा एकूण-४५ सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहे. सदरच्या ४५ सिलबंद निविदा मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८-१०-२००८ रोजीचे सभेमध्ये उघडणेत येऊन, त्याबाबत तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे. तो आजचे सभेत सादर करण्यात येऊन, संबंधीत निविदा सादर केलेल्या ठेकेदारांना चर्चा/वाटाघाटीसाठी उपस्थित राहणेबाबत कळविणेत आलेले होते.

याबाबत आजचे सभेत चर्चा होवून, ठेकेदार संस्थानचे टेंडर/निविदा भरतो. परंतू त्याची कंत्राटी कर्मचारी पुरविणेची क्षमता नसते. याकरीता ज्या ठेकेदारांची वार्षीक उलाढाल रुपये एक कोटीपेक्षा जास्त आहे अशा ठेकेदारांचाच विचार करणेत यावा, असे ठरले.

त्यानुसार एकूण ४५ ठेकेदारांना चर्चा/वाटाघाटीसाठी आमंत्रीत करण्यात आले होते.पैकी ४२ ठेकेदार आजचे सभेत समक्ष उपस्थित होते. त्यांना सभागृहात एकत्रीत बोलविणेत येवून, सभेचे सुरवातीस उपस्थित सर्व कंत्राटदारांना मा. अध्यक्ष महोदयांनी किमान वेतनाचे दर, भविष्य निर्वाह निधी, सर्व्हिस टॅक्स, कामगार नुकसान भरपाई, बोनस, सानुग्रह अनुदान, रजा व पगारी सुट्टया, ग्रुप इन्शुरंन्स, घरभाडे भत्ता, उपदान, आयकर, टी.डी.एस., ई.एस.आय.सी., कामगार कल्याण निधी इत्यादी उत्तर दायीत्वाची (आर्थिक जबादाऱ्यांची) जाणीव करुन दिली.कंत्राटी अकुशल, कुशल कामगार व कंत्राटी सिव्हीलीयन सिक्युरिटी गार्ड यांना किमान वेतनदराने देय्य वेतन (मुंबई कार्यालयातील सुरक्षा गार्ड व अकुशल कंत्राटी कामगारांना बॉम्बे शॉप ॲन्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंट झोन नं.१ प्रमाणे व इतर कंत्राटी कामगारांना झोन नं.३ प्रमाणे देय्य असलेले किमान वेतनदर), प्रॉव्हीडंट फंडापोटी मालकाचा हिस्सा त्यावरिल प्रशासकीय चार्जेससह अंशदान @ १३.६१%, सर्व्हिस टॅक्स @१२.३६% व कामगार नुकसान भरपाई अधिनियम अंतर्गत ग्रुप इन्शुरंन्स प्रिमियम (अंशदान) या कारणासाठीची रक्कम लेबर व सिक्युरिटी ठेकेदाराला संस्थानकडून देण्यात येईल. या व्यतिरिक्त इतर सर्व कायदेशीर उत्तर दायीत्वाची जबाबदारी (कायदेशीर आर्थिक जबाबदारी) कंत्राटदाराची राहील. अशा रितीने कंत्राटदार म्हणून आपल्या वरील संभाव्य संपूर्ण कायदेशीर आर्थिक बोजा (जबाबदारी) लक्षात घेवूनच त्यांनी कंत्राटी अकुशल, कुशल कामगार, सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी यांच्या संबंधीत त्यांनी देवू केलेल्या दरात आणखी सुट देणार किंवा कसे? याबाबत माहिती (अंतिम सुधारीत दरपत्रक) लेखी स्वरुपात बंद पाकीटात दि.२०-११-२००८ अखेर संस्थानकडे सादर करावी असे त्यांना सांगणेत आले.

ठेकेदारांनी देवू केलेले अंतिम सुधारीत दरपत्रक (बंद पाकीट) मा.कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडणेत येऊन, त्याबाबत तुलनात्मक तक्ता तयार करुन, तो व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा, असे ठरले. (कार्यवाही-कामगार अधिकारी)

**विषय नं.१६** **लाडू विक्रीचे ठिकाणी कॅश काऊंटरचे सुरक्षिततेकरीता ग्रील बसविणेकामी प्राप्त झालेली कोटेशन्स उघडून कोटेशनधारकांशी चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.८३३** लाडू विक्रीचे ठिकाणी कॅश काऊंटरचे सुरक्षिततेकरीता ग्रील बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून तयार करुन घेणेसाठी एकुण रक्कम रुपये २,६८,०७८.०० इतक्या खर्चाचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६-०९-२००८ चे झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. हा प्रस्ताव या सभेत विषय क्र.०८ निर्णय क्र. ६४० (२४) अन्वये मान्य करण्यात आला असून या कामासाठी बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉप धारकांकडून कोटेशन मागवावेत असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉप धारकाना पत्र पाठवून कोटेशन मागविण्यात आली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे ०५ कोटेशन प्राप्त झाले आहेत. कोटेशन तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.न | कोटेशन्ससादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१ | मे.साईनाथ फॅब्रिकेटर्स ॲण्ड फर्निचर,श्रीरामपूर |
| ०२ | मे. आकार मशिन्स प्रा.लि., नाशिक |
| ०३ | मे.प्रणव कार्पोरेशन,पुणे |
| ०४ | मे.साई इंजिनिअर्स , अंबड, नाशिक |
| ०५ | मे.आशय मशिन्स प्रा.लि., नाशिक |

उपरोक्तप्रमाणे लाडू विक्रीचे ठिकाणी कॅश काऊंटरचे सुरक्षिततेकरीता ग्रील तयार करुन घेणेसाठी प्राप्त झालेली कोटेशन आजचे सभेपुढे उघडणेत येऊन कोटेशनसादरकर्त्यांना चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.न | कोटेशन्ससादरकर्त्याचे नांव | कोटेशनमधील दर रुपये | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | मे.साईनाथ फॅब्रिकेटर्स ॲण्ड फर्निचर,श्रीरामपूर | २,९३,५९०.०० | २,९०,६५४.०० |
| ०२ | मे.साई इंजिनिअर्स , अंबड, नाशिक | २,५९,४२५.०० | २,२८,२९४.०० |
| ०३ | मे.आशय मशिन्स प्रा.लि., नाशिक | २,८२,६८४.०० | अनुपस्थित |
| ०४ | मे.आकार मशिन्स प्रा.लि., नाशिक | ३,००,०००.०० | अनुपस्थित |
| ०५ | मे.प्रणव कार्पोरेशन,पुणे | २,७०,०००.०० | अनुपस्थित |

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त तक्त्यातील अ.नं.०२ चे कोटेशनसादरकर्ते मे.साई इंजिनिअर्स, अंबड, नाशिक यांचे निम्नतम दर स्वीकारणेत येऊन,त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें.

(कार्यवाही-विद्युत विभाग प्रमख)

**विषय नं.१७** **कनकुरी साठवण तलाव येथे नियोजित वाढीव फिल्टर प्लॅन्ट व पाईपलाईकामी आलेल्या सल्लागाराच्या निविदा उघडणेबाबत.**

**निर्णय क्र.८३४** संस्थानचे भविष्यातील वाढत्या पाण्याची गरज लक्षात घेता साठवण तलाव ते ओहर हेड टँक व ओहर हेड टँक ते जुने प्रसादालय परिसर तसेच धर्मशाळा (२०० रुम) व प्रसादालय ते नविन भक्तनिवास (५००रुम) तसेच नविन प्रकल्पासाठी वितरीका टाकणे, नविन जल शुध्दीकरण केंद्राची निर्मिती करणे गरजेचे आहे. याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कोपरगांव यांनी सर्व्हे केलेला आहे. सदर अंदाजपत्रकास मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६-०३-२००८ चे सभेतील निर्णय क्रं.२५२ नुसार एकुण ७,४८,६५,५४०/- मात्रचे खर्चास व सदर प्रस्तावास तत्वतः मान्यता देण्यात आली.

तथापी याबाबत संस्थानमार्फत कंन्सलटंटची नियुक्ती करुन सदरहू काम करणेबाबत यथावकाश पुढील निर्णय घेणेत यावा असे ठरले आहे. त्यानुसार दि. २७-०९-२००८ रोजीचे टिपणीन्वये सोबतचे १२ कंन्सलटंट यांना इकडील जा.क्रं./एसएसएस/वशी/पा.पु./१४३३८/२००८, दि. ३०-०९-२००८ अन्वये पत्र पाठवून त्यांचेकडून सविस्तर प्रस्ताव बोलविण्यात आलेले होते व प्रस्ताव सादर करणेसाठी कन्सलटंट यांना दि.१६-१०-२००८ रोजी पर्यंत मुदत देण्यात आलेली होती. परंतू उपरोक्त कालावधीत प्रस्ताव सादर न झाल्यामुळे दि. १६-१०-२००८ रोजीचे टिपणीन्वये १२ कंन्सलटंट यांना इकडील जा.क्रं./एसएसएस/ वशी/पा.पु./ १५४४१/२००८, दि.१७-१०-२००८ अन्वये पुन्हा पत्र पाठवून सदरचे प्रस्ताव सादर करणेसाठी दि. २३-१०-२००८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती.

त्यानुसार खालील प्रमाणे कोटेशन्स् बंद पाकीटामध्ये आलेले आहेत.

| अ.नं. | तपशिल |
|---|---|
| ०१. | किर्लोस्कर कन्सल्टंटन्स् लिमिटिड पुणे |
| ०२. | युनिटी कन्सल्टंटन्स् प्रा.लि.पुणे |
| ०३. | सिंडिकेट सर्व्हीसेस, नाशिक |
| ०४. | में. पी.पी. गोगड, नाशिक |
| ०५. | डॉर्सच् कंन्सल्ट (इंडिया) प्रा.लि.मुंबई. |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन आजचे सभेत उघडण्यात आले. या कोटेशनचा तुलानात्मक तक्ता तयार करुन कोटेशनधारक सल्लागारांना चर्चा/वाटाघाटीसाठी व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे आमंत्रित करण्यात यावे,असें ठरलें. (कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग प्रमुख)

**विषय नं.१८** **श्रीसाईबाबा रुग्णालयातील युरोलॉजी विभागासाठी लागणारे इन्स्ट्रुमेंट खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.८३५** श्री साईबाबा रुग्णालयात डॉ. राजन पाटणी, मानद युरोलॉजिस्ट म्हणून हजर झालेले आहे. डॉ. राजन पाटणी महिन्यातून दोन वेळा भेटी देणार असून ते युरोलॉजी संबंधी सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया रुग्णालयात करणार आहेत. सदरचे इन्स्ट्रूमेंट ही सध्या दैनंदीन शस्त्रक्रियेंसाठी आवश्यक आहेत. श्री साईबाबा रुग्णालयात सदरचा विभाग हा नव्यानेच सुरु होत असल्याने या विभागात युरोलॉजीची इन्स्ट्रुमेंट नाहीत व ती सर्व नवीन खरेदी करावी लागणार आहेत. सदरचे इन्स्ट्रूमेंट खरेदीकामीचा रु.२०,००,०००/- च्या खर्चाचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०७/०७/२००८ चे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. सदरचे खरेदीकामी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहीरात देऊन निविदा मागवून खरेदी करणे बाबत निर्णय झालेला आहे.

त्यानुसार उपरोक्त खरेदीकामी संस्थानच्या जनसंपर्क कार्यालयामार्फत महाराष्ट्र टाइम्स - मुंबई, इंडीयन एक्सप्रेस - पुणे या वतर्मान पत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.०७/०८/२००८ ते दि.२१/०८/२००८ अखेर संस्थानच्या शिर्डी व मुंबई कार्यालयात निविदा विक्रिसाठी ठेवण्यात आल्या होत्या व निविदा स्विकारण्याची अंतीम मुदत दि.२३/०८/२००८ अखेर ठेवण्यात आली होती. मुंबई कार्यालयात ७ निविदा विक्रिसाठी ठेवण्यात आल्या होत्या तर शिर्डी कार्यालयात ३ निविदा विक्रिसाठी ठेवण्यात आल्या होत्या. तसेच वर्तमान पत्रातील जाहिरातीबाबत अवगत करणेसाठी १० अधिकृत विक्रेत्यांना इकडील पत्र क्रमांक ११६५४ दि.०९/०८/२००८ अन्वये कळविण्यात आले होते.

त्यास अनुसरुन शिर्डी व मुंबई येथील कार्यालयात एकूण ०६ निविदा प्राप्त झालेल्या आहेत त्या खालीलप्रमाणे -

01) Critical Care Systems, Pune
02) Kalelkar Surgical Pvt.Ltd., Mumbai
03) Summit Healthcare (P) Ltd., Mumbai
04) Chimco Bio-medical Engineering Co., Mumbai
05) Nidhi Meditech Systems, Ahmedabad
06) Eagle Medical Systems Pvt.Ltd., New Delhi

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात आल्या. या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात येऊन तो त्या क्षेत्रातील दोन तज्ञ डॉक्टरांना दाखवून चर्चा/ वाटाघाटीसाठी मा. व्यवस्थापन समिती पुढील सभेपुढे ठेवण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.१९** **गुंतवणूकीबाबत**

**निर्णय क्र.८३६** **अ)** माहे नोव्हेंबर,२००८ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे : -

| अ.नं. | तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| १) | किसान विकास पत्र, श्रीरामपूर | १६/११/२००८ | ६४,००,०००.०० |
| २) | किसान विकास पत्र, श्रीरामपूर | १९/११/२००८ | १,३६,००,०००.०० |
| ३) | दैनंदिन खर्च वजा जाता माहे नोव्हेंबर २००८ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी अंदाजे रक्कम | | ५,००,००,०००.०० |
| | | **एकूण** | **७,००,००,०००.००** |

वरील तपशीलानुसार साधारणतः रक्कम **रु. ७ कोटी** गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहेत. उपलब्ध होणारी रक्कम ही नियमित सेवा देणा-या बँकेकडे उच्चतम व्याज दराने गुंतविल्यास त्यांचेकडून संस्थानला जास्तीत-जास्त सेवाही मिळविता येतील. विश्वस्तव्यवस्थेचे वैधानिक लेखापरिक्षण करतेवेळी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/सेवा देणा-या बँकेकडेच जास्तीत-जास्त व्याजदराने गुंतविण्यात यावी असे लेखापरिक्षक यांनी सुचविले असल्याने, संस्थानला प्रामुख्याने सेवा देणा-या खालील बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे सदरची गुंतवणूक करता येईल असे नम्र मत आहे :-

| | |
|---|---|
| ०१) युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी | ०२) सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी |
| ०३) आंध्र बँक, शिर्डी | ०४) स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी |
| ०५) बँक ऑफ बरोडा, कोपरगांव | ०६) बँक ऑफ बरोडा, नासिक |
| ०७) बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी | ०८) विजया बँक, शिर्डी |

तरी वरील अ.नं. १ ते ८ या बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु.७ कोटींची गुंतवणूक टप्प्या-टप्प्याने करण्यास मान्यता मिळणेस

**ब )** तसेच दि. ८.११.२००८ पूर्वी संस्थानच्या बचत खात्यात रु. ३.५० कोटी इतकी रक्कम गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असल्याने व व्यवस्थापन समितीच्या सभेसाठी अवधी असल्याने उपरोक्त रक्कम रु.३.५० कोटीची गुंतवणूक करणेकामी वरीलप्रमाणे अ.नं. १ ते ८ या संस्थानला सेवा देणा-या राष्ट्रीयकृत बँकेकडून व्याजदर मागविण्यात आले होते. यामध्ये बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी यांनी १ वर्षाकरीता ११.२० % हा सर्वात जास्त व्याजदर देऊ केल्याने मा.अध्यक्षसाो यांचे मान्यतेने बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी यांचेकडे एकूण रु.३.५० कोटीची गुंतवणूक ११.२० % या व्याजदराने दि.१०.११.२००८ रोजी करण्यात आलेली आहे. त्यास कार्योत्तर देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,वरीलप्रमाणे **अ** मध्ये नमूद केल्याप्रमाणे अ.नं. १ ते ८ या बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु.७ कोटींची गुंतवणूक टप्प्या-टप्प्याने करण्यात यावी. तसचे **ब** मध्ये नमूद केलेल्या गुंवणूकीस कार्योत्तर मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.२०** **संस्थान कर्मचाऱ्यांसाठी सवलतपात्र गृहकर्जाच्या सुधारित नियम व अटी बाबत**

**निर्णय क्र.८३७** संस्थानच्या कायम कर्मचाऱ्यांना सवलतीच्या दराने राष्ट्रीयकृत बँकेकडून गृहकर्ज उपलब्ध करुन देऊन, व्याजाचा निम्मा आर्थिक भार संस्थानने आदा करावयाचा ही योजना संस्थानने सुरु केलेली आहे. या योजनेसाठी गृहकर्जाची स्थायी समिती स्थापन करण्यात आलेली आहे. या समितीचे सभासद पुढीलप्रमाणे**:** अधिक्षक आस्थापना, वरिष्ठ मुख्य अभियंता, मुख्य लेखाधिकारी, सर्व प्रशासकीय अधिकारी आणि कार्यकारी अधिकारी.

या योजनेचा लाभ आजपर्यंत साधारणतः३०० कर्मचाऱ्यांनी घेतलेला आहे. त्यापैकी काही कर्मचाऱ्यांनी श्री साईश्रध्दा हौसिंग सोसायटीमध्ये काहींनी श्री साईप्रसाद हौसिंग सोसायटीमध्ये तसेच काही कर्मचाऱ्यांनी वैयक्तिक गृहकर्ज योजनेअंतर्गत भाग घेतलेला आहे.

सदर कर्मचाऱ्यांच्या कागदपत्रांची, संस्थान नियमावलींच्या अटीस अधिन राहून पुर्तता करुन दर महिन्याला गृहकर्जाच्या स्थायी समितीच्या सभासदांची सभा घेऊन त्याच्या वेतनानुसार गृहकर्ज मंजुर केले जाते. तथापि, दिनांक १४ ऑगष्ट, २००८ रोजी स्थायी समितीची सभा घेण्यात आली. राज्य शासनाकडील गृहकर्जासंदर्भातील नियमावली मागवून पुर्वीच्या नियमावलीत सुधारीत बदल करण्यात आला व तो आजचे सभेत सादर करण्यात आला होता, तो मान्य करण्यात आला.

०१) कर्मचाऱ्यांची संस्थान सेवा ही कमीत कमी ५ वर्ष झालेली असावी. तसेच त्याची उर्वरीत सेवा गृहकर्ज संपेपर्यंत असली पाहीजे. अशाच कर्मचाऱ्यांच्या बाबतीत गृहकर्ज संदर्भात विचार केला जाईल.

०२) ज्या कर्मचाऱ्यांना गृहकर्ज घ्यावावयाचे आहे त्यांचे स्वतःचे नावावर जागा असेल तरच त्याला सवलत देण्यात येईल. इतरांकडून घेतलेले संमतीपत्र चालणार नाही.

०३) संस्थान कर्मचाऱ्यांस गृहकर्ज हे त्यांच्या पगाराच्या (Basic + D.P. + D.A.) ४० पट किंवा जास्तीत जास्त रुपये १० लाख यात जी रक्कम कमी असेल ती देण्यात येईल.

०४) संस्थान कर्मचाऱ्यांने जामीनदार घेतांना, जामीनदार कर्मचाऱ्याची संस्थान सेवा कमीत कमी ५ वर्ष झालेली असावी.

०५) कर्जदाराकडून गृहकर्जाची परतफेड झाली नाही तर, त्याला संस्थानकडून देय असलेल्या रकमेतून वसूल करण्यात येईल. त्यातून परतफेड झाली नाही तर ती जामीनदाराकडून वसूल करण्यात येईल.

०६) संस्थानचे संमतीशिवाय गृहकर्ज बँकेकडून परस्पर घेतले असेल तर त्यांना व्याजाची सवलत देण्यात येणार नाही. अशा प्रकरणात गृहकर्जाचा हप्ता वसुल करुन बँकेस भरणा करण्याचे बंधन संस्थानवर राहणार नाही.

०७) गृहकर्जात भाग घेतलेल्या कर्मचाऱ्यांना संस्थानची संमती घेतल्याशिवाय सदनिकेची विक्री करता येणार नाही अथवा अन्यप्रकारे मालमत्तेची विल्हेवाट लावता येणार नाही, अशा आशयाचे पत्र सब रजिस्ट्रार, राहाता यांना देण्यात यावे.

०८) ज्या कर्मचाऱ्याने गृहकर्ज घेतलेले असेल व त्याने राजीनामा दिला किंवा काही कारणास्तव संस्थान सेवा संपुष्टात आली तर त्यांना देण्यात आलेली व्याजाची सवलत त्यांना देय असलेल्या रकमेतून अथवा रोखीने भरुन घेण्यात येईल.

०९) ज्या कर्मचाऱ्यांना गृहकर्जाची सवलत दिलेली आहे व त्यांची बांधलेली घरे / तयार सदनीका / सोसायटीतील घरे जर भाड्याने दिली असतील व ते संस्थानचे खोलीत राहत असतील तर त्यांना व्याजाची सवलत देण्यात येणार नाही व आजपर्यंत दिलेल्या संस्थान व्याजाच्या सवलतीची वसुली करण्यात येईल. तसेच त्यांचा खोली वापरण्याचा सेवा आकार तिप्पट करण्यात येईल.

१०) ज्या कर्मचाऱ्यांना गृहकर्जाची सवलत दिली आहे (वैयक्तिक गृहकर्ज, श्री साईश्रध्दा हौसिंग सोसायटी, श्री साईप्रसाद हौसिंग सोसायटी) परंतु ते सवलतीच्या बांधलेल्या घरात रहात नसुन त्यांनी घर भाड्याने दिलेले आहेत व स्वतः पुर्वीच्या जुन्या घरात राहत आहे अशा कर्मचाऱ्यांच्या घराची तात्काळ पाहणी करुन संस्थान व्याजाची सवलत तात्काळ बंद करण्यात येईल व आजपर्यंत दिलेल्या संस्थान व्याजाच्या सवलतीची वसुली करण्यात येईल.

११) RBI च्या धोरणानुसार व्याजदरात वेळोवेळी बदल झाल्याने (वाढल्याने किंवा कमी झाल्याने) सर्व संबंधीत गृहकर्ज धारकांना तो व्याजदर तात्काळ लागु करण्यात येईल.

१२) गृहकर्ज घेतलेल्या कर्मचाऱ्यांच्या सदनिकेस वेळोवेळी स्थायी समितीचे सदस्य भेट देतील व निरिक्षणाबाबतचा अहवाल सादर करण्यात येईल.

१३) दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी गृहकर्जाची बैठक बोलविण्यात यावी.

१४) ज्या कर्मचाऱ्यांनी १५ किमीच्या बाहेर घरे बांधलेली आहे व ते त्या घरात राहत नाही तसेच ती भाडयाने दिलेली आहे त्या कर्मचाऱ्यांची संस्थानची सवलत बंद करण्यात येईल, तसेच ते जर संस्थान खोलीत राहत असतील तर सेवा आकार तिप्पट करण्यात येईल. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.२१** **संस्थानला प्राप्त झालेल्या मौल्यवान खड्यांची (Stones) जाहीर लिलावाव्दारे विक्री करणे बाबत.**

**निर्णय क्र.८३८** श्री साईभक्तांकडून देणगीरुपात स्वतंत्रपणे अथवा सोने-चांदीचे अलंकार - वस्तूसह मौल्यवान खडे संस्थान व्यवस्थापनाकडे साठलेले होते. मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २७ डिसेंबर, २००४ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १४२ नुसार, अशा साठलेल्या सर्व खडयांचे ( Stones ) मुल्यांकन (Off Set Value) करुन घेणेसाठी आयकर / अबकारी विभागाकडून मान्यता प्राप्त असलेले तज्ञ मुल्यांकनकार नेमून किमान दोन सदस्यांचे उपस्थितीत मुल्यांकन (Off Set Value) करुन घेण्यात यावे, असा निर्णय झालेला होता. तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक०४ फेब्रुवारी, २००७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १० नूसार, याकामी मा. उपाध्यक्ष महोदय यांचे मार्गदर्शन घेऊन अंतिम निर्णय घेण्यात यावा, असा निर्णय झालेला होता. वरील निर्णयानूसार सोने-चांदी - वस्तु अलंकाराचे टंच काढणे व खडयाचे मुल्यांकनासाठी (Off Set Value) शासकीय मान्यता प्राप्त संस्थाची निवड यादीतुन मा.अध्यक्ष महोदय यांचे मान्यतेने मे. हिरो कालरा जेम्स ज्वेलर्स, पुणे, एबी आडगांवकर, नासिक या शासनमान्य मुल्यांकनकारांची याकामी नेमणुक करण्यात आलेली आहे.

वरीलप्रमाणे नेमणुक केलेले मुल्यांकनकार व संस्थान नियुक्त मुल्यांकनकार यांचे कडून संस्थानचे स्ट्रॉंगरुम मध्ये सिलबंद पिशव्यातील खडे सर्वांसमक्ष उघडण्यात येऊन त्यांचे वेगवेगळया मशिन्स मध्ये पाहणी/पडताळणी करुन एकमताने संस्थानचे वैधानिक लेखापरिक्षक, पुर्व लेखापरिक्षक, अंतर्गत लेखापरिक्षक यांचे प्रतिनिधींचे उपस्थितीत मुल्यांकन करुन घेण्यात आले आहे.

उपरोक्त निर्णयान्वये नेमणुक केलेल्या शासनमान्य मुल्यांकनकाराकडून सन २००० ते मार्च,२००८ पर्यंतच्या कालावधीत प्राप्त झालेले तथा संचित असलेले खडयांचे ( Stones) मुल्यांकन करुन घेण्यात आलेले असुन त्यापैकी रक्कम रुपये १०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार) मात्रचे वरील किमंतीच्या खडयांच्या स्वंतत्र पिशव्या (पुडया) करुन श्री दिनेश कालरा, मे. हिरो जेम्स ज्वेलरी, पुणे यांचे सहीने सिलंबद करुन स्ट्रॅंगरुममध्ये ठेवण्यात आले आहेत. दिनांक ३१ मार्च,२००७ रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णय क्रमांक २९७ नूसार, मुल्यांकन केलेल्या खडयांपैकी रक्कम

रुपये १०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार ) मात्रचे वरील खडे वगळता उर्वरीत सर्व खडे वर्षनिहाय कापडकोठी मार्फत मुल्यांकनकाराने ठरविलेल्या किमंतीपेक्षा जास्त दराने विक्रीस व लिलावाव्दारे टप्प्याटप्प्याने भक्तांना उपलब्ध करुन देणेबाबत निर्णय झालेला होता. सदरच्या निर्णयानूसार रक्कम रुपये १०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार ) मात्र चे आतील रक्कमेचे खडे वर्षनिहाय टप्प्याटप्प्याने कापडकोठी व सप्ताहातील लिलावाव्दारे मुल्यांकनकारांनी निर्धारीत केलेल्या किमंतीपेक्षा जास्त दराने विक्री करण्यात येत असून त्यास भक्तांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.

उपरोक्त मान्य कार्यपध्दतीमुळे रुपये १०,०००/- पेक्षा जास्त मुल्य असलेले खडे संस्थानकडे शिल्लक आहेत. सदर किमंती खडेही लिलावाव्दारे विक्री करणेकामी खालीलप्रमाणे प्रस्तावित करणेत येत असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**(अ)** वरील प्रमाणे मुल्यांकन केलेल्या रक्कम रुपये १०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार )पेक्षा जास्त मुल्य असलेल्या खडयांचे वर्षनिहाय टप्प्याटप्प्याने गर्दीनूसार जाहीर लिलावाव्दारे मुल्यांकनकारांनी निर्धारीत केलेल्या किंमती पेक्षा जास्त दराने विक्री करण्यास स्थायी मान्यता मिळणेस विनंती.

**(ब)** माहे डिसेंबर, २००८ या महिन्यात होणारी संभाव्य गर्दीचे अनुषंगाने डिसेंबर,२००८ मध्ये मा.स्थानिक विश्वस्तांचे उपस्थितीत सोने-चांदी वस्तुंच्या लिलावाचे वेळीच सदर खडयांचीही जाहीर लिलावाने विक्री करण्यास मान्यता मिळणेस विनंती. याकामी जाहीर लिलावास निवडक वर्तमानपत्राव्दारे प्रसिध्दी देऊन साईभक्तांना आवाहन करता येईल.

यावर सविस्तर चर्चा होऊन वरील “अ” प्रमाणे मान्यता देण्यात आली. आणि रुपये १०,०००/- किंमतीची आतील खडे काऊंटरवर किंमती टाकून विक्री करण्यात यावी तसेच रुपये १०,०००/- पेक्षा जास्त किंमतीचे खड्यांची इंटरनेटवर फोटोसह प्रसिध्दी देण्यात येऊन माहे डिसेंबर, २००८ या महिन्यात होणारी संभाव्य गर्दीचे अनुषंगाने डिसेंबर,२००८ मध्ये मा.स्थानिक विश्वस्तांचे उपस्थितीत सोने-चांदी वस्तुंच्या लिलावाचे वेळी अथवा स्वतंत्रपणे सदर खडयांचीही जाहीर लिलावाने विक्री करण्यात यावी असे ठरले. त्यासाठी आवश्यक मुल्यांकन प्रमाणपत्र पॅकिंग व इतर अनुषंगिक खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी )

**विषय नं.२२ सोने-चांदी कस लावून तपासणेकामी सराफांचे नेमणूकीस मुदतवाढ देणेबाबत**

**निर्णय क्र.८३९** संस्थानला दक्षिणापेटीव्दारे मिळणाऱ्या व लेखाशाखेत वेळोवेळी देणगी येणां-या सोने-चांदी वस्तु अलंकाराचा कस लावून तपासणी करणे, बाजारभावा प्रमाणे किमंत लावणे याकामी, सराफ (*Gold Valuer*)म्हणून श्री. रघुनाथ माधव नागरे, शिरडी व श्री. कमलाकर हरीभाऊ खरोटे,मनमाड (शासनमान्यता प्राप्त मुल्यांकनकार) मानद तत्वावर नेमणूक करण्यात आलेली आहे.

दिनांक १६ सप्टेंबर,२००६ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रमांक ६८४ अन्वये श्री. नागरे यांना दिनांक ०१ जानेवारी, २००७ पासून दोन वर्ष कालावधीसाठी दरमहा रुपये २,५००/- ( रुपये दोन हजार पाचशे ) मात्र मानधनावर नेमणुक करण्यात आलेली आहे. त्यांचे नेमणुकीची मुदत दिनांक ३१ डिसेंबर, २००८ पर्यत आहे. संस्थानला दक्षिणापेटीव्दारे प्राप्त होणां-या सोनेचांदी वस्तुंच्या संख्येत तसेच लेखाशाखेत देणगीरुपाने प्राप्त होणा-या सोने-चांदीच्या वस्तुंमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. समाधि मंदिर व परिसरातील दक्षिणापेटी मोजणीकामी श्री. नागरे स्वतः व त्यांचे मदतीसाठी त्यांचा मुलगा श्री गणेश नियमित उपस्थित असतात. अगदी अपवादात्मक परिस्थितीत श्री नागरे शिर्डी बाहेर असल्यास लेखाशाखेकडे आलेल्या वस्तुंचे त्यांचे मुलाकडून मुल्यांकन करुन घेण्यात येते. संस्थान कामाची निकड लक्षात घेता श्री नागरे यांची आहे त्या मानधनावर दिनांक ०१ जानेवारी,२००९ ते ३१ डिसेंबर,२०१० या दोन वर्षासाठी नेमणुक करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-मुख्य लखाधिकारी)

**विषय नं.२३ युनियन बँक ऑफ इंडिया, शाखा शिर्डी यांच्या जागेस मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.८४०** युनियन बँक ऑफ इंडिया ही संस्थानला चांगल्याप्रकारे बँकींग सेवा पुरवत आहे. बँकेचे संस्थानला नेहमीच सहकार्य असून, दक्षिणा पेटी मोजणी, देयकांचे धनादेश इत्यादी सेवा देण्यात तत्पर आहे. या सर्व सेवांचा विचार करुन बॅकेच्या शिर्डी येथील विस्तारीत कक्षासाठी संस्थानच्या घ्साईनाथ छायाङ इमारतीमध्ये एक वर्षासाठी जागा भाडेतत्वावर देण्यात आलेली आहे. बँकेने त्यांच्या दिनांक ०६/१०/२००८ च्या पत्रानुसार सदर जागेस पुढील एक वर्षासाठी मुदतवाढ देण्याची विनंती केली आहे.

बॅकेच्या विस्तारीत कक्षासाठी साईनाथ छाया इमारतीमध्ये जागा एक वर्षासाठी भाडे तत्वावर देण्यात आली होती. त्याची मुदत ३१ मार्च २००८ रोजी संपल्याने, त्यांनी दिनांक ०६/१०/२००८ च्या पत्रान्वये पुढील एक वर्षाच्या कालावधीसाठी करण्यात आलेल्या करारनाम्याचे नुतनीकरण करण्याची विनंती केली आहे. बँकेस यापूर्वी रुपये ७,५००/- मासिक भाडे आकारण्यात येत होते. पुढील नुतनीकरणासाठी त्यांना देण्यात आलेल्या जागेचे भाड्यामध्ये वाढ करुन ती रुपये १०,०००/- मासिक अशी ठेवावे असे मत आहे.

उपरोक्त विवेचनाप्रमाणे युनियन बँकेच्या विस्तारीत कक्षासाठी संस्थानच्या साईनाथ छाया इमारतीमध्ये देण्यात आलेल्या जागेचे पुढील एक वर्षाच्या करारनाम्याचे दिनांक ०१/०४/२००८ ते ३१/०३/२००९ या कालावधीसाठी नुतनीकरण करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या शिर्डी शहरात जागेचे बाजारभावात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. सबब युनियन बँक ऑफ इंडिया,शाखा शिर्डी यांना देण्यात आलेल्या जागेस बाजारभावाप्रमाणे दर देणेबाबत सांगण्यात यावे.

याचवेळी स्टेट बँक ऑफ इंडिया,शाखा शिर्डी या बँकेचे मंदिर परिसरातील ATM इतरत्र हलविणेबाबतचा निर्णय यापूर्वीच झालेला आहे. बँकेने ATM साठी साईनाथछाया इमारतीत जागेची मागणी केल्यास त्यांना बाजारभावाप्रमाणे दर देण्यास सांगण्यात यावे सदरची कार्यवाही विधी विभागामार्फत करण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी /विधी अधिकारी)

**विषय नं.२४** **आयकर कायदा,१९६१ कलम ३५ A/c च्या अंतर्गत मिळणाऱ्या देणगी प्रकल्प नुतनीकरण प्रस्तावाच्या मानधनाबाबत.**

**निर्णय क्र.८४१** संस्थानला आयकर कायदर १९६१ कलम ३५AC च्या अंतर्गत देणगी मिळण्यासाठी केद्र सरकारकडे प्रस्ताव दाखल करण्यात आला होता. प्रस्ताव दाखल करणेपासून ते त्यासंबधीत पुढील संपूर्ण कामकाज पहाणेसाठी मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक ५ नोव्हेंबर २००५ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णय क्र. ७२५ नुसार शास्त्री पुरोहीत ॲण्ड असोसीएट, पुणे यांची रुपये १,५०,०००/- मानधनावर नेमणूक करण्यात आली होती केद्र सरकारने सदर प्रकल्पाअंतर्गत रुपये ७५ कोटी देणगी आर्थिक वर्ष २००५-०६, २००६-०७ आणि २००७-०८ या तीन वर्षासाठी मंजूरी देण्यात आली. "शास्त्री पुरोहीत ॲण्ड असोसीएट, पुणे" यांना या कामकाजाचे संपूर्ण मानधन रुपये १,५०,०००/- अदा करण्यात आले आहे. सदर प्रकल्पांअंतर्गत मार्च २००८ अखेर देणगी रुपये ८५,५०,७६७/- जमा झाली आहे.

प्रकल्पाची मुदत ३१ मार्च २००८ रोजी संपत असल्याने सदर प्रकल्पाचा कालावधी पुढील तीन वर्षासाठी वाढविणे आवश्यक होते. हा कालावधी वाढविण्यासाठी "शास्त्री पुरोहीत ॲण्ड असोसीएट, पुणे" यांनी केद्र सरकारकडे मुदतवाढीचा प्रस्ताव सादर करुन, त्यास केद्र सरकारची अधिसूचना क्र. S.O.१४७३ (E) दिनांक १७ जून २००८ प्रमाणे पुढील तीन वर्षासाठी सन २००८-०९ पासून पुढे मुदतवाढ घेण्यात आली.

प्रकल्प मुदतवाढ घेणे, यासंबधीत दिल्ली येथील वेळोवेळी कामकाज पहाणे, प्रत्येक वर्षाअखेरचे हिशोब पत्रके विहित नमुन्यात केद्र सरकारला सादर करणे इ. कामकाजाबाबतचे शास्त्री पुरोहीत ॲण्ड असोसीएट, पुणे यांनी त्यांच्या दिनांक २२/१०/२००८ च्या बिलाप्रमाणे रुपये २,५०,०००/- एवढ्या रकमेची मागणी केली आहे.

उपरोक्त विवेचनाप्रमाणे शास्त्री पुरोहीत ॲण्ड असोसीएट, पुणे यांना ३५AC अंतर्गत देणगी प्रकल्पाची मुदतवाढ व इतर संबंधीत कामकाजासाठी त्यांनी मागणी केलेल्या मानधन रुपये २,५०,०००/- अदा करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, शास्त्री पुरोहीत ॲण्ड असोसीएट, पुणे यांना ३५AC अंतर्गत देणगी प्रकल्पाची मुदतवाढ व इतर संबंधीत कामकाजासाठी त्यांनी मागणी केलेल्या मानधन रुपये २,५०,०००/- बाबत मा.कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचेशी चर्चा करुन ते कमी करणेबाबत विनंती करावी असे ठरले.

याचवेळी स्टेट बँक ऑफ इंडीया, शाखा शिर्डी या बँकेचे मंदीर परीसरातील ए.टी.एम. अन्यत्र हलविणेबाबतचा ठराव यापूर्वीच झालेला आहे. बँकेने ए.टी.एम. साठी साईनाथ छाया इमारतीत जागा मागितल्यास त्यांना बाजारभावाप्रमाणे दर देण्यास सांगण्यात यावे, सदरची कार्यवाही संस्थानच्या विधी विभागामार्फत करण्यात यावी, असे ठरले. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी )

**विषय नं.२५** **राधा कलियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट,मुंबई यांनी मौजे रुई शिवारातील दान म्हणून देऊ केलेली हे.१०.१० आर जमीन दान म्हणून व काही जमिनींचे दर्यानानी ट्रस्टचे अधिकार दान म्हणून स्वीकारणेबाबत.**

**निर्णय क्र.८४२** **(अ)**मा. कार्यकारी विश्वस्त, राधा कलियनदास दर्यानानी ट्रस्ट, मुंबई यांनी दिनांक २० ऑक्टोबर, २००८ रोजीचे पत्रानुसार ट्रस्टमार्फत दान म्हणून देण्यांत येणाऱ्या मौजे रुई शिवारातील अंदाजे ५४ एकर ११ गुंठे जमिनीबाबत काही महत्वाच्या बाबी, अटी व शर्ती इकडील कार्यालयास कळविलेल्या आहेत. तसेच दर्यानानी ट्रस्टचे दिनांक ०८ ऑक्टोबर, २००८ रोजीचे पत्रात नमूद केलेल्या गट नंबरमधील जमिनींचा थोडक्यात तपशील खालीलप्रमाणे :

**(अ-१) राधा कलियनदास चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई यांचे नांवावर असलेल्या जमिनींची माहिती :**

| अ.नं. | गट नंबर | क्षेत्र हे-आर-चौमी | कब्जेदार सदरी नांव | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१ | २९३ | ०६-९६-००<br>००-३६-०० पोख<br>**०७-३२-००** | ट्रस्ट | संपूर्ण क्षेत्र ट्रस्टचे नांवावर आहे. पिकपहाणीस ट्रस्टचे नांव आहे. |
| ०२ | २७५ | **००-६९-००** | ट्रस्ट | संपूर्ण क्षेत्र ट्रस्टचे नांवावर आहे. पिकपहाणीस ट्रस्टचे नांव आहे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०३ | २८० | ००-५१-००<br>००-७१-००<br>००-६१-००<br>**०१-८२-००** | मधुकर परशराम वाबळे व इ. ३<br>सुधाकर पशराम वाबळे<br>ट्रस्ट | ६१ आर क्षेत्र ट्रस्टचे नांवावर आहे. |
| ०४ | २८३ | **००-४६-००** | ट्रस्ट | संपूर्ण क्षेत्र ट्रस्टचे नांवावर आहे. पिकपहाणीस ट्रस्टचे नांव आहे. |
| ०५ | २८४ | **००-४८-००** | ट्रस्ट | संपूर्ण क्षेत्र ट्रस्टचे नांवावर आहे. पिकपहाणीस ट्रस्टचे नांव आहे. |
| ०६ | २८५ | **००-५४-००** | ट्रस्ट | संपूर्ण क्षेत्र ट्रस्टचे नांवावर आहे. पिकपहाणीस ट्रस्टचे नांव आहे. |

थोडक्यात, वर तक्त्यात नमूद केलेल्या क्षेत्रापैकी दर्यानानी ट्रस्टचे नांवे असलेले क्षेत्र फक्त बक्षीसपत्राने घेता येईल, त्याचा गट नंबर निहाय गोषवारा खालीलप्रमाणे :

| अ.नं. | गट नंबर | दर्यानानी ट्रस्टचे नांवावर असलेले क्षेत्र |
|---|---|---|
| ०१ | २९३ | ०७ हे ३२ आर ०० चौमी |
| ०२ | २७५ | ०० हे ६९ आर ०० चौमी |
| ०३ | २८० | ०० हे ६१ आर ०० चौमी |
| ०४ | २८३ | ०० हे ४६ आर ०० चौमी |
| ०५ | २८४ | ०० हे ४८ आर ०० चौमी |
| ०६ | २८५ | ०० हे ५४ आर ०० चौमी |
| | एकूण | १० हे १० आर ०० चौमी |

**(अ-२) राधा कलियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई यांचे कायदेशीर अधिकार दान करण्यात येणाऱ्या जमिनींचा तपशिल :**

| **अ.नं.** | **गट नंबर** | **क्षेत्र हे-आर-चौमी** | **कब्जेदार सदरी नांव** | **शेरा** |
|---|---|---|---|---|
| ०१ | २९४ | ०२-९४-००<br>०२-९३-००<br>००-०३-०० पोख<br>**०५-९०-००** | राजेंद्र चांदमल भनसाळी<br>सुभाष चांदमल भनसाळी | पिक पहाणीस संबंधीत खातेदारांची नांवे आहेत. |
| ०२ | २७३ | ०१-९१-००<br>००-०१-०० पोख<br>**०१-९२-००** | भिमबाई बाबुराव कहांडळ | पिक पहाणी खुद्द आहे. सदरहू गटातील ०० हे ३० आर जमीन रेल्वेसाठी भूसंपादीत झालेली आहे. |
| ०३ | २७४ | ००-३७-००<br>००-२५-००<br>००-१२-००<br>**००-७४-००** | एकनाथ सहादु पठारे<br>शिवनाथ सहादु पठारे<br>रेल्वे कडे | पिक पहाणी खुद्द आहे. |
| ०४ | २८८ अ | ०३-०४-००<br>००-०२-०० पोख<br>**०३-०६-००** | लखीचंद कचरदास भंडारी | सदरहू गटातील ०० हे १२ आर जमीन रेल्वेसाठी भूसंपादीत झालेली आहे. |
| ०५ | २८८ ब | ००-५४-०० | पुष्पाताई लखीचंद भंडारी | सदरहू गटातील ०० हे १२ आर जमीन रेल्वेसाठी भूसंपादीत झालेली आहे. |
| ०६ | २८८ क | ००-९७-०० | पुष्पाताई लखीचंद भंडारी | |
| | **एकूण** | **१३-१३-००** | | अंदाजे ३२ एकर ३३ गुंठे |

वर नमुद केलेल्या जमिनींच्या इतर हक्कात सोसायटी व पतसंस्था यांची नांवे आहेत.

सदरहू जमिनींबाबत, कोपरगांव कोर्टात दावे चालू आहेत, असे दर्यानानी ट्रस्ट यांचे पत्रात नमूद केलेले आहे. उपरोक्त कायदेशीर हक्क सोडण्याच्या जमिनी ह्या दर्यानानी ट्रस्टच्या नांवावर नाहीत. ट्रस्ट फक्त त्यांचे असलेले कायदेशीर अधिकार संस्थानला देणार आहेत.

**(ब)** दर्यानानी ट्रस्ट यांनी **परिच्छेद अ-१** मधील २५ एकर १० गुंठे व **परिच्छेद अ-२** मधील १९ एकर ३३ गुंठे अशी मिळून एकूण अंदाजे २८ एकर ०३ गुंठे जमीन (त्यांचे म्हणणे प्रमाणे ५४ एकर ११ गुंठे) जमीन ते संस्थानला दान म्हणून देणेस तयार आहोत, असे नमुद केलेले आहे. वास्तविक, **परिच्छेद अ-२** मधील जमिनी संस्थानला लवकर मिळणे शक्य नाही.

**(क)** वर नमुद केलेल्या जमिनी खालील अटी शर्तींवर दान म्हणून देण्यांत येतील, असे त्यांनी त्यांचे पत्रात नमूद केलेले आहे :

०१. दान म्हणून देण्यात येणाऱ्या जमिनीपैकी किमान २५ एकर जमिनीत आध्यात्मिक अभ्यासाचे जागतिक दर्जाचे केंद्र उभारणेत यावे.

०२. सामाजिक विकास साधणाऱ्या अभ्यास केंद्राबाबत कमीत कमी ५ सदस्य असलेली उपसमिती स्थापन करणेत यावी. सदरहू उपसमितीतील किमान दोन सदस्य हे दर्यानानी ट्रस्टने नामनिर्देशीत केलेले असावेत.

०३. संस्थान मार्फत स्थापन करण्यात येणाऱ्या शैक्षणिक संस्थेमध्ये, दर्यानानी ट्रस्टने ज्यांच्या जमिनी विकत घेतलेल्या आहेत त्यांच्या कुंटूंबातील किमान दोन व्यक्तींना संस्थानच्या नोकरीत सामावून घ्यावे.

०४. संस्थानने स्वतःचे खर्चाने शैक्षणिक विद्यापीठाची उभारणी करावी. प्रस्तावित विद्यापीठाच्या नावात सुरुवातीस श्री साईबाबा यांचे नाव असणे आवश्यक आहे. त्यानंतर त्या संस्थेचे नांव असावे.

०५. सामाजिक विकास साधणे करीता सामाजिक विकास व्यवस्थापन प्रशिक्षण वर्ग चालू करणेत यावेत. तसेच शर्त क्रमांक ०२ मध्ये नमूद केलेल्या व्यतिरिक्त एक सदस्य नियोजित विद्यापीठाचे समितीत घेणेत यावा.

०६. सदर संस्थेत शिक्षण घेणेसाठी काही विद्यार्थी पुरस्कृत करण्याचा अधिकार दर्यानानी ट्रस्टला राहिल.

०७. जमीन दान दिल्यापासून ०१ वर्षाच्या विकास कामांना सुरुवात केली पाहिजे. शैक्षणिक संकुलाचे नकाशे (Layout) हे दर्यानानी ट्रस्टकडून मंजूर करुन घ्यावेत.

०८. दान दिल्यानंतर त्यांचे ट्रस्टचे ट्रस्टी संभाव्य दिवाणी अथवा फौजदारी दाव्यास जबाबदार नाहीत.

०९. दान दिलेल्या जमिनीपैकी किंवा लगतच्या जमिनींमध्ये -

(अ) कमीत कमी २०० जेष्ठ वृध्द नागरीकांची सोय होईल असे निवासस्थान बांधणे.

(ब) कमीत कमी २०० अनाथ मुलांसाठी निवासस्थान बांधणे.

(क) एका वेळेस कमीत कमी २००० किंवा जास्त वारकऱ्यांची सोय होईल, असे निवासस्थान बांधणे.

१०. वर नमुद केलेल्या जमिनींपैकी उरलेल्या जमिनीमध्ये सामाजिक विकास साधणारी शैक्षणिक संस्था उभारण्यांत यावी.

**(ड)** **परिच्छेद अ-२** मधील जमिनींबाबत दर्यानानी ट्रस्ट हे त्यांचे कायदेशीर अधिकार संस्थानला दान देणार आहेत. याबाबत दर्यानानी ट्रस्टशी पत्रव्यवहार करुन माहिती व कागदपत्रे मागवुन घेण्यांत येत आहे. त्यांचेकडून कागदपत्र आल्यानंतर संस्थान वकीलांचा कायदेशीर मार्गदर्शन व अभिप्राय घेणेत येईल. त्यानंतर **परिच्छेद अ-२** मधील जमिनींबाबत सविस्तर प्रस्ताव पुनःश्च मा. व्यवस्थापन समितीचे विचारार्थ सादर करण्यांत येईल.

**(इ)** **परिच्छेद अ-१** मध्ये नमूद केलेल्या जमिनी बक्षिसपत्राने घेणेबाबत मा. अध्यक्षसाो. यांचेशी चर्चा झालेली आहे. सदरहू चर्चे दरम्यान मा. अध्यक्षसाो. यांनी खालीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत :

०१. दर्यानानी ट्रस्टने **परिच्छेद अ-१** मधील देऊ केलेली जमीन बक्षिसपत्राने दान म्हणून स्वीकारणेत यावी.

०२. सदर क्षेत्रापैकी १५ एकर क्षेत्रामध्ये साईभक्तांसाठी निवासस्थाने, कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने बांधणे इत्यादी कामे करणेत यावीत व उर्वरित जागेत आध्यात्मिक केंद्र, अनाथाश्रम, वृध्दाश्रम व २००० वारकऱ्यांची सोय होईल असे निवासस्थान उभारणेत यावे.

०३. दर्यानानी ट्रस्टने दान देऊ केलेल्या जमिनींच्या पूर्वाश्रमीच्या मालकांच्या कुंटूंबातील दोन व्यक्तींना नोकरी देणे शक्य नाही.

०४. सामाजिक विकास साधणाऱ्या प्रशिक्षण वर्गांसाठी ०५ व्यक्तींची उपसमिती नेमण्यांत यावी. सदर शैक्षणिक वर्ग सुरु होण्याचे वेळेस जर उपसमिती नेमण्याचे निश्चित झालेतर दर्यानानी ट्रस्टने नामनिर्देशीत केलेल्या दोन व्यक्ती सदस्य म्हणून घेण्याऐवजी निमंत्रित सल्लागार म्हणून घेण्यांत याव्यात.

०५. शैक्षणिक संकुलामध्ये सुरु होणाऱ्या वर्गांसाठी जर शासनाने व्यवस्थापनाला कोटा मंजूर केला तर त्यावेळेस शासनाचे नियम व अटीप्रमाणे त्यावेळेस ठरेल त्याप्रमाणात दर्यानानी ट्रस्टने पुरस्कृत केलेले उमेदवार घेण्यांत येतील.

उपरोक्त बाबींबाबत मा.अध्यक्षसाो. हे दर्यानानी ट्रस्टच्या विश्वस्तांशी चर्चा करणार आहेत. त्यांनी नमूद केलेल्या इतर अटी स्विकारण्यांस हरकत नाही.

**(ई)** उपरोक्त परिच्छेदांमध्ये विवेचन केल्यानुसार खालील बाबतीत मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. :

०१. राधा कलियनदास दर्यानानी ट्रस्ट, मुंबई यांनी **परिच्छेद अ-१** मधील नमुद केलेल्या जमिनी दान म्हणून स्वीकारण्यांत याव्यात किंवा कसे ?

०२. दर्यानानी ट्रस्टचे दिनांक २० ऑगष्ट, २००८ रोजीच्या पत्रात नमुद केलेल्या अटीबाबत मा.अध्यक्षसाो. यांनी **परिच्छेद इ** मध्ये नमूद केलेल्या बाबींवर विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

०३. **परिच्छेद अ-२** मधील नमुद केलेल्या जमिनी बाबत दर्यानानी ट्रस्टकडून माहिती प्राप्त झालेनंतर सविस्तर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे विचारार्थ सादर करणे.

०४. राधा कलियनदास दर्यानानी ट्रस्ट, मुंबई ची **परिच्छेद अ-१** मधील जमिनी दान म्हणून स्वीकारणेचा निर्णय झालातर याबाबत सदर ट्रस्टने मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई

यांचेकडेस मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणे. तसेच सदरहू जमिनी बक्षिसपत्राने घेणेबाबत संस्थान वकीलांचा अभिप्राय घेणे, बक्षिसपत्राचा मसुदा तयार करणे, नोंदविणे इत्यादी कायदेशीर बार्बीसाठी व इतर अनुषंगिक बाबींसाठी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणे.

उपरोक्त प्रमाणे विविध बाबींवर निर्णय होणेकामी मा. कार्यकारी अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला होता. त्यावर मा. व्यवस्थापन समितीचे सभेत सविस्तर चर्चा करणेत आली. सदरहू चर्चेचेवेळेस मा. अध्यक्षसाो. यांनी दर्यानानी ट्रस्टचे जमिनीबाबत यापूर्वी झालेल्या निर्णयांस अनुसरुन करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती सभेस दिली. तद्नंतर मा. कार्यकारी अधिकारी यांनी सादर केलेल्या विस्तृत प्रस्तावावर खालीलप्रमाणे निर्णय घेणेत आला :

**अ)** राधा कालीयनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई यांनी प्रस्तावात **परिच्छेद अ-१** मध्ये नमूद केलेल्या मौजे रुई तालुका, राहाता जि. अहमदनगर येथील खालील गट नंबरमधील जमिनी संस्थानला बक्षिस पत्राने देऊ केलेल्या आहेत.

| **अ.नं.** | **गट नंबर** | **दर्यानानी ट्रस्टचे नांवावर असलेले क्षेत्र** |
|---|---|---|
| ०१ | २९३ | ०७ हे ३२ आर ०० चौमी |
| ०२ | २७५ | ०० हे ६९ आर ०० चौमी |
| ०३ | २८० | ०० हे ६१ आर ०० चौमी |
| ०४ | २८३ | ०० हे ४६ आर ०० चौमी |
| ०५ | २८४ | ०० हे ४८ आर ०० चौमी |
| ०६ | २८५ | ०० हे ५४ आर ०० चौमी |
| | **एकूण** | **१० हे १० आर ०० चौमी** |

उपरोक्त जमिनी हया बक्षीस पत्राने स्वीकारण्यांत याव्यात, तथापि तत्पुर्वी सदरहू जमिनीं निर्वेध व निर्धोक व बोजाविरहित असल्याबाबत सर्व कायदेशीर बाजु तपासून पाहण्यांत याव्यात. उपरोक्त जमिनी संस्थानला बक्षिसपत्राने देणेबाबत मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची परवानगी राधा कलियनदास दर्यानानी ट्रस्टने यांनी मिळविणे आवश्यक राहील. सदरहू जमिनीं बक्षिसपत्राने घेणेबाबत कराव्या लागणाऱ्या सर्व कायदेशीर बाबींसाठी, तसेच बक्षिसपत्र तयार करणेसाठी सर्च रिपोर्ट घेणे, बक्षिसपत्र नोंदणीसाठी आवश्यक मुद्रांक व नोंदणी शुल्क भरणे व इतर अनुषंगिक कामांसाठी येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावशेक खर्चास मान्यता देण्यांत आली.

तसेच उपरोक्त जमिनीं बक्षिसपत्राने देणेबाबत दर्यानानी ट्रस्टने प्रस्तावातील **परिच्छेद क** मध्ये ज्या अटी - शर्ती नमुद केलेल्या आहेत, त्या अटी - शर्तीबाबत राधा कलियनदास दर्यानानी ट्रस्ट, मुंबई यांचेसमवेत मा. अध्यक्षसाो. यांची चर्चा झालेली असून, त्या अटी - शर्तीपैकी खाली नमूद केलेल्या काही महत्वाच्या अटी - शर्तीना मंजूरी देण्यात आहे.

०१. दर्यानानी ट्रस्टने प्रस्तावातील **परिच्छेद अ-१** मधील देऊ केलेली जमीन बक्षिसपत्राने दान म्हणून स्वीकारणेत यावी.

०२. सदर क्षेत्रापैकी १५ एकर क्षेत्रामध्ये साईभक्तांसाठी निवासस्थाने, कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने बांधणे इत्यादी कामे करणेत यावीत व उर्वरित अंदाजे १० एकर जमिनींमध्ये आध्यात्मिक संस्था उभारण्यांत यावी, त्यामध्ये सामाजिक विकास संस्थेचा समावेश करावा.

०३. दर्यानानी ट्रस्टने दान देऊ केलेल्या जमिनींच्या पूर्वाश्रमीच्या मालकांच्या कुंटूंबातील दोन व्यक्तींना नोकरी देता येणार नाही.

०४. सामाजिक विकास साधणाऱ्या अभ्यास केंद्राबाबत कमीत कमी ५ सदस्य असलेली उपसमिती स्थापन करणेत यावी. सदर शैक्षणिक वर्ग सुरु होण्याचे वेळेस जर उपसमिती नेमण्याचे निश्चित झालेतर दर्यानानी ट्रस्टने नामनिर्देशीत केलेल्या दोन व्यक्ती सदस्य म्हणून घेण्याऐवजी निमंत्रित सल्लागार म्हणून घेण्यांत यावेत.

०५. संस्थानने स्वत:चे खर्चाने आध्यात्मिक अभ्यासकेंद्राची उभारणी करावी. प्रस्तावित आध्यात्मिक अभ्यासकेंद्राच्या नावात सुरुवातीस श्री साईबाबा यांचे नांव असणे आवश्यक आहे. त्यानंतर त्या संस्थेचे नांव असावे.

०६. आध्यात्मिक शैक्षणिक संकुलामध्ये सुरु होणाऱ्या वर्गासाठी जर शासनाने व्यवस्थापनाला कोटा मंजूर केला तर त्यावेळेस शासनाचे नियम व अटीप्रमाणे त्यावेळेस ठरेल त्याप्रमाणात उमेदवार घेण्यांत यावे. त्यावेळी दर्यानानी ट्रस्टची शिफारस विचारात घेता येईल.

०७. जेष्ठ वृध्द नागरीकांसाठी वृध्दाश्रम, अनाथ मुलांसाठी अनाथाश्रम व वारकऱ्यांसाठी भक्तनिवासस्थान इत्यादी बांधकाम संस्थान मालकीच्या इतर उपलब्ध जमिनीमध्ये सोयीने करण्यात यावे.

०८. आध्यात्मिक संस्थेचे कामकाजास जमीन ताब्यात मिळाल्यापासून १ ते २ वर्षात सुरुवात करण्यात येईल.

**ब)** राधा कलियनदास दर्यानानी ट्रस्ट, मुंबई हे प्रस्तावातील **परिच्छेद अ-२** मध्ये नमूद केलेल्या मौजे रुई तालुका राहाता येथील खालील जमिनींबाबत असलेलाकायदेशीर अधिकार संस्थानला द्यावयास तयार आहे.

| अ.नं. | गट नंबर | क्षेत्र हेक्टर-आर-चौमी | कब्जेदार सदरी असलेली नांवे |
|---|---|---|---|
| ०१ | २९४ | ०५-९०-०० | राजेंद्र चांदमल भनसाळी / सुभाष चांदमल भनसाळी |
| ०२ | २७३ | ०१-९२-०० | भिमबाई बाबुराव कहांडळ |
| ०३ | २७४ | ००-७४-०० | एकनाथ सहादु पठारे / शिवनाथ सहादु पठारे / रेल्वे कडे |
| ०४ | २८८ अ | ०३-०६-०० | लखीचंद कचरदास भंडारी |
| ०५ | २८८ ब | ००-५४-०० | पुष्पाताई लखीचंद भंडारी |
| ०६ | २८८ क | ००-९७-०० | पुष्पाताई लखीचंद भंडारी |
| | **एकूण** | **१३-१३-००** | |

उपरोक्त जमिनींबाबत दर्यानानी ट्रस्टकडे काय अधिकार आहेत तसेच सदरहू जमिनींबाबत कोण-कोणत्या न्यायालयामध्ये दावे चालू आहेत, सदरहू दाव्यांची सद्य:स्थिती काय आहे याबाबतची सविस्तर माहिती दर्यानानी ट्रस्ट यांचेकडून घेण्यात यावी. दर्यानानी ट्रस्टकडून प्राप्त होणारी माहिती व त्या अनुषंगिक कागदपत्रे संस्थान वकिलांकडे सादर करुन, संस्थान वकिलांचा त्यावर सुस्पष्ट व सविस्तर अभिप्राय घेण्यात यावा. संस्थान वकिलांचे कायदेशीर मार्गदर्शनाने व सल्ल्याने यापुर्वीच्या ठरावानुसार खरेदीची कार्यवाही करण्यात यावी. सदरहू जमिनींबाबत कायदेशीर अभिप्राय घेणे, त्यासाठी विविध कार्यालयातून कागदपत्रे उपलब्ध करुन घेणे, खरेदी खतासाठी आवश्यक सर्च रिपोर्ट घेणे, खरेदीखतासाठी आवश्यक मुद्रांक व नोंदणी शुल्क भरणे, वकील फी व इतर अनुषंगिक कामांसाठी येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावशेक खर्चास मान्यता देण्यांत आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.२६** **श्री.अण्णासाहेब रामभाऊ डांगे, कनकुरी यांची जमिन खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.८४३** श्री. अण्णासाहेब रामभाऊ डांगे, राहणार कनकुरी, तालुका राहाता यांनी त्यांची मौजे कनकुरी येथील गट नंबर १२१/अ/३ मधील क्षेत्र ०० हे ७९ आर संस्थानने प्रति आर रुपये २.५० लाख (अक्षरी रुपये दोन लाख पन्नास हजार) मात्र या भावाने घ्यावी, म्हणून दिनांक ०३ सप्टेंबर, २००८ रोजीच्या अर्जाने प्रस्ताव दिलेला आहे.

गट नंबर १२१/अ/३ चा ७/१२ उतारा पाहिला असतां, कब्जेदार सदरी श्री.अण्णासाहेब रामभाऊ डांगे असून पिकपहाणीस ही त्यांचेच नांव आहे. इतर हक्कांत कोणत्याही प्रकारे बोजा नाही.

सदरहू जागेची पहाणी संस्थानचे कंत्राटी मोजणीदार यांनी केली असून, त्यांचे अहवालात त्यांनी असे नमूद केले आहे की, सदर जमिनीकडे जाणेसाठी वहिवाटीचा सामायिक रस्ता आहे. सदर जमिनीतून सामायिक पाईप लाईन (सायफन) जात आहे. सदरहू सामायिक पाईप लाईनची लांबी सुमारे ३००० फुट आहे. सदरहू जमिन संस्थानने श्री.बाबासाहेब रामभाऊ डांगे यांच्या खरेदी केलेल्या ०१ हे ५० आर जमिनी लगत, दक्षिण बाजूस आहे.

सदरची जागा वाढीव पाणीपुरवठा तळयासाठी उपयुक्त आहे. यापूर्वी संस्थानने सदरहू जमिनीचे लगत असलेली श्री.बाबासाहेब डांगे यांची गट नंबर १२१ पैकी मधील ०१ हे ५० आर जमीन रक्कम रुपये १ लाख प्रती आर या दराने दिनांक १३ मार्च, २००८ रोजी खरेदी केलेली आहे.

सदर जमिनीतून श्री.बाबासाहेब डांगे व इतर यांचे पाण्याचे सायफन जात आहे. संस्थानने जमीन खरेदी करणेपूर्वी सदरहू सायफनबाबत विचार होणे आवश्यक आहे.

उपरोक्त प्रस्तावास अनुसरुन खालील बाबतीत निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

०१) श्री. अण्णासाहेब रामभाऊ डांगे यांची मौजे कनकुरी शिवारातील गट नंबर १२१/अ/३ मधील ०० हे ७९ आर जमीन खरेदी करणे अथवा न करणे.

०२) श्री. अण्णासाहेब रामभाऊ डांगे यांची जमीन खरेदी करणेची ठरल्यास, सदरहू जमिनीतून श्री. बाबासाहेब डांगे व इतर यांचे असलेले सायफन काढणे अथवा न काढणे.

०३) जमीन खरेदीसाठी प्रति आर दर ठरविणे तसेच जमीन खरेदीकामी सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता करुन जमीन खरेदी करणेसाठी येणाऱ्या योग्य त्या अनुषंगिक सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

आजचे सभेपूढे जमीनमालक श्री आण्णासाहेब रामभाऊ डांगे यांचे प्रतिनिधी श्री बाबासाहेब रामभाऊ डांगे हे उपस्थित होते. त्यांचेशी जमीनीच्या किंमतीबाबत चर्चा-तथा वाटाघाटी करण्यात आल्या. संबधित प्रतिनिधीने जमिनीची किंमत प्रति आर रुपये २.२५ लाख मिळाल्यास जमिन खरेदी देण्यास तयार आहे असे सांगितले. संबधित प्रतिनिधीने सांगितलेली किंमत अवाजवी वाटल्याने सदरहू जमिन खरेदी करण्याबाबतचा प्रस्ताव तूर्त स्थगित ठेवण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.२७ साईनगर, समर्पण, साईध्यान-१ व २ कर्मचारी निवासस्थाने इमारतींच्या ड्रेनेज व्यवस्थेचे नूतनीकरण करणेबाबत.**

**निर्णय क्र.८४४** संस्थानचे साईनगर परिसरातील साईनगर सर्मपण या इमारती २५ ते ३० वर्षापुर्वीच्या असून साईध्यान क्र. १ व २ या इमारती २० वर्षापुर्वीच्या आहेत. सदरच्या इमारतींचे टॉयलेट व बाथरुमचे पाईप जिर्न झालेले आहेत. त्यामुळे सदरच्या इमारतींमध्ये लिकेज मोठ्या प्रमाणात सुरु झाले आहे. तसेच ड्रेनेज लाईन व बाथरुम लाईन जुनी असल्याने ती चोकअप होते त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरते .

मा. कार्यकारी अधिकारी सो‍ा यांचे दि. १३/१०/२००८ रोजी साईनगर इमारतींचे पहाणीचे वेळी ड्रेनेजची योग्य ती दुरुस्ती करणेबाबत सूचना केल्या आहेत. त्यानुसार सदरच्या इमारतींना असलेल्या बाथरुम व ड्रेनेज लाईन स्वतंत्र करणे संडासचे खराब झालेले डाऊन टेक पाईप बदलणे, सेप्टीक टँकची उंची वाढविणे तसेच इमारतीमधील लिकेज टाळणेसाठी फुटलेले संडासचे भांडे बदलणे इ. कामे करणे आवश्यक आहे. सदरच्या कामासाठी अंदाजे रक्कम रुपये १४,५६,०००.०० मात्र खर्च अपेक्षीत आहे.

तरी साईनगर परिसरातील साईनगर, समर्पण व साईध्यान क्र. १ व २ कर्मचारी निवासस्थाने इमारतींच्या ड्रेनेज व्यवस्थेचे नूतनीकरण करणे तसेच याकामी रक्कम रुपये १४,५६,०००.०० मात्रचे खर्चास व वर्तमान पत्रात विहीत पध्दतीने निविदा सूचना प्रसिध्द करुन निविदा मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.२८ व्दारावती इमारत उत्तर बाजू कंपाउन्ड भिंत उंची वाढविणे.**

**निर्णय क्र.८४५** संस्थानचे शिर्डी येथील स.नं. १४८ मधिल द्वारावती भक्तनिवास इमारतीचे तळमजला (पार्कींग) अधिक चार मजले प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात असून चौथा मजला बांधकाम, रस्ता, पाणीपुरवठा, ड्रेनेज व इलेक्ट्रीकल काम प्रगतीपथावर आहे.

भक्तनिवास इमारतीचे उत्तर बाजूचे कंपाउंड वॉलची उंची परिसर विकासकामे केल्यानंतर फ्लोअर लेव्हलचे वर २' ते २'६" झालेली आहे. त्यामुळे आसपास राहणारे रहिवाशी कंपाउंड वॉल ओलांडून इमारतीचे पार्कींगसाठीच्या मोकळया जागेत आत येउ शकतात. तसेच भविष्यात सुरक्षेच्या दृष्टीनेदेखील सदर कंपाउंड वॉलची उंची वाढविणे गरजेचे आहे.

मा.कार्यकारी अधिकारीसो. यांनी दि.२९/०६/२००८ रोजी कामाचे पाहणीचे वेळी उत्तर बाजूचे कंपाउंड वॉलची उंची वाढविणेबाबत सुचना दिल्या. त्यानुसार आर्कीटेक्ट श्री. काबरे यांनी कंपाउंड वॉलची उंची वाढविणेकामी कॉंटिंजन्सिज व आर्कीटेक्ट फीसह रु.१०,५४,७००.०० रकमेचे अंदाजपत्रक व आराखडे सादर केले आहेत. सदर कामामध्ये आर्कीटेक्ट यांनी सध्याचे कंपाउंड वॉलचा पाया दगड बांधकामात असल्याने सध्याचे कंपाउंड वॉलवर नवीन कॉलम्स, बीम, बांधकाम व त्यावर गॅल्व्हनाईजड वेल्डेड मेश अँगल फ्रेममध्ये बसवून फ्लोअर लेव्हलचे वर ९ङ उंची करणेबाबत बाबत तरतुद केलेली आहे.

सध्याचे बांधकामातील चौथ्या मजल्यावरील खोल्यांचे काम सुरू झालेले असल्याने व काम पूर्ण करणेची अंतिम मुदत डिसेंबर २००८मध्ये पूर्ण होत असल्याने सदर काम तातडीने करावे लागणार आहे.

उपरोक्त काम ठेकेदार गोलानी बिल्डर्स हे अंदाजपत्रकीय दराने करावयास तयार असल्यास त्यांचे कडून अथवा नव्याने निविदा मागवून करून घेता येईल.

तरी कंपाउंड वॉलची उंची वाढविणेचे काम ठेकेदार गोलानी बिल्डर्स यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेणेस अथवा ठेकेदार अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास तयार नसल्यास नव्याने निविदा मागवून करून घेणेस व त्यासाठी येणा-या योग्य त्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित केलेप्रमाणे व्दारावती इमारत उत्तर बाजू कंम्पाऊंड भिंतीची उंची वाढविण्यात यावी. तसेच पूर्वेकडील भिंतीना सुशोभित ग्रील लावून व आर.सी.सी. कमान असलेले प्रवेशव्दार करण्यात यावे. याकामी येणारे सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. ठेकेदार मे.गोलानी बिल्डर्स हे मंजूर निविदा दराने काम करण्यास तयार असल्यास त्यांचेकडून सदर काम करण्यात यावे अन्यथा याकामी निविदा मागवून काम करुन घेण्यात यावे असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.२९ शिर्डी येथील नियोजीत बसस्थानक बांधकाम प्रकल्पासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणुक करणेबाबत**

**निर्णय क्र.८४६** शिर्डी येथील नियोजीत बसस्थानक बांधकाम प्रकल्पाबाबत दि. ०७/०७/२००८ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र. ५७६ अन्वये खालीलप्रमाणे मान्यता देणेत आलेली आहे.

" यावर सविस्तर चर्चा होऊन दि. ०१/०४/२००८ रोजीचे मुंबई येथील दोन्ही संस्थांच्या संयुक्त बैठकीत मान्य झालेप्रमाणे सुधारीत बांधकाम आराखडयास म.रा.मा.परीवहन महामंडळ यांचे मुख्य स्थापत्य अभियंता यांनी दि. २१/०६/२००८ रोजीचे पत्रान्वये मान्यता दिलेली आहे. सदरहू सुधारीत बांधकाम आराखड्यास मान्यता देणेत आली. तसेच सदरहू सुधारीत बांधकाम आराखड्यानुसार शिर्डी येथील बसस्थानक इमारतीचे बांधकामासाठी येणारे अंदाजित रक्कम रुपये ७.६६ कोटी मात्रचे अपेक्षित

खर्चास मान्यता देणेत आली. याकामी बांधकाम परवानगी, निविदा मागविणे इत्यादी अनुषंगीक कामांची कार्यवाही विहीत पध्दतीने करण्यात यावी.

या प्रकल्पासाठी आर्किटेक्ट म्हणून काबरे चौधरी आर्किटेक्टस्, नाशिक हे मा. अध्यक्ष महोदय यांचे सूचनेनुसार सुरुवातीपासून काम पहात आहेत. त्यांची पुर्वीचेच अटी व शर्तीवर कामाच्या किंमतीचे २% इतक्या आर्किटेक्ट फीवर नियुक्ती करणेस मान्यता देणेत आली. वरील प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे सदरहू प्रकल्प हा मोठ्या स्वरुपाचा असल्याने याचे प्रकल्प व्यवस्थापन (Project Management Consultancy ) हे प्रकल्पाचे आर्किटेक्ट मे. काबरे चौधरी आर्किटेक्टस, नाशिक यांनी उपरोक्त निर्धारित फी मध्येच स्विकारणेबाबत त्यांना विनंती करणेत यावी. त्यांनी सदरहू विनंती मान्य न केल्यास याकामी स्वतंत्र व्यवस्थापन सल्लागार नेमणेकामी मा. व्यवस्थापन समितीपुढे प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले. "

काबरे चौधरी आर्किटेक्टस, नाशिक यांना जा.नं. १४५६३/२००८ दि. ०३/१०/२००८ रोजीचे पत्रान्वये शिर्डी बसस्थानक विकसीत करणेकामी आर्किटेक्ट म्हणून नेमणूक केल्याचे कळविले आहे. तसेच निर्धारीत फी मध्येच प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून सेवा पूरविणेबाबत विनंती करण्यात आली आहे. याबाबत दि. ०२/१०/२००८ रोजीचे पत्रान्वये आर्किटेक्ट काबरे चौधरी, नाशिक यांनी त्यांना २% इतक्या फी मध्ये खालीलप्रमाणे आर्किटेक्ट सेवा पुरवाव्या लागतात असे नमूद केले आहे.

१. आर्किटेक्चरल प्लॅन व सविस्तर वर्किंग ड्रॉईंग तयार करणे
२. स्ट्रक्चरल डिझाईन व ड्रॉईंग तयार करणे
३. इलेक्ट्रीकल कामाचे डिझाईन व ड्रॉईंग तयार करणे.
४. ड्रेनेजलाईन आणि वॉटर सप्लायचे डिझाईन व ड्रॉईंग तयार करणे.
५. लॅण्डस्केपचे डिझाईन व ड्रॉईंग तयार करणे
६. प्रकल्पाचे अंदाजपत्रक तयार करणे
७. कोरे निविदा फॉर्म तयार करणे
८. ठेकेदार नियुक्तीबाबत मार्गदर्शन करणे
९. ठेकेदार यांनी सादर केलेली बिले प्रमाणीत करणे.
१०. काम पूर्ण होईपर्यंत वेळोवेळी देखरेख करणे. आणि प्रकल्पासंबंधी इतर सर्व अनुषंगिक कामे करणे.

उपरोक्त सेवा पुरविणेकरीता आर्किटेक्ट यांना बाहेरील सल्लागारांची नियुक्ती करावी लागते. तसेच याकामी कुशल अशा आर्किटेक्ट व इंजीनियर्सची कार्यालयात नेमणूक करुन त्यांना पगार द्यावा लागतो. हा सर्व खर्च २% फी मध्ये भागविणे जिकरीचे जाते. असे आर्किटेक्ट यांनी नमूद केले आहे.

तसेच कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर यांनी फक्त आर्किटेक्चरल सेवा पुरविणेकरीता ५% इतक्या फीची शिफारस केली असून त्यामध्ये प्रकल्प व्यवस्थापन सल्लासेवेचा समावेश नाही. तरी आमचे कार्यालय फक्त आर्किटेक्चरल कन्सल्टन्सी सेवा पूरविते व प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्स्ल्टन्सी सेवेकरीता संस्थानने दुसऱ्या संस्थेची नेमणूक करावी अशी विनंती आर्किटेक्ट यांनी केली आहे.

तरी सदरहू बाबीं विचार करता नियोजीत शिर्डी बस स्थानक प्रकल्पासाठी स्वतंत्र सल्लागाराची नेमणूक करावयाचे प्रस्तावीत असल्याने काबरे चौधरी आर्किटेक्टस् यांचेशी चर्चा करुन त्यांना योग्य ती फी देणे तसेच विषयांकीत प्रकल्पाचे मोठे स्वरुप लक्षात घेता दैनंदिन देखरेख, ठेकेदार यांची बिले तपासून प्रमाणीत करणे, प्रकल्पाची प्रगती व दर्जावर नियंत्रण ठेवणे याकरीता स्वतंत्र प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंटची नेमणुक करणेसाठी अर्ज-तथा-प्रस्ताव मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.३०** **नवी दिल्ली येथील महाराष्ट्र परिचय केंद्राचे लिफ्टला ॲटोमॅटीक रेल्कु डिव्हाईस (बॅक अप सुविधा) बसविणेचे कोटेशन बाबत.**

**निर्णय क्र.८४७** श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री साईंच्या दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांमध्ये उत्तर भारतातील साईभक्तांची संख्या मोठया प्रमाणावर आहे. या साईभक्तांना संस्थानच्या दैनंदिन पूजा-अर्चा आदि कार्यक्रमाविषयी, संस्थानमार्फत भक्तांसाठी उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या विविधी सेवा-सुविधा, देणगी इत्यादीबाबत माहिती उपलब्ध करुन देण्याचे उद्देशाने नवी दिल्ली येथील महाराष्ट्र परिचय केंद्राचे इमारतीमध्ये संस्थानचे माहिती व सुविधा केंद्राचे फर्निचर व अंतर्गत सजावटीचे काम तसेच सदरहू इमारतीस लिफ्ट बसविण्याचे काम ठेकेदार यांचेमार्फत पूर्ण करण्यात आलेले आहे.

सदरहू इमारतीस बसविण्यात आलेल्या लिफ्टला बॅकअप सुविधा नसल्याने, वीज पुरवठा खंडीत झालेनंतर त्यामध्ये नागरीक अडकून पडण्याच्या घटना वारंवार घडत आहेत. गेल्या काही दिवसांत अशा घटना सातत्याने घडल्या आहेत. वीज पुरवठा खंडीत झाल्यानंतर लिफ्टमध्ये असलेल्या नागरीकांना बाहेर काढणेसाठी धावपळ करावी लागते, त्यामुळे एखाद्या वेळेस अप्रिय अशी घटना घडू शकते. तरी सदरहू लिफ्टला बॅकअप सुविधा उपलब्ध करुन द्यावी, अशी विनंती मा.उपसंचालक, महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली यांनी त्यांचेकडील दिनांक २९ एप्रिल, २००८ रोजीचे पत्रान्वये केली होती. सदरहू लिफ्टला ॲटोमॅटीक रेस्क्यू डिव्हाईस उपलब्ध करुन देणेसाठी अंदाजे खर्च रुपये १,५०,०००/- मात्र इतका येईल.

उपरोक्त परिच्छेदात विवेचन केल्यानुसार, नवी दिल्ली येथील माहिती सुविधा केंद्रासाठी बसविण्यात आलेल्या लिफ्टला वीज पुरवठा खंडीत झालेनंतर, लिफ्ट मध्ये अडकलेल्या नागरीकांसाठी ॲटोमॅटीक रेस्क्यू डिव्हाईस उपलब्ध करुन देणेस तसेच त्याकामी येणाऱ्या योग्य त्या खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०७.०७.२००८ रोजीचे सभेत निर्णय क्र. ५६० (११) अन्वये मान्यता देणेत आली आहे.

आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे, नवि दिल्ली यांना इकडील जा. नं. १२९६९/२००८ दि. ०३.०९.२००८ चे पत्रान्वये सदरहू लिफ्टला बॅकअप सुविधा उपलब्ध करणेकामी संस्थानचे वतीने कोटेशन/दरपत्रक मागविणे बाबत कळविणेत आले होते. त्यानूसार आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे, नवि दिल्ली यांनी दि. ०८.१०.२००८ चे पत्रान्वये कळविले आहे की, बऱ्याच एजन्सीकडून सिलबंद कोटेशन मागविण्यात आली होती मात्र तीन कोटेशन धारकांनी ई- मेल द्वारे त्यांचे दर सादर केले आहेत. त्यांनी सिलबंद कोटेशन विनंती करुन सादर केले नसल्याचे कळविले आहे.

एजन्सी यांनी कळविलेले दर खालील तपशिला प्रमाणे आहे.

| Sr. No. | Supplier / Contractor | Amount (Rs.) | Taxes | Total Amount (Rs.) |
|---|---|---|---|---|
| 01 | Apex Elevators, Delhi | 1,15,000.00 | Vat 12.5 % extra | 1,29,375.00 |
| 02 | Vardaan Contracts Pvt. Ltd., | 3,50,000.00 | Vat 12.5 % Incuded | 3,50,000.00 |
| 03 | D.E.W. Electrical Services Pvt. Ltd., | 5,45,690.00 | Service tax extra | 5,45,690.00 + Service tax |

उपरोक्त दरपत्रकाबाबत आर्किटेक्ट यांनी खालील प्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

०१. ॲपेक्स इलेव्हेटर्स यांनी लहान साईज मधील जनरेटर सेटचे रु. १,२९,३७५.०० मात्र रकमेचे कोटेशन सादर केले आहे. लिफ्ट बंद पडल्यानंतर लिफ्ट मध्ये आडकलेल्या व्यक्तींना बाहेर काढण्यासाठी उपयोग होईल. जवळच्या मजल्यापर्यंत अडकलेल्या व्यक्तींना बाहेर काढता येईल. एवढीच क्षमता यामध्ये आहे.

०२. वर्धन व डी. ई. डब्यु यांनी उपरोक्त प्रमाणे अ. नं. २ व ३ नूसार डी. जी. सेटचे दर दिलेले आहेत. यामध्ये टेरेसवर DG सेट असेल व इलेक्ट्रीकल सप्लाय गेल्यानंतर स्विच ॲटोमॅटीक ऑन होईल. सदर कोटेशन धारक किर्लोस्कर किंवा कमेन्स DG सेट पुरवतील.

०३. विद्युत पुरवठा खंडीत झालेनंतर लिफ्टमध्ये आडकलेल्या व्यक्ती जवळच्या मजल्यावर (लॅन्डींगमध्ये) व्यवस्थीत रित्या सुखरुप पणे बाहेर येणेसाठी कमीत कमी आवश्यक उपाय- योजना विचारात घेता ॲपेक्स इलेव्हेटर्स यांनी कोटेशन सादर केले आहे.

मात्र संस्थानचे माहिती केंद्रासाठीचे लिफ्ट करीता बॅकअप पॉवर जोडणे झाल्यास वर्धान कॉन्ट्रक्टर्स प्रा. लि., यांचे कोटेशन निमन्तम होते. करीता ते स्वीकारावे लागेल.

उपरोक्त प्रमाणे सप्लायर / ठेकेदार यांनी सादर केलेले कोटेशन व त्यावरील अर्किटेक्ट यांचा अभिप्राय विचारात घेता मे. ॲपेक्स इलिव्हेटर्स, नवि दिल्ली यांचे दर निमन्तम स्वरुपाचे असल्याने सदरहू लिफ्टला बॅकअप सुविधा त्यांचेकडून करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

याचवेळी दिनांक ०१ जानेवारी २००९ पासून दिल्ली येथील महाराष्ट्र परिचय केंद्राचे इमारतीमध्ये संस्थानचे माहिती व सुविधा केंद्रात संस्थान प्रकाशित पुस्तके व फोटो विक्री केंद्र सुरु करण्यात यावे असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख/प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.३१** **श्रीसाईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयासाठी नविन लॉन्ड्री विभाग सुरु करणेबाबत.**

**निर्णय क्र.८४८** श्रीसाईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील दररोज निघणारे खराब लिनन सध्या धुलाईसाठी संस्थानचे लॉन्ड्रीमध्ये पाठविण्यात येते. परंतु सदर लॉन्ड्रीवर सध्या असलेला कामाचा बोजा यामुळे रुग्णालयातील लिनन वेळेवर धुवून मिळणेस विलंब होतो.

यासाठी सविस्तर खर्चाचा प्रस्ताव ज्यामध्ये मशिनरी / उपकरणे / आवर्ती खर्च / कर्मचारी वर्ग इत्यादीचा प्रस्ताव दि.१०/०१/२००८ चे मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. त्यावर चर्चा होऊन लॉन्ड्री विभागासाठी येणारा भांडवली खर्च रु.१०,२३,०००/- जर आवर्ती खर्च दरमहा रु.४०,०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली होती. परंतु सदर प्रस्तावामध्ये सुचविण्यात आलेल्या मशिनरी, जागा, इत्यादी कमी प्रमाणात सुचविण्यात आल्या होत्या.

दोन्ही रुग्णालयाचे धुलाईसाठी निघणारे दैनंदिन लिनन व भविष्यात वाढणाऱ्या रुग्णांची संख्या विचारात घेऊन सर्व सोयीयुक्त अद्यावत व सुसज्ज अशी लॉन्ड्री करणेसाठी, सध्या संस्थानचे लॉन्ड्रीमध्ये असलेल्या मशिनरी पुरविणारे पुणे येथील Ramson Garments Finishing Equipments (P) Ltd., Pune यांचेशी सविस्तर चर्चा केल्यानंतर त्यांनी मशिनरी / जागा इत्यादीबाबत आपणास सविस्तर माहिती दिलेली आहे.

**अ) मशिनरी / उपकरणे -**

| Sr. No | Item Description | Qty. | App. Rate Per | App. Total Cost in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Ramsons Textile Processing Machine | 02 | 229126.00 | 458252.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | (Horizontal) Model: RHW - 50<br>Capacity: 50 Kgs. | | | |
| 2 | Ramsons Textile Processing Machine<br>(Vertical) Model: RVW - 20<br>Capacity: 20 Kgs. | 01 | 136445.00 | 136445.00 |
| 3 | Ramsons Flatwork Ironer<br>Model: RFWI 01<br>Steam Heated<br>Size :400 x 1600mm | 01 | 437656.00 | 437656.00 |
| 4 | Ramsons Tumble Drier<br>Model RTD - 50<br>Capacity: 50 Kgs. | 01 | 182785.00 | 182785.00 |
| 5 | Ramsons Hydro Extractor<br>Model: RDD -30<br>Capacity: 30 Kgs. | 02 | 102978.00 | 205956.00 |
| 6 | Ramsons Diesel Fired Boiler<br>(Steam Pack)<br>Model: ROB -400<br>Capacity : 400 Kgs.<br>Piping - (Only Steam Line - Rs.50,000/-) | 01 | 543209.00 | 543209.00 |
| 7 | Trolley | 02 | 20596.00 | 41192.00 |
| 8 | Wet Trolley | 02 | 20596.00 | 41192.00 |
| | | | **Total in Rs.** | **2046687.00** |

(ब) याशिवाय सदर लॉन्ड्रीसाठी ४५ फुट x २२ फुट या साईजची (९९० Sq.Ft.) त्यामध्ये विविध मशिनरी, केमिकल रुम, मॅनेजर रुम इत्यादीसाठी RCC बांधकाम करावे लागणार आहे. सदरचे बांधकामासाठी अंदाजे रु.९,००,०००/- (अक्षरी रु. नऊ लाख) (एकूण ९९० Sq.Ft. प्रती स्क्वेअर फुटकरीता अंदाजे रु.९००/- याप्रमाणे रु.८,९१,०००/- पुर्णांकित रक्कम रु.९ लाख) खर्च अपेक्षित आहे.

(क) याशिवाय सदर लॉन्ड्रीसाठी खालीलप्रमाणे कामे संस्थानला करुन द्यावी लागणार आहे.

**Scope of work done by Sansthan -**

01) Providing Electrical Line (3 Phase) for all Machines.
02) Providing Water Line and drainage line.
03) Providing unloading facility for machines.
04) Providing civil work for machines foundations.

यासाठी अंदाजे रु.१,००,०००/- (रु.एक लाख) खर्च येईल.

उपरोक्त अ,ब, व क मध्ये नमूद केल्याप्रमाणे सदरचे लॉन्ड्रीसाठी अंदाजे रु.३१,००,०००/- इतका खर्च उपेक्षित आहे.

| | | |
|---|---|---|
| अ) | मशिनरी | रु.२०,४४,६८७/- |
| ब) | बांधकाम | रु.९,००,०००/- |
| क) | इलेक्ट्रीक व प्लबींग काम | रु.१,००,०००/- |
| | एकूण रक्कम रु. | रु.३०,४४,६८७/- |
| | पुर्णांकित एकूण रक्कम रु. | रु.३१,००,०००/- |

सदर लॉन्ड्री विभाग हा संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालयाकडील पश्चिमेकडील जागेत केल्यास दोन्ही रुग्णालयाचे दृष्टीने योग्य राहिल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषय तूर्त तहकुब ठेवण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.३२** **संस्थानमधील कायम कर्मचाऱ्यांना वैद्यकीय बील परतावा सध्याच्या नियमावलीनुसार चालू ठेवणे बाबत.**

**निर्णय क्र.८४९** मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०७/०७/२००८ निर्णय क्र. ६१६ अन्वये येथूनपुढे संस्थान कर्मचाऱ्यांची रु. ५०००/- पेक्षा अधिक खर्चाची बीले अदा करणेकामी असलेली सन १९९९ चे वैद्यकिय देखभाल नियमावलीस राज्य शासनाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले आहे.

त्यानुसार सदरच्या नियमावलीमध्ये महाराष्ट्र शासन आरोग्य विषयक नियमावलीचा आधार घेऊन त्यामध्ये सुचविलेले विविध खाजगी, निमशासकीय, शासकिय रुग्णालये, विविध आजार वास्तव्यावरील खर्च तसेच काही नविन बदल सुचविण्यात येऊन नविन नियमावली मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवण्यात येऊन तद्नंतर महाराष्ट्र शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्याची कार्यवाही चालु आहे. सदर कार्यवाहीसाठी अजुन कमीतकमी तीन ते चार महिन्यांचा कालावधी अपेक्षित आहे.

त्यामुळे सध्या संस्थान कर्मचाऱ्यांची रु. ५०००/- पेक्षा अधिक खर्चाची सर्वच बीले अदा करणे सध्या थांबवलेली आहे. शासनाकडून नियमावलीस मान्यता मिळणेकामी वेळ लागणार असल्याने शासनाची मान्यता येईपर्यंत संस्थान कर्मचाऱ्यांची रु. ५०००/- पेक्षा अधिक खर्चाची बीले सध्याचे विहित पध्दतीने अदा करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्याची नियमावली तुर्तास एक महिना चालु ठेवून नविन नियमावली एक महिन्याच्या आत मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात यावी.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.३३ श्रीसाईबाबा रुग्णालयाचे प्रयोगशाळा विभागाकरीता बायोमेरीक्स इंडिया लि.या कंपनीकडून हार्मोन्स किट खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.८५०** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २००८-२००९ या वर्षाकरीता लागणारे औषधे, लॅब केमिकल्स किट्स खरेदीकामी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात येऊन दि.२६/०७/२००८ रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे.

सदर खरेदीमध्ये साईबाबा रुग्णालयात नव्याने खरेदी केलेल्या Vidas मशिनसाठी लागणारे किट्स खरेदीकामी मे. बायोमेरिक्स इंडीया प्रा.लि., मुंबई यांना इकडील पत्र क्रमांक १०९२४ दि.२६/०७/२००८ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

सदरचे मशिन हे आपणास माहे मार्च मध्ये प्राप्त होऊन कार्यन्वीत करण्यात आले होते तर प्रयोगशाळा विभागाने वार्षिक मागणी माहे फेब्रुवारी मध्ये सादर केली होती. परंतु सदरचे मशिनवर होणाऱ्या वेगवेगळया प्रकारच्या तपासण्याबाबत अंदाज नसल्यामुळे त्यांनी काही किट्सची मागणी केलेली नव्हती. सदरचे मशिन हे मे. बायोमेरिक्स इंडीया प्रा.लि., मुंबई या कंपनीचे असून सदर मशिनकरीता त्याच कंपनीचे किट्स लागतात, इतर कंपनीचे किट चालत नाहीत. त्यामुळे थेट मे. बायोमेरिक्स इंडीया प्रा.लि., मुंबई या उत्पादक कंपनीकडून दरपत्रक मागविण्यात आलेले आहे. त्यानुसार डॉ. न्यायाधीश - पॅथोलॉजीस्ट यांनी मागणी केलेल्या एकुण १० प्रकारच्या किटसाठी एकुण रु. ४,१२,००८/- इतका खर्च येणार आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

| Sr.No. | Name of Kits | Packing | Rate Per in Rs. | Requirement | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | FT 3 | 60 T | 5816.00 | 12 | 69792.00 |
| 2 | FT 4 | 60 T | 7710.00 | 12 | 92520.00 |
| 3 | Estradiol II | 60 T | 10010.00 | 2 | 20020.00 |
| 4 | Cortisol S | 60 T | 10110.00 | 1 | 10110.00 |
| 5 | Troponin I Ultra | 60 T | 17890.00 | 2 | 35780.00 |
| 6 | CK- MB | 60 T | 5411.00 | 2 | 10822.00 |
| 7 | Digoxin | 60 T | 11498.00 | 2 | 22996.00 |
| 8 | D-Dimer Exclusion | 60 T | 22997.00 | 2 | 45994.00 |
| 9 | Pro Calcitonin | 60 T | 67080.00 | 1 | 67080.00 |
| 10 | Pro NT - BNP | 60 T | 36894.00 | 1 | 36894.00 |
| | | | | Total in Rs. | 412008.00 |

तरी वरीलप्रमाणे लागणाऱ्या किट्स मे. बायोमेरिक्स इंडीया प्रा.लि., मुंबई यांचेकडून खरेदीस व याकामी येणाऱ्या रु. ४,१२,००८/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.३४ श्री साईबाबा रुग्णालयात न्यूरो ओ.टी.साठी मशिनरी/ उपकरणे, फर्निचर तसेच कार्डीयाक इन्स्ट्रुमेंट व श्री साईनाथ रुग्णालयासाठी सर्जिकल इन्स्ट्रुमेंट खरेदीची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.८५१** श्री साईबाबा रुग्णालयात न्यूरो ओ.टी. साठी मशिनरी / उपकरणे, फर्निचर तसेच कार्डीयाक ऑपरेशन थिएटरसाठी लागणारे इन्स्ट्रुमेंट व साईनाथ रुग्णालयासाठी सर्जिकल इन्स्ट्रुमेंट खरेदीकामी मा. व्यवस्थापन समितीच्या दि.२८/०७/२००७ चे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आले होते. सदरचे खरेदीकामी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहीरात देऊन निविदा मागविणे बाबत निर्णय झालेला आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

| अ. नं. | तपशील | अंदाजे खर्च | मा.व्यवस्थापन समिती / मा. उपसमिती सभा |
|---|---|---|---|
| ०१ | श्री साईबाबा रुग्णालयात न्यूरो पेशंटसाठी नवीन न्युरो आ.सी.यू. व सेंट्रल एअर कंडिशनिंगसाठी तसेच मशिनरी/उपकरणे/फर्निचर खरेदी बाबत. | ९७,०१,६००/- | मा.व्यवस्थापन समिती सभा दि. २८/०७/२००७ निर्णय क्रमांक ५५१ अन्वये |
| ०२ | न्युरो सर्जरीच्या ऑपरेशन थिएटरसाठी मशिनरी / उपकरणे खरेदीबाबत. | ३२,९८,३४०/- | मा.व्यवस्थापन समिती सभा दि. २८/०७/२००७ निर्णय क्रमांक ५४८ अन्वये |
| ०३ | एम.आर.आय. विभागासाठी Magnitude Multi Parameter Monitor खरेदी बाबत. | २६,२०,०००/- | मा.व्यवस्थापन समिती सभा दि. २८/०७/२००७ निर्णय क्रमांक ५५२ अन्वये |
| ०४ | Tee Probe Instrument खरेदीबाबत. | २३,६२,२००/- | मा.व्यवस्थापन समिती सभा दि. २८/०७/२००७ निर्णय क्रमांक ५५३ अन्वये |
| ०५ | कार्डियाक ऑपरेशनसाठी अतिरिक्त दोन इन्स्ट्रुमेंट सेट खरेदीबाबत. | १५,७०,३९८/- | मा.व्यवस्थापन समिती सभा दि. २८/०७/२००७ निर्णय क्रमांक ५५४ अन्वये |

| | | | |
|---|---|---|---|
| ०६ | श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सर्जिकल इन्स्ट्रुमेंट व फर्निचर खरेदी बाबत. | ३१,५०,०००/- | मा.व्यवस्थापन समिती सभा दि. २८/०७/२००७ निर्णय क्रमांक ५४९ अन्वये |

त्यानुसार उपरोक्त सर्व प्रकारच्या मशिनरी / उपकरणे / फर्निचर तसेच कार्डीयाक इन्स्ट्रुमेंट व साईनाथ रुग्णालयासाठी सर्जिकल इन्स्ट्रुमेंट खरेदीकामी एकत्रितपणे वर्तमान पत्रात जाहीरात देऊन निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यास अनुसरुन मशिनरी / उपकरणे / फर्नीचर करीता ४२ निविदा तर सर्जिकल इन्स्ट्रुमेंटकरीता ९ निविदा प्राप्त झालेल्या होत्या. सदरच्या तांत्रिक निविदा दि. १३/०१/२००८ चे मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आल्या होत्या,

त्यानुसार Technical Specification चा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला होता. तो दि.१६/०२/२००८ रोजी तज्ञ समितीचे सदस्य डॉ. बापू कांडेकर - अहमदनगर, डॉ.वसंत कटारीया - अहमदनगर, डॉ.सुभाष आगाशे - श्रीरामपूर यांना दाखवण्यात आला असून त्यावर त्यांच्या शिफारशी घेण्यात आलेल्या आहेत. तसेच उपरोक्त खरेदीकामीचे Commercial Bid हे दि.१५/०४/२००८ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आल्या होत्या. त्याचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०६/०९/२००८ चे सभेपुढे चर्चा / वाटाघाटी साठी सादर करण्यात आला होता. त्याचवेळेस एकुण ३२ निवडक निविदा धारकांना देखील सभेपुढे चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते, त्यापैकी एकुण २८ निविदाधारक उपस्थित होते. या सर्व निविदा धारकांना सभेपुढे एकत्रित बोलवून त्यांना श्री साईबाबा रुग्णालय हे धर्मादाय रुग्णालय असून आपण आपल्या निविदेमध्ये देऊ केलेल्या मुळ दरावर अजुन जास्तीत जास्त सुट देण्याबाबत सांगण्यात आले त्यानुसार सदरहू निविदाधारकांनी देऊ केलेली सुट लिखित स्वरुपात घेण्यात आलेली आहे, ती खालील प्रमाणे :-

| S.N. | Name of Supplier | Discount |
|---|---|---|
| 1 | Aarem Electronics Pvt.Ltd., Pune. | Absent |
| 2 | Aditi Enterprises, Nashik. | Itemwise |
| 3 | Allwin Lifecare, Mumbai. | Itemwise |
| 4 | Atlantic Pharmaceuticals, Mumbai | Itemwise |
| 5 | B.Braun Medical (I) Pvt.Ltd., Mumbai. | Itemwise |
| 6 | B. L. Life Sciences, New Delhi | No Discount |
| 7 | Biomedicon Sys., Mumbai | 5% for Instruments |
| 8 | BPL Limited, Mumbai. | Itemwise |
| 9 | Care Mediquip, Mumbai. | Itemwise |
| 10 | Chimco Bio-medical , Mumbai. | Itemwise |
| 11 | Cyronics Instruments Pvt, Ltd., Pune. | 5 % |
| 12 | Elite Healthcare (India) Pvt.Ltd., New Delhi. | No discount |
| 13 | Esbee Dynamed Pvt. Ltd., Mumbai. | Itemwise |
| 14 | Excel Corporation, Nashik. | Itemwise |
| 15 | Hitra Equipments, Mumbai | Absent |
| 16 | Hospitech, Mumbai. | Itemwise |
| 17 | Ion Bio Medicare Pvt. Ltd., Mumbai | Itemwise |
| 18 | Janak healthcare Pvt.Ltd.,Mumbai. | No discount |
| 19 | K.B.Electronics, Mumbai. | Absent |
| 20 | Kalelkar Surgicals Industries, Mumbai. | 12% |
| 21 | Kanchan drugs, Pune. | No discount |
| 22 | Maquet Medical India Pvt.Ltd., Mumbai. | Itemwise |
| 23 | Meditronics Co.Pvt. Ltd., Mumbai | Absent |
| 24 | Philips Electronics India.Ltd., Mumbai. | Itemwise |
| 25 | Prabha Surgicals, Mumbai. | Itemwise |
| 26 | Recorders & Medicare Systems Ltd., Baddi. | Itemwise |
| 27 | Schiller Healthcare Pvt, Ltd., Pune. | Itemwise |
| 28 | Shri Hospital Equipments, Ichalkaranji | Increased rate by 15% |
| 29 | Summit Healthcare Pvt. Ltd., Mumbai | 2% |
| 30 | Surgiplus - Cuttack , State - Orissa | Itemwise |
| 31 | Tejas Electronics, Ahmednagar. | 5% |
| 32 | Zenith Surgical Co., Mumbai. | 1% |

यावर चर्चा होऊन सदरचे खरेदीकामी मा. विश्वस्त डॉ. ए. भा. गोंदकर, श्री.पांडूरंग अभंग, श्री.सुरेश वाबळे, श्री.अशोक खांबेकर या विश्वस्तांचे मार्गदर्शन घेऊन अजुन काही सुट व तांत्रिक बाबींचा अभ्यास करुन खरेदीकामी निर्णय घेण्यात यावा व सदर निर्णयाची प्रत माहितीसाठी मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर करावी, असे ठरले. त्यानुसार दि. ११/०९/२००८ रोजी सदरहू चार मा. विश्वस्तांना दि. १२/०९/२००८ रोजी खरेदीचा निर्णय घेणेकामी सभा ओयाजित करण्यात आलेली आहे असे दुरध्वनीवरुन कळविण्यात आले होते, परंतु काही कारणास्तव मा. विश्वस्त श्री.पांडूरंग अभंग, श्री.सुरेश वाबळे, श्री.अशोक खांबेकर हे उपस्थित राहू शकले नाही.

त्यामुळे मा.विश्वस्त डॉ.ए.भा.गोंदकर यांनी उपवैद्यकिय संचालक, वैद्यकिय संचालक, बायोमेडीकल इंजिनीअर यांचे समवेत प्राप्त निविदाधारकांचा तुलनात्मक तक्ता बघून सर्व तांत्रिक बाबी तसेच तुलनात्मक किंमती इत्यादीची सखोल माहिती करुन घेऊन आपणास कोणत्या कंपनीचे मशिनरी / उपकरणे / हत्यारे इत्यादी खरेदी करावयाचे आहे हे प्रथम निश्चित करुन घेतले. तद्नंतर संबंधित निविदाधारकांना दुरध्वनीवरुन मुळ किंमत व त्यांनी दि.०६.०९.२००८ रोजी देऊ केलेली किंमत व तांत्रिक बाबीमध्ये असलेला फरक याबाबत विचारणा केली व निविदाधारकांकडून अजुन काही सुट दि. १२/०९/२००८ रोजी घेण्यात आली तसेच काही मशिनरी / उपकरणे यांचेबाबत ब-याचशा काही तांत्रिक बाबीची विचारणा करुन पुन्हा दि. १६/०९/२००८ रोजी दुरध्वनीवरुन विचारणा करुन अंतिम सुट घेण्यात आली. उपरोक्त खरेदीकामीची शिफारशी बाबतची संक्षिप्त माहिती सोबतच्या तक्त्यात नमुद करण्यात आली आहे.

त्यानुसार सदर खरेदीबाबतची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे-

**A) Machinery / Equipment -**

| Sr.No. | Name of Machinery / Equipment | Make / Model | Name of Tenderer | Qty. | Rate Per | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|
| 01. | Ventilator Adult | Servo - S | Maquet Medical, Mumbai | 10 | 1277895.00 | 12778950.00 |
| | 1 Mini Compressor for Above machine for SSH | Servo - S | Maquet Medical, Mumbai | 01 | 268347.00 | 268347.00 |
| 02. | Boyles Anaesthesia with ventilator | L&T Elite 615 | Excel Corporation, Nashik | 02 | 654885.00 | 1309770.00 |
| | Boyles Anaesthesia without ventilator | L&T Elite 615 | Excel Corporation, Nashik | 02 | 460845.00 | 921690.00 |
| 03. | Defibrillator | DF2509R | BPL Ltd., Mumbai. | 03 | 123500.00 | 370500.00 |
| 04. | Electrosurgical Generator Cautery machine | Shalya MX Xcellance | Aditi Enterprises. Nashik | 01 | 225000.00 | 225000.00 |
| 05. | Multi Para Monitor | L&T Star Plus 200 | Excel Corporation, Nashik. | 20 | 276507.00 | 5530140.00 |
| 06. | Central Nursing Station for 8 monitors for above monitors Neuro ICCU | L&T Skyline 8 with PC, Printer & UPS | Excel Corporation, Nashik. | 01 | 155232.00 | 155232.00 |
| | Central Nursing Station for 8 monitors for above monitors for ICCU | Philips Intellivue for MP 20 | Philips, Mumbai | 01 | 445000.00 | 445000.00 |
| 07. | Syringe Pump | Perfusor Compact | B.Braun, Mumbai | 40 | 52596.00 | 2103840.00 |
| 08. | U.P.S (5 K.V.A.) | AVO ISO 9001-02 | Tejas Electronics, Ahmednagar | 02 | 64220.00 | 128440.00 |
| 09. | Noiseless Electric Suction Machine S/S Body | | Kanchan Drugs, Pune | 03 | 8437.50 | 25312.00 |
| 09. | Multi Channel E.C.G. Machine 12 Leads with display & Accessories | 8408 View | BPL, Mumbai. | 01 | 95000.00 | 95000.00 |
| 10. | Mobile Single Light Dome - with 19" Dome | | A.G. Joshi & Co., Pune | 01 | 29250.00 | 29250.00 |
| 11. | ACT machine | Helena Luxtech Corpn. USA | B.L.LifeScience, Delhi | 01 | 104000.00 | 104000.00 |
| 12. | Light Source With Fiber optic cable (3 mtr) | | Kanchan Drugs, Pune | 01 | 8437.50 | 8437.50 |
| 13. | Deep vein Thrombosis - prevention device with all attachment | TYCO SCD | Prabha Surgical, Mumbai | 01 | 253125.00 | 253125.00 |
| 14. | TEE Probe – Adult | Philips Omni III | Care Mediquip, Mumbai | 01 | 2000000.00 | 2000000.00 |
| 15. | Magnitude | Magnitude | Summit, Mumbai | 01 | 2301390.00 | 2301390.00 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | Multiparameter Monitor for MRI | Invio USA | | | | |
| 16. | Dialysis Machine | Nipro Surdial | Atlantic Pharma, Mumbai | 01 | 495000.00 | 495000.00 |
| 17. | Electric Sterlizer | | Kanchan Drugs, Pune | 02 | 4500.00 | 9000.00 |
| | | | | | **Total in Rs.-** | **29557423.50** |

तसेच सर्जिकल इन्स्ट्रुमेंट खरेदीकामी जनरल सर्जरीचे हत्यारे तज्ञ समितीने मे.कांचन ड्रग्ज, पुणे यांच्याकडून घेण्याची शिफारस केलेली होती. तथापी सदर इन्स्ट्रुमेंटबाबत मे.कांचन ड्रग्ज ,पुणे यांना विचारणा केली असता ते स्वतः इन्स्ट्रुमेंट तयार करत नाहीत. ती बाजारातून खरेदी करुन देणार आहे असे श्री. अजित घाटे (मालक) यांनी वैद्यकीय संचालक यांना दि..१६/०९/२००८ रोजी दुरध्वनीवरुन सांगितले तसेच सदरचे इन्स्ट्रुमेंट हे आपल्या रुग्णालयात देखील वापरलेले नाहीत.

आतापर्यंत आपणांकडे मे.कालेलकर सर्जिकल, मुंबई यांचेकडूनच सर्जिकल इन्स्ट्रुमेंट खरेदी करण्यात आलेली असून त्याचा अनुभव समाधानकारक आहे. त्यामुळे मे.कांचन ड्रग्ज,पुणे यांच्या ऐवजी ती इन्स्ट्रुमेंट मे. कालेलकर सर्जिकल यांचेकडून घेण्यात यावी. पुरवठा आदेश दिल्यानंतर सदरची इन्स्ट्रुमेंट ही संबंधीत सर्जनने त्यांचे दुकानात जाऊन त्यांना हवी असलेली चांगल्या प्रतीची इन्स्ट्रुमेंट निवडुन घ्यावी.

Opthalmic Instrument करीता मे.कालेलकर सर्जिकल,मुंबई यांचे दर आलेले नाही. सदरच्या इन्स्ट्रुमेंटसाठी अंदाजे रु.७५०००/- खर्च अपेक्षित आहे. त्यासाठी मे.कांचन ड्रग्ज ,पुणे व पौर्णिमा सर्जिकल , नाशिक या दोघांचे पुर्ण सेट साठी दर प्राप्त झालेले आहेत. दोघांचे इन्स्ट्रुमेंट नेत्र शल्य चिकित्सक यांनी समक्ष जाऊन पहाणी करुन अथवा रुग्णालयात नमुना बोलवुन त्यातील जी इन्स्ट्रुमेट त्यांना चांगल्या प्रतीची वाटतील ती खरेदी करावी अशी शिफारस करण्यात आलेली आहे.

## B) Surgical Instrument -

| Sr.No. | Name of Instrument | Name of Tenderer | Qty. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01. | General Surgery Instrument | Kalelkar Surgical, Mumbai | - | 1920864.40 |
| 02. | E.N.T. Instrument | Chimco Bio-medical Eng. Co., Mumbai | - | 255135.00 |
| | | Kalelkar Surgical, Mumbai | - | 214913.12 |
| 03. | Gynecology Instruments | Kalelkar Surgical, Mumbai | - | 162482.37 |
| 04. | Laparoscopic Instruments (Karl Storz) | Chimco Bio-medical Eng. Co., Mumbai | - | 2203826.00 |
| 05. | Cardiac Surgery Instruments | Zenith Surgical, Mumbai | - | 528512.00 |
| | | Kalelkar Surgical, Mumbai | - | 47262.16 |
| | | B.L.Lifescience, Mumbai | - | 1126137.00 |
| | | **Total in Rs.** | **6459132.05** | |

## C) Furniture -

न्युरो ऑपरेशन थिएटर व आय.सी.यु.मध्ये लागणारे फर्निचर खरेदीकामी मे.भारत सर्जिकल, पुणे यांचेकडून देखील दर मागवुन घेण्यात यावीत व त्यानंतर मे.जनक हेल्थकेअर, मुंबई या दोघांचे तुलनात्मक दर व दर्जा बघुन खरेदीकामी पुढील निर्णय घेण्यात यावा असे ठरले.

तसेच ज्या पुरवठाधारकांनी L/C व्दारे पेमेंटची मागणी केलेली असेल त्यांना L/C व्दारे पेमेंट करण्यास मान्यता असावी.

उपरोक्त शिफारशीनुसार मशिनरी/उपकरणे/इन्स्ट्रुमेंट खरेदीकामी एकुण (A+B) रु. ३,६०,१६,५५५.५५ इतका खर्च येणार असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,सदरहू विषयावरील चर्चा तुर्त स्थगित ठेवण्यात येऊन उपरोक्त मशिनरी/उपकरणे/इन्स्ट्रुमेंट खरेदीबाबत मा.श्री.शंकरराव गेणूजी कोल्हे,उपाध्यक्ष व मा.डॉ.पी.एल. तिवारी, विश्वस्त यांचे उपस्थितीत निर्णय घेण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.३५** **श्रीसाईनाथ रुग्णालयातील ऑपरेशन थिएटर विभागासाठी सी.आर्म मशिन खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.८५२** श्री साईनाथ रुग्णालयाच्या आर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर विभागासाठी सन १९९९ मध्ये मे. विप्रो जी. ई. मेडीकल सिस्टीम ली., मुंबई यांचेकडून सी.आर्म मशिन (Stenoscope ६०००) रु.१८,६०,०००/- इतक्या रक्कमेत खरेदी करण्यात आलेले होते.

सदरचे मशिन बायबॅक करणे बाबत बायोमेडीकल विभागाने त्यांचे दि.१२/०७/२००८ चे पत्रान्वये सदर मशिनवर आतापर्यंत रक्कम रु.३,५६,७१३/- इतका खर्च झालेला आहे व आताचे दुरुस्तीकामी येणारा खर्च अंदाजे रु.९,१६,५४०/- इतका सांगीतला होता.

परंतु याकामी मे.विप्रो जी.ई. मेडीकल सिस्टीम ली., मुंबई यांचेकडून दुरुस्तीकामी प्रत्यक्ष खर्चाचे कोटेशन मागविले असता त्यांचे दि.२६/०९/२००८ चे पत्राअन्वये सदरचे दुरुस्तीकामी रु.२७,९२,४००/- इतका खर्च कळविला आहे. प्राप्त परिस्थितीचा विचार करीता आपणास सध्या असलेले मशिन बायबॅक करुन नविन मशिन खरेदी करणे योग्य राहिल. तर नविन मशिन घेण्यासाठी अंदाजे रु.२७,००,०००/- पर्यंत खर्च येईल.

तेंव्हा उपरोक्त प्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयातील जुने सी.आर्म मशिन बायबॅक करुन नविन मशिन विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२७,००,०००/- च्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर कला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक )

**विषय नं.३६** **श्रीसाईबाबा संस्थान रुग्णालयासाठी नांदुर्खी जवळील संस्थानच्या ३७ एकर जागेमध्ये संकुल बांधणेबाबत**
**निर्णय क्र.८५३** **प्रस्तावना :-**

(१) श्री साईनाथ रुग्णालयाची इमारत १९६४ या वर्षी बांधण्यात आली होती.

(२) या इमारतीच्या नूतनीकरणासाठी श्री साईनाथ रुग्णालय सन २००३ मध्ये धर्मशाळा - २०० रुम येथे अस्थायी तत्वावर स्थलांतरित करण्यात आले.

(३) २००४ वर्षात नवनियुक्त व्यवस्थापन मंडळाने नूतनीकरण झालेल्या इमारतीत सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल सुरु करण्याचा निर्णय घेतला.

(४) श्री साईनाथ रुग्णालय हे उपरोक्त धर्मशाळेतच चालविण्यात यावे, असा निर्णय झाला.

(५) श्री साईबाबा सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलला जनसामान्यांकडून फार मोठा प्रतिसाद मिळाला. परंतु १९६४ या वर्षी बांधलेली व नूतनीकरण केलेली इमारत सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलच्या दृष्टीने स्थापत्य शास्त्रदृष्ट्या तसेच जरुर तितक्या जागेअभावी सुयोग्य ठरली नाही.

अद्यापही काही अतिविशिष्ट सेवा सुरु करण्याची गरज जाणवत आहे. परंतु जागेअभावी यात यश येणे शक्य नाही.

(६) श्री साईनाथ रुग्णालय हे धर्मशाळेत स्थलांतरित करण्यात आल्याने तेथील स्थापत्य हे रुग्णालयाच्या दृष्टीने योग्य नव्हते. तेथील रुगांच्या संख्येमध्ये पूर्वीच्या आकडेवारीत फारसा फरक पडलेला नसून अद्यापही तेथे दररोज सुमारे ८०० ते ९०० बाह्य रुग्ण व २०० पर्यंत अंतर्रुग्ण असतात.

परिणामतः दोन्ही रुग्णालयांसाठी असलेल्या इमारती तेथे उपलब्ध असलेल्या वैद्यकीय सेवांसाठी सोईस्कर नसून अनेक अडचणींना व जागेच्या कमतरतेला तोंड द्यावे लागत आहे.

या दोषांपायी रुग्णांची गैरसोय होत असून त्यांच्या तीव्र प्रतिक्रिया वारंवार उद्‌भवत असतात. रुग्णालय कर्मचा-यांनाही रुग्णसेवेमध्ये अनेक अडचणी जाणवतात. परंतु रुग्णसेवेबाबत जनसामान्यांकडून समाधान व्यक्त होत असते व ही हॉस्पिटल्स् श्री साईबाबांच्या कृपादृष्टीचा परिणाम असल्याची भावना आहे.

दोन्ही हॉस्पिटल्सवर संस्थानतर्फे भांडवली व आवर्ती खर्च मोठा प्रमाणावर केला जात असूनही येथील रुग्णांमध्ये जागेची कमतरता व इतर ब-याच अडीअडचणींमुळे असमाधानाची भावना असल्याचे जाणवते. कर्मचा-यांनाही आपल्या क्षमतेनुसार पूर्ण सेवा देता येत नाही.

**वरील मुद्यांवर विचार करुन मा.व्यवस्थापन मंडळाने दोन्हीही रुग्णालयांसाठी एकाच परिसरात नव्याने इमारती बांधून तेथे वैद्यकीय सेवा स्थलांतरित करण्याचे ठरविले आहे.**

**उपरोक्त विषयासंदर्भातील कार्यवाहीसाठी पुढील मुद्यांवर विचार व्हावा, असे मत आहे.**

(१) दोन्ही रुग्णालयांना मिळत असलेला रुग्णांचा प्रतिसाद व रुग्णालयांची वाढती लोकप्रियता लक्षात घेता श्री साईबाबा संस्थानच्या नांदुर्खीजवळील ३७ एकर जागेमध्ये हॉस्पिटल्स्‌संबंधात विशेषज्ञ असलेल्या स्थापत्य शास्त्र विशारदाकडून जागेची आखणी (Space Planning) करुन अद्ययावत सोयींनी युक्त अशा दोन वेगवेगळया इमारती बांधण्यात याव्यात. या इमारती ग्राऊंड + २ मजले अशा घाटणीच्या असाव्यात.

(२) एक इमारत अतिविशिष्ट वैद्यकीय सेवांसाठी (सुपरस्पेशालिटी) राखीव ठेवण्यात यावी व तेथे २००/३०० बेड्‌सची सुविधा असावी.

सुपरस्पेशालिटी सेवा पुढीलप्रमाणे असाव्यात.

(1) Neurology (2) Neuro Surgery (3) Cardiology
(4) Cardio-thoracic Surgery (5) Nephrolgy with Dialysis Centre
(6) Urology (7) Advanced Orthopaedics Centre (Joint Replacements)
(8) Plastic Surgery (9) Traumatology - Trauma Care Unit

वरील सेवांसाठी International Standards प्रमाणे ऑपरेशन थिएटर्स, क्रिटीकल केअर वॉर्ड्‌स इत्यादींचे Space Planning, वातानुकुलन यंत्रणा, प्रकाश योजना, Unidirectional Traffic of patients /relatives/hospital staff साठी योजना इत्यादी वैशिष्टयांचा अंतर्भाव असणे योग्य ठरेल.

**येथील सेवादर सध्याप्रमाणे असावेत अथवा त्यांची पुनर्निश्चिती करण्यात यावी.**

(३) दुसरी इमारत (श्री साईनाथ रुग्णालयातील सध्याच्या परिस्थितीप्रमाणे) सवलतीच्या दरातील वैद्यकीय सेवांसाठी असावी. या इमारतीमध्ये इतर सर्वसामान्य रुग्णालयांप्रमाणेच सोयी असाव्यात.

तेथील रुग्ण कक्ष जनरल वॉर्ड्स-Rigg's Pattern अथवा Nightingale Pattern या तत्वांवर असावेत.

शस्त्रक्रिया विभाग व अतिदक्षता विभाग इतर सर्वसामान्य रुग्णालयांप्रमाणेच असावेत.

येथील सेवादर श्रीसाईनाथ रुग्णालय येथील सद्यस्थितीप्रमाणे असावेत अथवा त्यांची पुनर्निश्चिती करण्यात यावी.

(४) सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये परिपूर्ण रुग्णसेवेसाठी जनरल स्पेशालिटी डॉक्टरांची (Physician, General Surgeon, Pediatrician,Ophthalmologist, Gyanacologist, ENT Surgeon इ.) आवश्यकता असते व हे Team Work असते. वरील जनरल स्पेशालिटी डॉक्टर्स सुपरस्पेशालिटी रुग्णालयातील इमर्जन्सी कॉल्स पाहतील व जनरल स्पेशालिटी रुग्णालयात पूर्णवेळ तत्वावर काम करतील.

(५) दोन्ही रुग्णालयांसाठी आया-वॉर्डबॉय, सफाई कामगार, सुरक्षा व्यवस्था यांचे Out Sourcing असावे. सद्यस्थितीप्रमाणेच प्रसादालयामार्फत भोजनव्यवस्था करण्यात यावी.

(६) दोन्ही रुग्णालयांसाठी समाईक उपहार केंद्र (कॅन्टीन), रुग्णांच्या नातेवाईकांसाठी धर्मशाळा, बगीचा, मेडीकल स्टोअर, जनरल स्टोअर, वाहनतळ व्यवस्था इत्यादीचे नियोजन असावे.

(७) या परिसरात दोन्ही रुग्णालयांच्या कर्मचा-यांसाठी (डॉक्टर्स, नर्सेस, पॅरामेडीकल स्टाफ) यांच्यासाठी वरिष्ठतेनुसार निवासस्थाने बांधण्यात यावीत (स्वतंत्र बंगला, २ BHK, १ BHK इत्यादी).

(८) या परिसराचे सुशोभिकरण (Land-Scaping) करण्यात येऊन बगीचा, क्रिडाक्षेत्र - Gymnasium इत्यादीच्या सुविधा असाव्यात.

(९) तेथील पाण्याची मुबलकता लक्षात घेता या प्रकल्पासाठी उपरोक्त परिसर सर्वच दृष्टींनी सुयोग्य आहे.

(१०) हा परिसर शिर्डी पासून सुमारे ५ किलोमीटर अंतरावर असला तरी खालील कारणास्तव तोच सुनिश्चित करण्यात यावा.

(अ) शिर्डी नगरातील वाढती रहदारी, नवीन-नवीन हॉटेल्स, श्री साईभक्तांची वाढती संख्या, पर्यटन क्षेत्रांशी निगडीत वाढते विपणन - इत्यादींमुळे हॉस्पिटल्स् सारख्या सेवा या परिसरापासून काही जास्त अंतरावर नेणे आवश्यक ठरत आहे.

(ब) रुग्णांसाठी सुध्दा वातावरणातील वाढते प्रदुषण, ध्वनी प्रदुषण इत्यादींमुळे हॉस्पिटल्स् स्थलांतरित करणे गरजेचे ठरत आहे.

(क) सदर परिसर हा प्रस्तावित विमानतळाच्या रस्त्याजवळ असल्यामुळे भविष्यात तेथे रुग्णांसाठी जाणे-येण्याच्या अनेक सुविधा निर्माण होण्याची शक्यता आहे.

(ड) हा परिसर संगमनेर-नाशिक रस्त्यालगत असून राहाता शहर, शिर्डी व इतर अनेक ग्रामीण क्षेत्रांपासून जवळ आहे. यामुळे रुग्णालयाचे प्रभावक्षेत्र (Drainage Area) जास्त विस्तृत होऊन अधिकाधिक रुग्णांना सवलतीच्या दरातील वैद्यकीय सेवा उपलब्ध होऊ शकेल.

उपरोक्त मुद्यांचा विचार करता सदर प्रस्तावित प्रकल्प नांदुर्खी जवळील ३७ एकर जागेत निर्माण करणे योग्य ठरेल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त नांदुर्खी जवळील ३७ एकर जागा संस्थानने ताब्यात घेऊन त्या जागेस काटेरी तारेचे कुंपण घालण्यात यावे असे ठरले.(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.३७** **श्रीसाईबाबा संस्थान रुग्णालये,शिर्डी व प्रवरा रुरल हॉस्पिटल,लोणी यांचे समन्वय समितीचे सभेबाबत.**

**निर्णय क्र.८५४** पीएमटी, लोणी यांचेकडून प्राप्त झालेल्या पत्रामधून दि.२९.०९.२००८ रोजी झालेल्या चर्चेतील निर्णयांबाबत ब्रिगे. (रिटा.) श्री डी.एन.अग्रवाल, जॉईंट सेक्रेटरी, पीएमटी, लोणी यांनी मुद्देनिहाय मसुदा पाठविला आहे. त्या अनुषंगाने पी.एम.टी. च्या पदाधिका-यांना संदर्भीय क्र.०२ चे पत्रान्वये पत्रोत्तर पाठविण्यात आले आहे.

खालील टिपणीमध्ये पी.एम.टी.च्या पदाधिका-यांना पाठविलेल्या पत्रातील विविध विषयांना दिलेली मुद्देनिहाय उत्तरे पत्रोत्तर या शिर्षकापुढे दिलेली आहे.

Remarks या व्दारे विविध मुद्यांवर स्पष्ट मत दिलेले असून चर्चा तथा निर्णयास्तव सादर केले आहे.

**(१) कॅन्सर क्लिनिक :-**

**पत्रोत्तर :-** श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील जागेच्या अभावी सध्या कॅन्सर क्लिनिकसाठी जागा उपलब्ध करुन देणे शक्य नाही. परंतु पायाभूत अंतर्रचनेत सुधारणा करुन सदर क्लिनिकसाठी जागा सुनिश्चित करण्याचे सर्वोपतरी प्रयत्न करणे चालू आहे.

**Remarks :-** दि.२०.०९.२००८ रोजी वैद्यकीय उपसमितीच्या सभेतील इतिवृत्तानुसार कर्करोग आजारावरील चिकित्सा व उपचार प्रवरा ग्रामीण रुग्णालयात केले जावेत अन्यथा कर्करोगावरील किमोथिरॅपी, रेडीओथिरॅपी, विविध ऑपरेशन्स, रेडिओ आयसोटोप थिरॅपी, Hormone थिरॅपी इत्यादी

महागडे उपचार श्री साईबाबा हॉस्पिटल येथे केले गेल्यास नियमाप्रमाणे दारिद्रय रेषेखालील रुग्णांस चॅरिटी देणे क्रमप्राप्त होऊन कोटयावधी रुपयांचा आर्थिक बोजा संस्थानवर पडणे अटळ होईल.

**(२) Palliative / Terminal Care Centre (कर्करोग अथवा एड्स रोगाच्या अंतिम अवस्थेतीतील रुग्णांसाठी शुश्रुषा केंद्र) :-**

**पत्रोत्तर :-** सदर विषय मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयार्थ सादर करण्यात येईल. परंतु असे केंद्र निर्माण करण्याचा निर्णय झाल्यास ते केंद्र हे श्री साईबाबा संस्थान रुग्णालयांच्या अखत्यारी पासून स्वतंत्र असेल.

**Remarks :-** अशा प्रकारचे केंद्र निर्माण केल्यास पुढील शक्यता विचारात घ्याव्या लागतील.

(अ) सदर केंद्र हे हॉस्पिटलच्या स्वरुपाचे असून श्री साईबाबा संस्थानवर तिस-या रुग्णालयाचा आर्थिक बोजा पडेल.

(ब) भरती झालेले रुग्ण अतिगंभीर व मरणोन्मुख अवस्थेत असले तरी ते किती कालावधीपर्यत (दिवस/आठवडे/महिने) जिवंत राहतील हे अनिश्‍चित असल्यामुळे त्यांना दिलेले बेड तितक्या कालावधीपर्यंत भरलेले राहतील.

(क) रुग्णांचे नातेवाईक त्यांच्याबरोबर रहावे असे बंधन नसल्यामुळे सदर रुग्णांच्या शुल्कांची संपूर्ण वसूली शक्य होणार नाही.

(ड) कर्करोग व एड्स यावरील उपलब्ध औषधे अत्यंत महागडी असून रुग्णांच्या नातेवाईकांनी विकत न आणल्यास त्यावरील आर्थिक बोजा श्री साईबाबा संस्थानवर पडणे शक्य आहे.

(इ) आपल्या देशात अशा प्रकारच्या सुविधा अत्यल्प असल्यामुळे तसेच मरणोन्मुख रुग्णांची संख्या जास्त असून त्यापैकी ०.१ टक्का रुग्णांचीही सोय श्री साईबाबा संस्थानकडून होऊ शकत नाही.

**(३) श्री साईबाबा संस्थान रुग्णालयांमध्ये Interns / Residents यांच्या नियुक्तीबाबत :-**

**पत्रोत्तर :-** प्रवरा रुरल हॉस्पिटल, लोणी मधून फक्त दोन Interns ची नियुक्ती श्री साईबाबा संस्थान हॉस्पिटल्समध्ये करण्यात यावी व श्री वाय.बी.शर्मा, डीन पीएमटी, लोणी यांनी जरुर त्या औपचारीकतेबद्दल योग्य ती कार्यवाही करावी व या संदर्भात समन्वय साधावा असा निर्णय झालेला आहे.

**Remarks :-** पीएमटी, लोणी तर्फे इकडे दोन interns ची नियुक्ती झाल्यास पीएमटी येथे interns ना दिल्या जाणा-या Stipend प्रमाणेच येथेही Stipend दिला जावा

**(४) श्री साईबाबा संस्थान रुग्णालयांमधून पीएमटी, लोणी येथे रुग्ण स्थलांतरीत करणेबाबत :-**

**पत्रोत्तर :-** जेव्हा श्री साईबाबा संस्थान रुग्णालयांमध्ये बेड्स उपलब्ध नसतील अशा प्रसंगी गंभीर रुग्णांना पीएमटी मध्ये तात्काळ तत्वावर स्थलांतरीत करण्यात यावे, असा निर्णय झालेला आहे.

**अशा स्थलांतरीत रुग्णांचे बिल श्री साईबाबा संस्थानने पीएमटी कडे भरणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर केला जाईल.**

**Remarks :-** श्री साईबाबा संस्थानच्या दोन्ही रुग्णालयांमध्ये एकंदर ४५० रुग्णांवर उपचार केला जातो. त्यापैकी श्री साईनाथ रुग्णालयात उपचार शुल्क नगण्य असून श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये मोठया प्रमाणावर चॅरिटी होत असते. जर अतिरिक्त रुग्ण पीएमटी, लोणी येथे स्थलांतरीत करुन त्यांचे बिल श्री साईबाबा संस्थानतर्फे भरले गेल्यास संस्थानवर सुमारे १०० पर्यंत अधिक रुग्णांचा आर्थिक भार पडू शकतो. ही कार्यव्यवस्था Out-Sourcing of patient-beds अशा प्रकारची असणार आहे. श्री साईबाबा संस्थानच्या हॉस्पिटल विभागाच्या वार्षिक अंदाजपत्रकात (Annual Budget) सुमारे २० ते २५ टक्केपर्यंत वाढ करावी लागेल.

**(६) विषबाधा व सर्पदंश रुग्णांच्या उपचारांसाठी स्वतंत्र केंद्र उभारणीबाबत :-**

**पत्रोत्तर :-** अशा प्रकारच्या संकल्पित केंद्राच्या संकल्पनेचे सर्व उपस्थितांनी स्वागत केले. परंतु यासाठी साकल्याने संपूर्ण नियोजन तथा शुल्क आकारणी वरील विविध पर्याय या सर्वांचा सर्वंकष विचार होऊन त्यानुसार प्रकल्प अहवाल करणे ही प्राथमिक आवश्यकता आहे. या संदर्भातील कार्यवाहीनंतर सदर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर केला जाईल.

**Remarks :-** आजतागायत विविध विषबाधेचे तसेच सर्पदंशाचे रुग्ण श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये भरती करण्यात आले असून कोणालाही कोणत्याही कारणास्तव बाहेर स्थलांतरित केले गेलेले नाहीत. तरी संकल्पित वेगळया केंद्राच्या मुलभूत गरजेचा /आवश्यकतेचा पुनर्विचार व्हावा, असे मत आहे.

**(७) कार्डीयॅक अम्बुलन्स जरुरीनुसार पीएमटी येथे पाठविणेबाबत :-**

**पत्रोत्तर :-** पीएमटी कडून कार्डीयॅक अम्बुलन्सचे वेळोवेळी सुधारीत केलेल्या शुल्क दरानुसार पेमेंट व्हावे, असा निर्णय झाला.

**Remarks :-** निरंक

**(८) पॅरॉमेडीकल कर्मचा-यांना प्रशिक्षण देणेबाबत :-**

**पत्रोत्तर :-** सदरच्या प्रस्तावाला सर्व उपस्थितांनी सहमती दर्शवून नियोजित कार्यक्रमाच्या (कालावधी, स्थळ इत्यादी) रुपरेषेबद्दल पुढच्या सभेत मा.अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, पीएमटी, लोणी यांच्या मार्गदर्शनाखाली निर्णय व्हावा, असे सर्वानुमते ठरले.

**Remarks :-** निरंक

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पीटल,शिर्डी व प्रवरा रुरल हॉस्पिटल, लोणी या दोन्ही हॉस्पिटलचे Co-ordination असावे तसेच प्रवरा रुरल हॉस्पिटल, लोणी यांना आवश्यकतेनुसार प्रचलित दर आकारुन अॅम्ब्यूलन्स उपलब्ध करुन द्यावी व उपसमितीने निर्णय घ्यावा असे ठरले.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.३८** **श्रीसाईबाबा रुग्णालयात भाडे तत्वावर औषध दुकान चालविणेबाबत चर्चा करुन निर्णय घेणे बाबत.**

**निर्णय क्र.८५५** श्री साईबाबा रुग्णालयात भाडे तत्वावर औषध दुकान चालविणस निविदा सादर केलेल्या सर्वच निविदासादरकर्त्यांना व्यवस्थापन समितीचे पूढील सभेपूढे चर्चा /वाटाघाटीसाठी आमंत्रित करण्यात यावे असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.३९** **दैनंदिन कामकाजासाठी फाईल्स व फोल्डर खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.८५६** संस्थानचे विविध विभागाकडून सादर करण्यात येणारी कागदपत्रे ही २ फ्लॅप/४ फ्लॅप पॅडस, प्लॅस्टीक फाईल्स, फुल बंद कापडी पॅडमधून मा.कार्यकारी अधिकारी यांचेकडे पाठविणेत येतात. सततच्या वापरामुळे सदरील फाईल्सच्या लेस निघतात, त्याचे कापड फाटते तसेच तातडीच्या फाईल्स, सभेपुढे सादर करावयाच्या टिपण्या अथवा इतर सर्व कागदपत्रे विविध रंगाच्या पॅडमध्ये असल्याने त्याची वर्गवारी लवकर समजत नाही. मा.कार्यकारी अधिकारी यांचे स्वाक्षरीसाठी कागदपत्रे पाठविण्यासाठी सुसुत्रता आणणेकरीता २फ्लॅप/४फ्लॅप पॅडस, प्लॅस्टीक फाईल्स ऐवजी चांगल्या प्रतीचे प्लॅस्टीक फोल्डर्स व फुल बंद पॅड खरेदी करणे आवश्यक आहे. तातडीच्या प्रकरणांकरीता हिरव्या रंगाचे, सभेपुढे सादर करावयाच्या टिपण्यासाठी लाल रंगाचे व इतर सर्व प्रकरणांसाठी जांभळया रंगाचे फोल्डर्स व फुल बंद पॅड विभागाचे नाव छपाईसह प्रशासन शाखेने खरेदी करुन मागितलेले आहेत.

त्यानुसार विभागाकडून मागविणेत आलेल्या फोल्डर्स व बंद पॅडचा तपशील व येणाऱ्या अंदाजे खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं. | फाईल प्रकार | फाईल रंग | अंदाजे मागणी | अंदाजे दर प्रती नग | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| **प्लॅस्टीक फोल्डर्स** | | | | | |
| ०१. | तातडीचे प्रकरणे | हिरवा रंग | १३०० नग | रु.२५/- | रु. ३२,५००/- |
| ०२. | सभेपुढील प्रकरणे | लाल रंग | १२०० नग | रु.२५/- | रु. ३०,०००/- |
| ०३. | इतर सर्व प्रकरणे | जांभळा रंग | २१०० नग | रु.२५/- | रु. ५२,५००/- |
| **प्लॅस्टीक फुल बंद पॅड** | | | | | |
| ०४. | तातडीचे प्रकरणे | हिरवा रंग | २२५ नग | रु.५०/- | रु. ११,२५०/- |
| ०५. | सभेपुढील प्रकरणे | लाल रंग | २७५ नग | रु.५०/- | रु. १३,७५०/- |
| ०६. | इतर सर्व प्रकरणे | जांभळा रंग | ३७५ नग | रु.५०/- | रु. १८,७५०/- |
| | | | | **एकुण** | **रु.१,५८,७५०/-** |

उपरोक्त प्रमाणे विविध विभागासाठी आवश्यक असणारे फोल्डर्स व बंद पॅड हे विहीत पद्धतीने कोटेशन मागवून खरेदी करता येईल. तरी दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक असणारे फोल्डर्स व फाईल्स खरेदीस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.१,५८,७५०/- मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**विषय नं.४०** **आय.टी.आय. विभाग कन्झुमेबल मटेरियल खरेदीकामी झालेल्या जादा खर्चास मान्यता देणेबाबत.**

**निर्णय क्र.८५७** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०६.०९.२००८ मधील निर्णय क्र.६९६ नुसार औदयोगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांना आवश्यक असणारे हार्डवेअर, कटींग टुल्स, ग्राईंडींग व्हिल्स, रेफ्रिजरेशन, एसी, वेल्डींग साहित्य,आयटी व इलेक्ट्रिक साहित्य खरेदीस व त्याकामी येणारे रक्कम रु.२ लाख पर्यंतचे खर्चास मान्यता आहे. त्यानुसार संस्थान जा.क्र.एसएसएस/खरेदी-औप्रसं/१४८६०/२००८ दि.०९.१०.२००८ अन्वये १४ पुरवठाधारकांकडून मागविणेत आलेली दरपत्रके उघडणेत येऊन न्युनतम दराने खालील पुरवठाधारकांना पुरवठा आदेश पाठविणेत आलेले आहेत.

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नांव व गांव | पुरवठा आदेशातील रक्कम |
|---|---|---|
| ०१. | हिंदुस्थान टुल्स अॅण्ड इंजिनीअरींग कंपनी, मुंबई | रु.१,५३,५४५.३३ |
| ०२. | राजु एंटरप्राईजेस, मुंबई | रु. ५१,०५१.८० |
| ०३. | मनोहर ट्रेडींग कंपनी, श्रीरामपूर | रु. २६,८८५.०० |
| ०४. | कॉम्प्युलिंक्स, मुंबई | रु. २३,९२०.०० |
| | एकुण | रु.२,५५,४०२.१३ |
| | साहित्याचे वजन किलोमध्ये असल्याने वाढ/घट विचारात घेता येणारी पुर्णांकित रक्कम | **रु.२,६०,०००.००** |

औदयोगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यासाठी मागणी करणेत आलेले सर्व साहित्य अत्यावश्यक असल्याने खरेदी करणे गरजेचे आहे. मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णयानुसार रु.२ लाख पर्यंतचे खर्चास मान्यता असल्याने मुळ मंजूरीपेक्षा रु.६०,०००/- जादा खर्च येत आहे.

तरी औदयोगिक प्रशिक्षण संस्थेसाठी आवश्यक असणारे हार्डवेअर, कटींग टुल्स, रेफ्रिजरेशन व इलेक्ट्रिकल्स साहित्यासाठी मूळ मंजूरीपेक्षा जादा आलेल्या रक्कम रु.६०,०००/- चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**विषय नं.४१** **प्रसादालयातील ट्रॉली व्हील खर्चास कार्योत्तर मान्यता घेणेबाबत.**

**निर्णय क्र.८५८** प्रसादालयामध्ये प्रसादभोजन , पाणी वगैरे , पदार्थ वितरीत करणेसाठी , धान्य , कडधान्य , डाळी , आटा , तेल , तुप वहातुकीसाठी ट्रॉलीचा वापर करण्यात येत आहे. सदर ट्रॉलीचे व्हील व ब्राकेट दैनंदिन वापरामुळे खराब होतात. त्यामुळे कर्मचा-यांना ट्रॉली ओढून नेतांना फार कष्ट पडतात. तसेच व्हीलचा आवाज येतो , ट्रॉलीची गती कमी होते , त्यामुळे कामावर परिणाम होतो. वरीलप्रमाणे अडचणीचा विचार करुन प्रसादालयाकडील दिनांक ०१/०४/२००८ चे मंजूर टिपणीनूसार रुपये २५,०००/- चे खर्चास मान्यता घेउन ॲडव्हान्स घेण्यात आलेला होता.

प्रसादालयाकडील दिनांक १/०४/२००८ चे मंजूर टिपणीनूसार पायोनियर इंजिनिअरींग इंडस्ट्रीज, पुणे या दर्जेदार व्हील उत्पादित कंपनीकडून ट्रॉली व्हील थेट खरेदी करण्यात आलेले आहे.

| अं.नं. | बील नं. व तारीख | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | १०१६६ / २५.०४.२००८ | १३,३००.०० |
| २. | १०२०५ / ३०.०४.२००८ | १३,६२९.०० |
| | एकूण रुपये = | २६, ९२९.०० |

सदर ट्रॉली व्हील आवश्यक असलेने थेट उत्पादक कंपनीकडून खरेदी केलेले आहेत. त्याकामी एकूण रुपये २६,९२९/- खर्च आलेला आहे. तरी सदर खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

**विषय नं.४२** **संरक्षण विभागासाठी लोखंडी (सुरक्षा)बॅरीकेटस् तयार करणे बाबत**

**निर्णय क्र.८५९** साईभक्तांचे सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून ठिकठिकाणी मुव्हेबल लोखंडी जाळया (बॅरीकेटस्) ठेवण्यात आलेले आहे. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | ठिकाण | बॅरीकेटस् | अ.क्र. | ठिकाण | बॅरीकेटस् |
|---|---|---|---|---|---|
| ०१) | पुर्व महाव्दार | ०५ | ०९) | धबधबा मार्ग | ०३ |
| ०२) | भक्त प्रवेशव्दार | ०३ | १०) | उदी काऊंटर | ०२ |
| ०३) | शांतिनिवास प्रवेशव्दार | १२ | ११) | व्दारकामाई दक्षिणबाजू | ३४ |
| ०४) | गेट नं.०१ | ०४ | १२) | गुरुस्थान मंदिर | ०७ |
| ०५) | गेट नं.०२ | ०१ | १३) | देणगी विभाग ते कापडकोठी | ०३ |
| ०६) | गेट नं.०३ | ०४ | १४) | पिंपळवाडी नवा रोड | ११५ |
| ०७) | गेट नं.०४ | ०२ | १५) | नगर-मनमाड रोड | ७३ |
| ०८) | गेट नं.०५ | ०३ | | एकुण :- | २७१ |

असे एकुण २७१ बॅरीकेटस् असून सदरील बॅरीकेटस् त्या त्या ठिकाणी आवश्यक आहे. परंतू आता नाटयगृह समोरील जागा रिकामी केल्यामुळे साईभक्तांना रथ / पालखी सोहळा व्यवस्थीत पाहता यावा यासाठी त्याठिकाणी आणखी नविन एकुण ३० (बॅरीकेटस्) लोखंडी जाळयांची आवश्यकता आहे. तरी सदरील लोखंडी जाळया विद्युत विभागामार्फत तातडीने तयार करुन मिळणेकामी संरक्षण विभागाने जा.नं.७८७/२००८ दि.२६-१०-२००८ चे टिपणी अन्वये कळविले आहे.

त्यानुसार नाटयगृहा समोरील जागा रिकामी केल्यामुळे साईभक्तांना रथ / पालखी सोहळा व्यवस्थीत पाहता यावा यासाठी ३० नग बॅरीकेटस् तयार करणेकामी आवश्यक असणारे मटेरीअल विद्युत विभागाकडील वर्कशॉपमध्ये शिल्लक नसल्याने पुढीलप्रमाणे मटेरीअलची खरेदी करणे आवश्यक आहे. तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | तपशील | मागणी | दर(अंदाजे) रुपये | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१) | एम.एस.ॲंगल,साईज:-३५ x३५ x५एम.एम. | ३००किलो. | ४२/- (प्रति किलो) | १२,६००.०० |
| ०२) | एम.एस.स्क्वेअर जाळी,<br>साईज :-५०x५० x ५ एम.एम.(३` उंचीची) | २००<br>रनिंग फुट. | ५५/-<br>(प्रति रनिंग फुट) | ११,०००.०० |
| ०३) | जी.आय.पाईप, साईज :-१.१/२`` सी क्लास. | ६६० फुट. | ८०/- (प्रति फुट) | ५२,८००.०० |
| ०४) | जी.आय.बेंड, साईज :-१.१/२`` सी क्लास. | १२० नग | ५०/- (प्रति नग) | ६,०००.०० |
| ०५) | जी.आय.पाईप, साईज :-१/२`` सी क्लास. | ३०० फुट. | ३०/- (प्रति फुट) | ९,०००.०० |
| ०६) | एम.एस.फ्लॅट पट्टी,<br>साईज :-७५ x १२एम.एम. | १५० किलो. | ४५/-<br>(प्रति किलो) | ६,७५०.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०७) | सफेद कलर | ०१० लिटर. | .१९०/-(प्रतिलिटर) | १,९००.०० |
| | | | रक्कम :- | १,००,०५०.०० |
| | | | + लेबर चार्जेस २५% :- | २५,०१३.०० |
| | | | एकुण रक्कम :- | १,२५,०६३.०० |
| | | | + कॉन्टीजेन्सी ५% :- | ६,२५३.०० |
| | | | एकुण रक्कम :- | १,३१,३१६.०० |

उपरोक्तप्रमाणे नाटयगृहासमोरील जागा रिकामी केल्यामुळे साईभक्तांना रथ / पालखी सोहळा व्यवस्थीत पाहता यावा यासाठी ३० नग बॅरीकेटस् बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून तयार करुन घेणेसाठी अंदाजे रक्कम रुपये १,३१,३१६/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदर प्रस्तावास मान्यता मिळणेस व बाहेरील फॅब्रिकेटर्स/वर्कशॉपधारकांकडून कोटेशन बोलावून उपरोक्त काम करुन घेणेसाठी मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं.४३** **श्रीमती बेला शर्मा लिखीत, साई अमृत, पुष्पांजली, लाईफ (इं) पुस्तके संस्थान मार्फत प्रकाशित करुन विक्री करणे.**

**निर्णय क्र.८६०** श्रीमती बेला शर्मा, दिल्ली यांनी त्यांचे दि.२५.१०.२००८ चे पत्रान्वये त्यांचेद्वारा लिखीत खालील तपशिलाप्रमाणे ३ हिंदी व ३ इंग्रजी पुस्तके संस्थानद्वारा प्रकाशित करणेबाबत कळविले आहे. सदरचे हिन्दी भाषेतील पुस्तकांचे दिल्ली विद्यापिठाचे प्राध्यापक श्री प्रदिपकुमार दास यांनी त्यांचे दि.११.०९.२००७ चे पत्रान्वये शिफारस पत्र दिले आहे.

**अ) हिन्दी पुस्तके :-**

**१) जीवन** :- श्रीमती बेला शर्मा लिखीत जीवन हे हिंदी भाषिक पुस्तकात मनुष्यरुपी जीवन श्री साईबाबांच्या सेवेत प्रदान करुन साईबाबांची सेवेचा महिमा प्रस्तुत केला आहे.

**२) पुष्पांजली :-** सदरचे पुस्तक हे पद्यात्मक असून या काव्यसंग्रहातून त्यांनी श्री साईबाबांची शिकवण व तत्वज्ञानाचा उपदेश केला आहे.

**३) साँई अमृत :-** सदरचे पुस्तकात श्री साईबाबांचा उपदेश, भक्तांचे कल्याणार्थ श्री साईबाबांचे दृष्टांत व अनुभव याचे वर्णन केले आहे.

वरील पुस्तकांविषयी श्री प्रदिपकुमार दास यांनी खालील विशेष मुद्दे परिक्षणांती सादर केले आहे.

१) पुस्तकातील भाषा ही व्याकरणदृष्ट्या योग्य आहे.

२) साँई अमृत पुस्तकात लेखीका श्रीमती बेला शर्मा यांनी त्यांचे वैयक्तिक संस्कारक्षम अनुभव विस्तारीतकेले आहेत.

३) पुष्पांजली पुस्तक काव्यात्मक असून, त्यात दैवी कवितांचा समावेश करण्यात आला आहे.

४) लाईफ या पुस्तकात मनुष्यरुपी जीवन हे दैवी सेवेसाठी असल्याची जाणीव लेखीकेने उपरोक्त पुस्तकांद्वारे प्रकट केली आहे.

५) वरील तीन्ही पुस्तके साईबाबांबद्दल भक्ती व प्रेमाबाबत भक्तांना परिपूर्ण परिचय करुन देणारे आहेत.

ब) इंग्रजी भाषेतील १) लाईफ २) पुष्पांजली ३) साँई अमृत या इंग्रजी पुस्तकांचे दिल्ली विद्यापिठाचे प्राध्यापक श्रीमती सुमित्रा के चौधरी यांनी त्यांचे दि.१६.०८.२००७ चे पत्रान्वये शिफारस पत्र दिले आहे. या पुस्तकांविषयी श्रीमती सुमित्रा के चौधरी यांनी खालील विशेष मुद्दे परिक्षणांती सादर केले आहे.

१) उपरोक्त पुस्तकांचे परिक्षणा अंती श्रीमती बेला शर्मा यांनी त्यांचे पुस्तकातील लेखनात वापरण्यात आलेल्या भाषेतील व्याकरणात व शब्दकोषात चुका झालेल्या नसून बिनचूक आहे.

२) उपरोक्त पुस्तके ही श्री साईबाबांचे जीवन आणि शिकवण याबाबत परिचय देणारे असून, पुस्तकाचे सदरचे माहितीत काही एक शंका नसल्याची शिफारस केली आहे.

श्रीमती बेला शर्मा, दिल्ली द्वारा लिखीत वरील हिन्दी व इंग्रजी भाषिक पुस्तके प्रकाशित केल्यास ते साईभक्तांसाठी निश्चितच उपयुक्त ठरतील असी शिफारस वरील "अ" व "ब" मध्ये नमुद केलेप्रमाणे दिल्ली विद्यापिठाचे प्राध्यापक यांनी केली आहे.

वरील सर्व पुस्तके श्री साईबाबांचे जीवनावर आधारित व श्री साईबाबांची शिकवण व तत्वज्ञान यावर आधारित आहेत. सध्या आपणाकडे सदर आशयाचे संस्थान प्रकाशित ७० प्रकारचे पुस्तके भक्तांसाठी विक्रीस उपलब्ध आहेत. अजून नव्याने काही निर्णायक ७ पुस्तकांचे प्रकाशन होणे बाकी आहे. श्रीमती बेला शर्मा ,दिल्ली यांचेद्वारा लिखीत पुस्तके ही वर दर्शविल्या वर्णनात्मक विषयाचे तपशिलात्मक अहवालानुसार श्री साईबाबांचे शिकवण व तत्वज्ञान, श्री साईबाबांचे भक्तांना आलेले अनुभव व दृष्टांत यावरच आधारित असल्याने त्यात अलग विशेष नाविन्य असे काही नाही. बहुतांशी वैयक्तिक अनुभवांचाच त्यात समावेश केलेला आहे. श्री साईबाबांचे अवतार व कार्य व त्यांची शिकवण असलेली पुरेशी प्रकाशने संस्थाची आहेत. त्यामुळे सदर पुस्तकांचे हक्क घेऊ नयेत असे मत आहे. त्यानुसार श्रीमती बेला शर्मा, दिल्ली यांना जा.नं.एसएसएस/वशी/प्रकाशने/६२२१/२००८ दि.२९.०४.२००८ अन्वये दिलगीरी पत्र देण्यात आले होते.

श्रीमती बेला शर्मा, दिल्ली यांनी त्यांचे दि.२५.१०.२००८ चे पत्रान्वये त्यांनी पुन्हा वरील हिन्दी व इंग्रजी भाषेतील पुस्तके संस्थानमार्फत प्रकाशित करणेबाबत फेर पत्र पाठविले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४.०५.२००८ चे सभेत "इतर कुठल्याही अन्य खाजगी प्रकाशनांचे हक्क स्वीकारण्यात येऊ नयेत" असा निर्णय क्र.४१५ झालेला असलेबाबतचा निर्णय मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,सर्वश्री मा.विश्वस्त पांडूरंग गमाजी अभग,सुरेश गोरक्षनाथ वाबळे, डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व अशोक भिमाशंकर खांबेकर यांनी श्रीमती बेला शर्मा लिखीत साईअमृत, पुष्पांजली लाईफ (इं) या पुस्तकाचे वाचन करुन आपला अभिप्राय व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करावा असें ठरलें. (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने)

**विषय नं.४४** **क्राफ्टस्मन फूड प्रॉडक्शन (व्हेज) ट्रेडसाठी स्टेनलेस स्टील वर्किंग टेबल व कुकींग रेंज खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.८६१** श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात सत्र ऑगष्ट- २००८ पासून Craftsman Food Production (Veg) हा व्यवसाय सुरु करण्यात आलेला आहे. या व्यवसायामध्ये प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण देणेसाठी आवश्यक असलेला किचन हॉल अद्ययावत करणे आवश्यक आहे. त्याकरीता दि.१५.१०.२००८ रोजी नाशिक पंचवटी येथील महात्मा गांधी विद्यालयाचे हॉटेल मॅनेजमेंटच्या कॉलेजला प्राचार्य यांनी गटनिदेशक व व्यवसाय निदेशक यांचेसह भेट देऊन तेथील अद्ययावत किचन हॉलची पहाणी केली. किचन हॉलसाठी आवश्यक असलेले स्टेनलेसटील वर्कीग टेबल व ४ बर्नर कुकींग रेंज टेबलची माहिती कॉलेजचे उपप्राचार्य श्री.हिरेसर यांचेकडून घेतली असता त्यांनी हॉटेल मॅनेजमेंट गटातील अभ्यासक्रमास आवश्यक असलेले किचन इक्विपमेंटची माहिती दिली.

संस्थेची आवश्यक असणारे किचन टेबल व कुर्कीज रेंज टेबल खालीलप्रमाणे घेतल्यास प्रशिक्षणासाठी सोईचे होईल. यामध्ये शासनाचे अतिरिक्त जागांसाठी आवश्यक दोन कुकींग रेंज अधिकचे धरले आहेत.

संस्थेतील Craftsman Food Production (Veg) किचन अद्ययावत करणेसाठी वरीलप्रमाणे स्टेनलेसस्टील टेबल व कुकींग रेंज टेबल तयार करणेकामी अंदाजे रक्कम रु.३,५०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी वरीलप्रमाणे किचन टेबल व कुकींग रेंज टेबल खरेदी करणेस तसेच येणारा अंदाजे रक्कम रु.३,५०,०००/- पर्यंतचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्राचार्य,आय.टी.आय )

**विषय नं.४५** **श्री राजेंद्र कोहकडे(क्रिडा शिक्षक) यांची पूणे विद्यापीठ क्रिडा निवड समिती सदस्यपदी नियुक्तीबाबत व शाळेच्या हॉलीबॉल संघाची राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धाकरीता झालेली अभिनंदन निवडीबाबत**

**निर्णय क्र.८६२** श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलचे क्रीडा प्रशिक्षक राजेंद्र कोहकडे यांची पुणे विद्यापीठासारख्या पंचतारांकीत विद्यापीठाच्या क्रीडा निवड समितीपदी सन्मानिय निवड झालेली आहे. श्रीयुत राजेंद्र कोहकडे यांची सन २००७-२००८ मध्ये महाराष्ट्र व्हॉलीबॉल संघाच्या मुख्य मार्गदर्शकपदी ही निवड झालेली होती. आतापर्यंत शैक्षणिक संकुलातील अनेक खेळांडुंनी राज्य व राष्ट्रीय पातळीवर त्यांच्या मार्गदर्शनाखाली विविध क्रीडा प्रकारात श्री साईबाबा संस्थानचे प्रतिनिधीत्व केलेले असून, त्याचा क्रीडा क्षेत्रातील कौशल्याचा व ज्ञानाचा वेळोवेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन झालेले आहे.

सध्या श्री साईबाबा इं. मि. स्कुलने क्रीडा क्षेत्रात अहमदनगर जिल्हयात अग्रगण्य स्थान पटकाविले असून आतापर्यंत १६६ पुरस्कार शाळेने प्राप्त केलेले आहे. तसेच इ.१० वी व १२ वी च्या २२ विद्यार्थ्यांना आतापर्यंत महाराष्ट्र शिक्षण मंडळाचे प्रत्येकी २५ क्रीडा नैपुण्य गुण प्राप्त झालेले असून सदर विद्यार्थ्यांना ४.५० % गुणांचा त्यांच्या शेक्षणिक भविष्याकरिता फायदा झालेला आहे. नुकत्याच सोलापुर येथे संपन्न झ ालेल्या पुणे विभागीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेत शाळेने पुणे, सोलापुर, माढा सारख्या संघांना पराजित करुन विजेतेपद पटकाविले. या संघाची रत्नागिरी येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेकरिता निवड झालेली असून संघात इ. १० वी चे ६ विद्यार्थी आहेत. त्यांना २५ क्रीडा नैपुण्य गुण प्राप्त होणार आहेत.

तसेच सोलापुर येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेत (१७ वर्ष मुले वयोगट) गौरव नरेंद्र मते (इ.१० वी) यांची अखिल भारतीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धाकरिता अभिनंदनिय निवड झालेली आहे.

या स्पर्धा कोलकत्ता (पश्चिम बंगाल) येथे संपन्न होत आहे. श्रीयुत राजेंद्र कोहकडे यांनी प्राचार्य सौ. झेड व्ही इनामदार यांचे मार्गदर्शनाखाली महाराष्ट्राच्या क्रीडा क्षेत्रात नेत्रदिपक व उल्लेखनिय कामगिरी बजावली आहे. त्यांना अभिनंदन ठराव संमत व्हावा असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्याची नोंद घेण्यात आली. (कार्यवाही-प्राचार्या, कन्या विद्या मंदिर)

**विषय नं.४६** **कंत्राटी पद्धतीने एकत्रित मानधनावर नेमणूक करण्यात आलेल्या कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)/ (मशिनरी दुरुस्ती व देखभाल) व सहाय्यक आचारी यांचे मुदतवाढीबाबत.**

**निर्णय क्र.८६३** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/०८/२००६ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.६२६ नुसार सर्वश्री अजय शिवराम पांडे,गिरीश ए.चोळके,मधुकर प.गव्हाणे,गंगाधर शंकर जाधव, स्वप्नील बा.गायकवाड यांच्या कनिष्ठ अभियंते (स्थापत्य) या पदावर व श्री अमृत गंगाधर जगताप कनिष्ठ अभियंता (मशिनरी दुरुस्ती व देखभाल) या पदावर तसेच श्री. प्रल्हाद गोरक्षनाथ कर्डीले एक वर्षे कलावधीसाठी कंत्राटी पध्दतीने संस्थान कामगार कायदेशीर सल्लागार ॲड.अशोक पाटील यांचे सल्ल्यानुसार नेमणूका देण्यात आलेल्या होत्या.

मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार उपरोक्त कंत्राटी कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), कनिष्ठ अभियंता (मशिनरी दुरुस्ती व देखभाल) तसेच सहाय्यक आचारी यांना एक वर्ष मुदत वाढ तसेच मानधना मध्ये वाढ करण्यात आलेली होती. सदरची देण्यात आलेली एक वर्ष मुदतवाढ खाली त्यांचे नांवासमोर दर्शविलेल्या तारखांस संम्पुष्ठात येत आहे.

| अ.नं. | नांव व हुद्दा | नेमणूकीची तारीख व देण्यात आलेले मानधन रुपये | एक वर्षे नेमणूक कालावधी संपुष्टात आल्याची तारीख | ०१ वर्ष मुदतवाढ संम्पुष्ठात येत असलेची तारीख वाढविलेले एकत्रित मानधन रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री अजय शिवराम पांडे ,कंत्राटी कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) बांधकाम विभाग | ०८/१२/२००६ ७०००/- | ०७/१२/२००७ | ०७/१२/२००८ ९०००/- |
| ०२. | श्री गिरिश एकनाथ चोळके ,कंत्राटी कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) बांधकाम विभाग | ०८/१२/२००६ ७०००/- | ०७/१२/२००७ | ०७/१२/२००८ ९०००/- |
| ०३. | श्री मधुकर परशराम गव्हाणे ,कंत्राटी कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) बांधकाम विभाग | ०८/१२/२००६ ७०००/- | ०७/१२/२००७ | ०७/१२/२००८ ९०००/- |
| ०४. | श्री गंगाधर शंकर जाधव ,कंत्राटी कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) बांधकाम विभाग | ०८/१२/२००६ ७०००/- | ०७/१२/२००७ | ०७/१२/२००८ ९०००/- |
| ०५. | श्री स्वप्नील बाबासाहेब गायकवाड ,कंत्राटी कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) बांधकाम विभाग | ०८/१२/२००६ रु.७०००/- | ०७/१२/२००७ | ०७/१२/२००८ ९०००/- |
| ०६. | श्री अमृत गंगाधर जगताप कंत्राटी कनिष्ठ अभियंता (मशिनरी दुरुस्ती व देखभाल) प्रसादालय विभाग | ०८/१२/२००६ ७०००/- | ०७/१२/२००७ | ०७/१२/२००८ रु.९०००/- |
| ०७. | श्री. प्रल्हाद गोरक्षनाथ कर्डीले सहाय्यक आचारी (प्रसादालय विभाग ) | २८/१२/२००६ ४०००/- | २७/१२/२००७ | २७/१२/२००८ ४५००/- |

उपरोक्त अ.न.०१ ते ०५ वरिल कंत्राटी कनिष्ठ अभियंता यांचा त्यांचे नावांसमोर दर्शविलेल्या तारखेस एक वर्षे वाढविण्यात आलेला मुदतवाढ कालावधी (कॉलम नं.०५) संपुष्ठात येत आहे. सदर कालावधीमध्ये उपरोक्त अ.नं.०१ ते ०५ वरिल कंत्राटी अभियंते यांचे काम,वर्तणूक व त्यांना यापुढे मुदतवाढ द्यावयाची झाल्यास किती कालावधीसाठी द्यावी याबाबत वरिष्ठ उपमुख्य अभियंता,स्थापत्य यांचे अभिप्राय मागविण्यात आले असता त्यांनी " उपरोक्त ०१ ते ०५ यांचे वर्तणूक चांगली असून त्यांचेवर सोपविलेली कामे ते योग्य रितीने पुर्ण करीत आहेत त्यांचेबाबत कोणतेही प्रकरण सुरु नाही किंवा प्रस्तावित नाही.त्यांना नियमानुसार मुदतवाढ देण्यास हरकत नाही.तथापि बांधकाम विभागामार्फत सुरु करण्यात येणारे सर्व बांधकाम प्रकल्प हे कमीत कमी दोन ते तिन वर्षासाठी असतात या कालावधीत संबंधीत शाखा अभियंता व त्यांचे पर्यवेक्षणाखाली काम करणाऱ्या कनिष्ठ अभियंत्यावर त्या प्रकल्पाची संपुर्णपणे जबाबदारी सोपविण्यात येते.त्यामुळे संबंधीत कंत्राटी पध्दतीने कनिष्ठ अभियंता यांची मुदतवाढ कमीत कमी तीन वर्षासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे." असे अभिप्राय दिलेले असून त्यावर संबंधीत प्रशासकीय अधिकारी यांची संमती दर्शक स्वाक्षरी आहे..

तसेच अ.नं.०६ वरिल कर्मचारी श्री अमृत गंगाधर जगताप,कनिष्ठ अभियंता (दुरुस्ती व देखभाल) व अ.नं. ०७ वरील सहाय्यक आचारी यांचे बाबतही अभिप्राय मागविण्यात आले असता अधिक्षक,प्रसादालय विभाग यांनी," त्यांचे वर्तणूक चांगली आहे हुकुमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात.त्यांचेबाबत कोणतेही प्रकरण चालू अथवा प्रस्तावित नाहीत.त्यांना नियमानुसार मुदतवाढ देण्यास हरकत नाही."असे अभिप्राय दिलेले असून त्यावर संबंधीत प्रशासकीय अधिकारी यांची संमती दर्शक स्वाक्षरी आहे.

उपरोक्त अ.नं.०१ ते ०५ वरिल कंत्राटी कनिष्ठ अभियंते यांचेबाबत वरिष्ठ उपमुख्य अभियंता,बांधकाम व संबधीत प्रशासकीय अधिकारी यांचे अभिप्राय -

**तसेच**

अ.नं.०६ वरिल कनिष्ठ अभियंता (मशिनरी दुरुस्ती व देखभाल) व अ.नं. ०७ वरील सहाय्यक आचारी यांचेबाबत अधिक्षक प्रसादालय व संबंधीत प्रशासकीय अधिकारी यांचे अभिप्राय विचारात घेता त्यांचा एक वर्षाचा वाढीव कालावधी (कॉलम नं.०५) संपुष्टात येत असलेच्या तारखेपासून पुढे एक वर्षे मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त अ.नं.०१ ते ०६ कंत्राटी पद्धतीने एकत्रित मानधनावर नेमणूक करण्यात आलेल्या कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)/ (मशिनरी दुरुस्ती व देखभाल) यांची एक वर्ष कालावधीसाठी रुपये ११,०००/- प्रतिमहा मानधनावर तसेच अ.नं.०७ सहाय्यक आचारी (प्रसादालय विभाग ) यांची एक वर्ष कालावधीसाठी रुपये ५,५००/- एकत्रित मानधनावर मुदत वाढविण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.४७** **श्रीसाईबाबा व श्रीसाईनाथ हॉस्पिटलकडील वैद्यकीय अधिकारी यांचे नेमणूकीस मान्यता देणेबाबत.**

**निर्णय क्र.८६४** डॉ.अजेय तम्मेवार, यांनी ऑनररी व्हिजीटींग सर्जन(व्हीटरो-रॅटिनल तसेच डॉ.सुनिल सोनटक्के, डॉ.निशांत गागुर्डे व डॉ.सुहास जमधडे, यांनी संस्थानचे हॉस्पीटलकडे वैद्यकिय अधिकारी या पदावर नोकरी मिळणेबाबतचे अर्ज केले होते.

उपरोक्त अर्जदार यांच्या मुलाखती वैद्यकिय संचालक तसेच मा.विश्वस्त डॉ.एकनाथ गोंदकर यांनी घेतल्या असून त्यांच्या नेमणूका करणेबाबत अभिप्राय/टिपण्या वैद्यकिय संचालक यांनी सादर केल्या आहेत. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे नेमणूका देण्यात आलेल्या आहेत.

| अ.नं. | वैद्यकीय अधिकारी नांव | शैक्षणिक पात्रता | नेमणूक आदेश नंबर व हॉस्पीटलचे नांव | दिलेले पदनांम व एकत्रीत मानधन /वेतन |
|---|---|---|---|---|
| ०१. | डॉ. अजय एम तम्मेवार, औरंगाबाद | एम.बी.बी.एस. एम.एस (आर्थ्रो ) | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१६४४६/२००८ दि. ११/०८/२००८ श्री साईबाबा हॉस्पीटल, | ऑनररी व्हिजीटींग व्हिटरो-रॅटिनल सर्जन |
| ०२. | डॉ. सुनिल मु. सोनटक्के लोणी, ता.राहाता अहमदनगर | एम.बी.बी.एस. (डि.ओ.एम.एस) | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१४६४८/२००८ दि.०६/२०/२००८ श्री साईनाथ हॉस्पीटल, | आर.एम.ओ. एकत्रित वेतन प्रतिमहा रु.१८,०००/- |
| ०३. | डॉ.निशांत काशिनाथ गांगुर्डे कळवण, जिल्हा-नाशिक | एम.बी.बी.एस. (डि जी ओ ) | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१५८८३ /२००८ दि. २७/१०/२००८ श्री साईनाथ हॉस्पीटल, | आर.एम.ओ. एकत्रित वेतन प्रतिमहा रु.१८,०००/- |
| ०४. | डॉ. उल्हास शिवाजी जमधडे वाघोली, शेवगांव | एम.बी.बी.एस. (डीएमआरई ) | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१६४४७/२००८ दि. ०४/०९/२००८ श्री साईबाबा हॉस्पीटल, | आर.एम.ओ. एकत्रित वेतन प्रतिमहा रु.१८,०००/- |

उपरोक्त अ.नं. १ वरील ऑनररी व्हिजीटींग व्हिटरो-रॅटिनल सर्जन व तसेच अ.नं. ०२ ते ०४ वरील उमेद्वारांच्याआर.एम.ओ या पदावर करण्यात आलेल्या नेमणूकीस मान्यता मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.४८** **श्री.एस.जयपाल राज,वाहन चालक,मुंबई कार्यालय, यांचा सेवानिवृत्तीनंतर मुदतवाढ मिळणेबाबतचा अर्ज.**

**निर्णय क्र.८६५** श्री एस.जयपाल राज यांनी त्यांचे दि.२०/१०/२००८ रोजीचे अर्जात " संस्थानमध्ये माझी १६ वर्षे सेवा झालेली असून येत्या डिसें २००८ मध्ये मी त्यातून निवृत्त होत आहे. या कालावधीत मी माझे काम हे जबाबदारीने काळजीपूर्वक तत्परतेने उत्साहाने पार पाडीत असल्याचे प्रांजळ मत माझ्या संस्थान कारकिर्दीतील संस्थानचे आजवरचे मा.अध्यक्ष, उपाध्यक्ष, मा.विश्वस्त, मा.कार्यकारी अधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी अन्य पदाधिकारी व संबंधित यांनी वेळोवेळी उत्स्फुर्तपणे व्यक्त केले आहे. तातडीने उपलब्ध होण्याची गरज लक्षात ठेवून संस्थानमधील माझ्या सेवाकाळामध्ये मी आता पर्यंत एकादाही किरकोळ व वैद्यकीय रजा घेऊ शकलेलो नाही. तरी कृपया संस्थान वाहनचालक म्हणुन मी दिलेली सेवा माझे तंदुरुस्त स्वास्थ्य व माझ्या कुटुंब उदार निर्वाहासाठी सध्या मला असलेली आर्थिक गरज यांचा सहानुभुतीपुर्वक विचार करुन आपण मला सेवानिवृत्तीनंतर काही काळ संस्थान सेवा करण्याची संधी द्यावी. हि विनंती. " असे नमुद केलेले आहे.

त्यावर मा. अध्यक्ष सो यांनी " ०१ वर्ष मुदतवाढ द्यावी " असे अभिप्राय दिलेले आहे.

संस्थान सेवा नियमाप्रमाणे वयाचे ६० वर्ष पुर्ण झालेवर कर्मचाऱ्यास सेवानिवृत्त केले जाते, त्याप्रमाणे श्री जयपाल राज यांना जा.नं.एसएसएस वशी ०१/२९४०/२००८ दि.०६/१०/२००८ अन्वये दि.३१/१२/२००८ रोजी सेवानिवृत्त करण्यात येत असलेबाबत आदेश पारीत करण्यात आलेला आहे.

यापुर्वी संस्थान सेवेतुन सेवानिवृत्त झालेल्या काही कर्मचाऱ्यांनी मुदतवाढ मागितलेली होती ती त्यांना देण्यात आलेली नसलेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री एस.जयपाल राज, हे मुंबई कार्यालयात वाहनचालक म्हणून काम करीत आहेत. संस्थान सेवेतुन सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांनी मुदतवाढ मागितल्यास ती देण्यात येत नाही. मुंबई कार्यालयात वाहनचालकाची अडचण होऊ नये म्हणून एक विशेष बाब म्हणून श्री एस.जयपाल राज यांची दिनांक १.१.२००९ पासून एक वर्ष कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने रुपये ७०००/- एकत्रित वेतनावर नेमणूक देण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.४९ राजेंद्र बारकू ठोसर, एम.आर.आय.टेक्निशियन यांचे मुदतवाढीबाबत.**

**निर्णय क्र.८६६** श्री.राजेंद्र बारकु ठोसर, एम.आर.आय.टेक्निशियन यांचे नेमणूकीचा कालावधी संपुष्टात आल्यामुळे त्यांना पुढील मुदतवाढ द्यावी किंवा कसे याबाबत त्यांच्या कामाचा व वर्तणुकीचा गोपनीय अहवाल वैद्यकीय संचालक यांचेकडून मागविण्यात आला होता. त्यास अनुसरुन त्यांनी दि.२१/१०/२००८ रोजीचे टिपणीने खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे

| अ.नं | कर्मचाऱ्यांचे नांव | पदनाम | हजर तारीख | वाढविण्यात आलेला ६ महिन्याचा कालावधी संपुष्टात येत असल्याची तारीख | अभिप्राय / शेरा |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री.राजेंद्र बारकु ठोसर | एम.आर.आय. टेक्निशियन | १८/५/२००८ | १८/११/२००८ | सदर एक वर्षाचे कालावधीमध्ये त्यांचे काम समाधानकारक असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच ते हुकुमाप्रमाणे व योग्य रितीने काम करतात. त्यांचे बाबतीत काहीही प्रकरणे चालू नाही किंवा प्रस्तावीतही नाहीत. त्यामुळे त्यांना पुढील मुदतवाढ द्यावयाची झाल्यास पुढील सहा महिने मुदतवाढ देणेस हरकत नाही. |

श्री साईबाबा हॉस्पीटलचे वैद्यकीय संचालक यांचे अभिप्रायानुसार उपरोक्त एम.आर.आय. टेक्निशियन चे काम समाधानकारक असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच ते हुकुमाप्रमाणे कामे करतात. त्यांचे बाबतीत काही प्रकरणे चालू नाहीत किंवा प्रस्तावितही नाहीत. त्यांना पुढील सहा महिने मुदतवाढ देण्यास हरकत नाही. अशी वैद्यकीय संचालक यांनी शिफारस केलेली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सदर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, राजेंद्र बारकू ठोसर, एम.आर.आय.टेक्निशियन यांची पूर्वीचेच अटी/शर्तीवर दिनांक १८/११/२००८ पासून पुढे सहा महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.५० प्रभात डेअरी प्रा.लि., निर्मळनगर पोष्ट टिळकनगर ता.राहाता, जि.अहमदनगर यांचे कंपनीस संस्थानचे भक्तनिवास कार्यक्षेत्रात स्टॉलकरिता जागा मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.८६७** प्रभात डेअरी प्रायव्हेट लि., निर्मळनगर पोष्ट टिळकनगर ता.राहाता यांचे दि.०४.०७.२००८ रोजीचे पत्र इकडिल कार्यालयास प्राप्त झालेले असून सदर पत्रात त्यांनी संस्थानच्या ५०० रुम (भक्तनिवास) येथे उपलब्ध असलेल्या गाळयामध्ये संस्थानच्या नियमाानुसार गाळा मिळणेस विनंती केली आहे.

सदर पत्रात प्रभात डेअरी प्रा.लि.निर्मळनगर पोष्ट टिळकनगर ता.राहाता हा राहाता तालुक्यातील रांजनखोल येथील एक महत्वकांक्षी दुग्धप्रकल्प असून राज्यातील खाजगी क्षेत्रातील RSO- ९००१/ २००० हे गुणवत्तेचे आंतरराष्ट्रीय मानांकन मिळणारा पहिलाच प्रकल्प आहे. त्यांचे १५ दुग्धजन्य उत्पादने तसेच पॅकड वॉटर राज्यात लोकप्रिय आहेत. प्रसादालयासमोर जागा देऊ शकत नसेल, तर भक्तनिवासमध्ये जागा देण्यास त्यांनी विनंती केली आहे. जशी इतर स्थानिक दुध संघास संधी दिलेली आहे. तशीच त्यांच्या उद्योगासाठीही स्टॉल ठेवण्यास संधी द्यावी, अशी त्यांनी पत्रात विनंती केलेली आहे. प्रभात डेअरी प्रायव्हेट लि. यांनी पत्रात त्यांची नामांकित व राज्यात नावाजलेली संस्था असून दूध, साजूक ॲगमार्क ग्रेड तुप, स्टरलाईज्ड, सुगंधी दूध, लस्सी, श्रीखंड, आम्रखंड, पेढे, ताक, दही, पीर, आईस्क्रिम, बटर, बेरी, व्हाईटार, रसगुल्ला, गुलाबजाम, फ्रुटज्युस इ.उत्पादो लोकप्रिय आहेत. असेही त्यांनी त्यांच्या अर्जात म्हटले आहे.

**संस्थानचे ५०० रुम परिसरात दिलेले गाळे बाबत माहिती तक्ता,**

| अ.क्र. | गाळा दिलेल्या संस्थेचे /व्यक्तीचे नांव | मासिक भाडे रुपये | ठिकाण |
|---|---|---|---|
| १) | साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.अप. सोसायटी,शिर्डी.<br>**प्रसाद नॉव्हेल्टी**<br>अ) नॉव्हेल्टी स्टोअर १ | १०७४/- | भक्तनिवास डी ब्लॉक ३नं गाळा. |

| | | | |
|---|---|---|---|
| | ब) नॉव्हेल्टी स्टोअर २<br>क) प्रसाद स्टोअर १ | १०७४/-१०७४/- | भक्तनिवास डी ब्लॉक २ नं.गाळा.<br>भक्तनिवास डी ब्लॉक ४ नं.गाळा. |
| २) | श्री संदिप अशोक जगधनी<br>**एस.टी.डी.बुथ**<br>( डिपॉझीट रु. ३,१८,०००/-) | १७३१/- | भक्तनिवास अे ब्लॉक ३ नं.गाळा.<br>**पुढील मुदतीसाठी प्रस्ताव सादर.** |
| ३) | श्री नंदू कोळपकर, शिर्डी<br>**जनरल स्टोअर्स**<br>( डिपॉझीट रु. १,२५,०००/-) | ४२५९/- | भक्तनिवास अे विंग गाळा नं.६ |
| ४) | श्री अजय अनिल बोरावके,<br>गुरुकृपा सेल्स, कोपरगांव साईगंगा **(मिनरल वॉटर)**<br>( डिपॉझीट रु. १०,०००/-) | २४२०/- | भक्तनिवास डी विंग गाळा नं.८<br>**पुढील मुदतीसाठी प्रस्ताव सादर.** |
| ५) | प्रवरा फळे व भाजीपाला उत्पादक प्रक्रीया संस्था लि. लोणी.<br>(डिपॉझिट रु. १०,०००/-) | २०००/- | भक्तनिवास अे विंग गाळा |
| ६) | श्री प्रविण अशोक शिंदे ,<br>**Top N Town Ice Cream**<br>(डिपॉझिट रु. १,००,०००/-) | २०००/- | भक्तनिवास अे विंग गाळा<br>**पुढील मुदतीसाठी प्रस्ताव सादर.** |
| ७) | श्रीरामपूर दूध जिल्हा मध्यवर्ती सहकारी दूध व्याव.संघ लि.बाभळेश्वर ता.राहाता<br>**दुग्धजय पदार्थ विक्री**<br>( डिपॉझीट रु. ५०,०००/-) | ४,५००/- | भक्तनिवास मध्ये गाळा |

उपरोक्त गाळे मा.व्यवस्थापन मंडळाचे मंजुरीनुसार देण्यात आलेले आहेत. सध्या फक्त तेथे ०४ गाळे उपलब्ध आहेत. त्यापैकी एक एस.टी. महामंडळास देण्याचे विचाराधीा आहे. गोदावरी खोरे नामदेवरावजी पराजणे पाटील तालुका सहकारी दूध उत्पादक संघ मर्या., कोपरगाव यांनी सुध्दा त्यांचे दि.११.०९.२००८ चे पत्राने ५०० रुम (भक्तनिवासस्थान ) संकुलामध्ये दुध व दूग्धजय पदार्थ विक्रीसाठी एक स्टॉल मिळणेबाबत विनंती केली आहे व त्यांचा प्रस्ताव देखील स्वतंत्रपणे विचारार्थ सादर आहे. यापूर्वी प्रभात डेअरी प्रा.लि.निर्मळनगर ही खाजगी कंपनी आहे यापूर्वी त्यांनी प्रसादालय कार्यक्षेत्रात स्टॉल मिळणेसाठी दि.०२.०१.२००८ रोजी विनंती केली होती. मात्र मा.व्यवस्थापन समितीच्या दि.०७.०७.२००८ चे सभेत त्यांची विनंती अमान्य करणेत आलेली आहे. (विषय क्र३३, निर्णय क्र.५१९. आता त्यांनी प्रसादालय परिसरात स्टॉलसाठी जागा मागणीसाठी अर्ज केलेला आहे.) याच सभेमध्ये संगमोर सहकारी दूध उत्पादक व प्रक्रिया संघ, घुलेवाडी, ता./पोष्ट- संगमनेर यांचा ५०० रुम परिसरात राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ व राजहंस पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरचे विक्री करण्याकरिता लिव्ह ॲण्ड लायसेस तत्वावर गाळा देणेबाबतचा प्रस्ताव अमान्य करणेत आला आहे.

उपरोक्त परिस्थितीत प्रभात डेअरी प्रा.लि., यांना गाळा ११ महिनेसाठी देणे ठरल्यास त्याबाबतचे लायसेस फी तसेच डिपॉझीट फी देखील ठरवून घ्यावी लागणार आहे. इतर गाळा धारकाप्रमाणे साधारणतः रु.३०००/- ते रु.४५००/- तसेच मासिक लायसेन्स फी तसेच, डिपॉझीट रु.१,२५,०००/- मात्र ठरवून घ्यावी लागणार असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे भक्तनिवास इमारतीत असलेल्या सर्व गाळ्यांची वर्तमानपत्रात जाहिरात देऊन जाहिर लिलावाने विक्री करण्यात यावी. या लिलावात भाग घेऊन गाळा घेणेबाबत प्रभात डेअरी प्रायव्हेट लि., निर्मळनगर पोष्ट टिळकनगर ता.राहाता यांना कळविण्यात यावे असे ठरले. (कार्यवाही-विधी अधिकारी )

**विषय नं.५१** **५०० रुम भक्तनिवास संकुलामध्ये गोदावरी दुध व दुग्धजन्य विक्रीसाठी एक स्टॉल मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.८६८** गोदावरी खोरे नामदेवरावजी परजणे पाटील तालुका सहकारी दुध उत्पादक संघ कोपरगांव यांनी दि. १९/०८/२००८ चे पत्र संस्थानला सादर केले असून त्यांनी गोदावरी दुध संघाचे पॅश्चुराईज्ड होमिजिनाईज्ड दुध व दुग्धजन्य पदार्थ साईप्रसाद पेढा, सुगंधी दुध, गोदावरी शुध्द तुप, गोदावरी श्रीखंड, आम्रखंड, पनिर, स्टरलाईज्ड मिल्क, दही, ताक, व लस्सी इत्यादी उपपदार्थ ग्राहकांचे प्रथम पसंतीस पात्र आहे. असे नमुद केले आहे. शिर्डी येथे येणाऱ्या बहुसंख्य श्री साईभक्तांना प्रसाद रुपाने ही उत्पादने उपलब्ध व्हावी. व सेवा करण्याची आम्हास संधी मिळावी या कामी गोदावरी दुध संघास भक्तनिवास संकुलात एक स्टॉल मिळावा असे म्हटले आहे. त्याचबरोबर अन्य दोन अर्जाने दोनशे रुम भक्तनिवास तसेच नवीन भोजनगृह संकुलातही स्टॉलसाठी मागणी केलेली आहे. मात्र त्याठिकाणी गाळे उपलब्ध नाहीत.

भक्तनिवास यांचेकडील अहवाला नुसार भक्तनिवास या इमारतीचे फक्त बाहेरील बाजूस ३+२ गाळे रिकामे असल्याचे दिसते इमारतीचे आतिल बाजूस गाळे रिकामे नसल्याने इमारतीचे बाहेरील बाजूस असलेल्या गाळयांचा विचार करावा लागणार आहे.

श्री साईबाबा भक्तनिवासस्थान ५०० रुम काही गाळे या पुर्वी शासकीय उपसहकारी संस्था व खाजगी लिलावधारक तसेच पतपेढी व इतर यांना लिव्ह ॲन्ड लायसन्सी तत्वावर ११ महीने व एक वर्ष मुदती पावेतो देण्यात आलेली आहे. याबाबत त्यांचेकडून डिपॉझीट रु. १०,०००/- पासून रु. ५०,०००/- ते ३,१८,०००/- पर्यंत घेऊन लिव्ह ॲन्ड लायसन्स या तत्वावर मासीक परवाना फी रु. ६०५ /- पासून रु. ८८७/- ते ४,५००/- पावेतो आकारण्यात आलेली आहे.

संस्थानचे ५०० रुम परिसरात दिलेले गाळे बाबत माहिती नं. २ ते ८

**संस्थानचे ५०० रुम परिसरात दिलेले गाळे बाबत माहिती तक्ता**

| अक्रं | सुविधेचे नांव | मासिक भाडे रुपये | कालावधी | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| ०१ | **प्रसाद नॉव्हेल्टी**<br>अ) नॉव्हेल्टी स्टोअर नं.१<br>ब) नॉव्हेल्टी स्टोअर नं.२<br>क) प्रसाद स्टोअर नं.१ | ९७६/-<br>९७६/-<br>९७६/- | ०१/०६/२००७<br>ते<br>३१/०५/२००८ | भक्तनिवास डी ब्लॉक नं.३ - गाळा<br>भक्तनिवास डी ब्लॉक नं.२ - गाळा<br>भक्तनिवास डी ब्लॉक नं.४ - गाळा |
| ०२ | एस.टी.डी.बुथ श्री.जगधने<br>**(डिपॉझिट रु, ३,१८,०००/-)** | १७३१/- | ०१/११/२००७<br>ते<br>३०/०९/२००८ | नविन भक्तनिवास अे विंग गाळा नं ०३ |
| ०३ | जनरल स्टोअर्स-<br>श्री.नंदूकोळपकर, शिरडी<br>**(डिपॉझीट रु, १,२५,०००/-)** | **४२५९/-** | १३/०६/२००७<br>ते<br>१२/०६/२००८ | नविन भक्तनिवास अे विंग गाळा नं. ०६ |
| ०४ | श्री. अजय अनिल बोरावके,<br>गुरुकृपा सेल्स, कोपरगांव<br>साईगंगा ( मिनरल वॉटर )<br>**(उिपॉझीट १०,०००/- )** | २४२०/- | १०/१०/२००७<br>ते<br>०९/०९/२००८<br>११ महिने | नविन भक्तनिवास डी विंग गाळा नं ०८ |
| ०५ | प्रवरा फळे व भाजीपाला उत्पादक प्रकीया संस्था लि. लोणी. ( बेदाणा विक्रीकामी )<br>**(उिपॉझीट १०,०००/- )** | **२०००/-** | ३०/११/२००७<br>ते<br>२९/११/२००८ | ५०० रुम येथे ए विंग गाळा<br>( नविन भक्तनिवासस्थान ) |
| ०६ | श्री. प्रविण अशोक शिंदे राहणार शिर्डी, Top N Town Icecrea, (दुग्धजन्य पदार्थ विक्री **(डिपॉझीट रुपये १,००,०००/-)** | **२०००/-** | १६/१०/२००७<br>ते<br>१५/०९/२००८ | ५०० रुम येथे ए विंग गाळा<br>( नविन भक्तनिवासस्थान ) |
| ०७ | श्रीरामपूर दूध जिल्हा मध्यवर्ती सहारी दूध व्याव. संघ, लि.बाभळेश्वर ता - राहाता (दुग्धजन्य पदार्थ विक्री )<br>**(डिपॉझीट ५०,०००/- )** | ४५००/- | २०/१२/२००७<br>ते<br>१९/१२/२००८ | ५०० रुम येथे गाळा<br>( नविन भक्तनिवासस्थान ) |

यापुर्वी नविनभक्तनिवास परिसरातील गाळे मा.व्यवस्थापन समितीचे नियमा नुसार लिव्ह ॲन्ड लायसन्सी तत्वावर देण्यात आलेले आहे. गाळ्याबाबत तक्त्यानुसार लायसन्स फी आकारण्यात आलेली आहे. तसेच डिपॉझीट रक्कम कमीत कमी रु. १०,०००/- व जास्तीत जास्त ३,१८,०००/- आकारण्यात आलेली आहे. लयसन्स फी कमीत कमी रु. ९७६/- व जास्तीत जास्त ४,२५९/- अशी आकारणेस मा.व्यवस्थापन समितीचे ठरावा प्रमाणे नियमा प्रमाणे आकारण्यात आलेली आहे.

गोदावरी खोरे नामदेवरावजी परजणे पाटील तालुका सहकारी दुध उत्पादक संघ कोपरगांव यांना एक गाळा द्यावयाचा ठरल्यास त्यांना भक्तनिवासस्थान मध्ये लिलावासाठी उपलब्ध असलेल्या गाळ्या पैकी एक गाळा संस्थानचे सोईने लिव्ह ॲन्ड लायसन्सी तत्वावर देता येईल. इतर गाळे धारकाकडून आकारले जाणारे मासिक परवाना फी विचारात घेवून त्यांचेकडून एका गाळ्यास डिपॉझीट १,२५,०००/- (अक्षरी रु. एक लाख पंचवीस हजार मात्र ) व मासिक परवाना लाससन्सी फी रु. ३,०००/ते ४,५००/- मात्र आकारुन तसेच विद्युत बील मिटरप्रमाणे वेगळे आकारुन, सदर संस्थेने ताब्यात घेतले पासून ३१ मार्च २००९ अखेर लिव्ह ॲन्ड लायसन्सी तत्वावर देता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे भक्तनिवास इमारतीत असलेल्या सर्व गाळ्यांची वर्तमानपत्रात जाहिरात देऊन जाहिर लिलावाने विक्री करण्यात यावी. या लिलावात भाग घेऊन गाळा घेणेबाबत गोदावरी खोरे नामदेवरावजी परजणे पाटील तालुका सहकारी दुध उत्पादक संघ कोपरगांव यांना कळविण्यात यावे असे ठरले. (कार्यवाही-विधी अधिकारी )

**विषय नं.५२ श्री.संदिप अशोक जगधनी, श्रीरामपूर कॅम्प शिर्डी यांना एस.टी.डी. बुथसाठी दिलेल्या गाळयाची मुदतवाढ मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.८६९** संस्थानने नविन भक्तनिवासस्थान (५००रुम ) परिसरातील गाळा साईभक्तांचे सोयीच्या दृष्टीने आकरा महिने मुदतीचे कालवधी करीता लिव्ह ॲण्ड लायसन्सी तत्वावर श्री जगधने यांना वापरांसाठी दिलेला आहे.

सदर गाळ्याची मुदत दि. ३०/०९/२००८ अखेर संपत असल्याने श्री जगधने यांनी त्यांचे दि. ११/०९/२००८ चे अर्जान्वये कळविले असून त्यात त्यांनी माझे टेलीफोन सुविधागाळा क्र. ३ नविन भक्तनिवासचे लिव्ह ॲण्ड लायसन्सचे नुतनिकरण ३०/०९/२००८ रोजी संपत आहे. तरी विनंती की सदरचे नुतनिकरण पुढील अकरा महिन्याचे होणेस व मुदतवाढ होणेस विनंती. तसेच आज पावेते लायसन्स फी व लाईट बील भरलेले असून कोणतीही थकबाकी नाही, असे कळविले आहे.

१) दिनांक ०१/०८/१९९९ ते दिनांक ३०/०६/२००० अखेर
२) दिनांक ०१/०७/२००० ते दिनांक ३१/०५/२००१ अखेर
३) दिनांक ०१/०६/२००१ ते दिनांक ३१/०४/२००२ अखेर
४) दिनांक ०१/०५/२००२ ते दिनांक ३१/०३/२००३ अखेर
५) दिनांक ०१/०४/२००३ ते दिनांक २९/०२/२००४ अखेर
६) दिनांक ०१/०३/२००४ ते दिनांक ३१/०१/२००५ अखेर
७) दिनांक ०१/०२/२००५ ते दिनांक ३१/१२/२००५ अखेर
८) दिनांक ०१/०१/२००६ ते दिनांक ३०/११/२००६ अखेर
९ ) दिनांक ०१/१२/२००६ते दिनांक ३१/१०/२००७ अखेर

लिव्ह ॲण्ड लायसन्स कालावधी दि. १/११/२००७ ते दि. ३०/०९/२००८ अखेर आकरा महिने होता. या कालवधी साठी गाळा चालविणेसाठी दिलेला आहे. सदर कालावधी संपलेला असून त्याचा विचार करता लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर गाळ्यास दि. १/१०/२००८ ते ३१/०३/२००९ अखेर ६ (सहा) महिने कालावधी करीता मुदतवाढ पुर्वीचे लायसन्स फी रु. १७३१/- मध्ये १०% वाढ करुन रु. १९०४/- मात्र आकारुन व मिटर रिडींग प्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन (डिपॉझीट रु. ३,१८,०००/-)पुर्वीचेच अटी व शर्तीस अनुसरुन लिव्ह ॲण्ड लायसन्सी तत्वावर गाळ्यास ६ महिने साठी मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी येथे जागेचे भाव मोठ्या प्रमाणावर वाढलेले आहे. संस्थानचे भक्तनिवासस्थान इमारतीत देण्यात आलेले सर्व गाळे खाली करुन घेऊन त्यांची वर्तमानपत्रात जाहिरात देऊन जाहिर लिलावाने विक्री करण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-विधी अधिकारी )

**विषय नं.५३** **गुरुकृपा सेल्स, कोपरगाव यांना साईगंगा मिनरल वॉटर विक्री करणेकामी साईबाबा भक्तनिवास येथे दिलेल्या डी विंग कडील गाळा नं.०८ यास मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.८७०** संस्थानने खालील तपशीलाप्रमाणे गाळा साईभक्तांचे व संस्थानचे सोयीच्या दृष्टीने ११ महिने मुदतीचे कालावधी करिता गुरुकृपा सेल्स, कोपरगांव यांना वापरासाठी दिलेला आहे.

| अ. क्र. | इमारतीचे नांव | गाळा धारकाचे नांव व व्यवसाय | मासिक भाडे | गाळा दिल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | श्री साईबाबा भक्तनिवासस्थान डी- वींग कडिल गाळा नं. ८ | गुरुकृपा सेल्स, कोपरगांव साईगंगा मिनरल वॉटर विक्री करणे. | २,४२०/- | १०.१०.२००७ ते ०९.०९.२००८ |

दि.११.११.२००६ ते दि.१०.११.२००७ या कालावधीसाठी गुरुकृपा सेल्स, कोपरगांव यांना गाळा वापरास परवानगी देणेत आली होती. सदर मुदत संपलेनंतर गुरुकृपा सेल्स, कोपरगांव यांनी प्रस्तुत गाळयासाठी पुढील मुदतवाढ मिळावी, म्हणून दि.३०.०९.२००८ रोजी संस्थानला पत्र दिलेले आहे.

साईभक्तांना व संस्थानला उपरोक्त गाळयाचा होणारा उपयोग लक्षात घेता, गुरुकृपा सेल्स, हॉटेल स्पॅन, कंपाऊंड, साई कॉर्नर, कोपरगांव, जिल्हा- अहमदनगर यांना मा.व्यवस्थापन समितीच्या दि.०७.१२.२००७ च्या सभेतील आयत्या वेळेच्या विषय नं.३९ निर्णय क्र.८२३ नुसार दि.१०.१०.२००७ रोजी पासून ते दि.०९.०९.२००८ पर्यंत ११ महिने कालावधीकरिता डिपॉझीट रु.१०,०००/- मासिक परवाना फी रु.२,४२०/- मात्र आकारुन तसेच दरमहा मिटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन पूर्वीचेच अटी/ शर्तीस अनुसरुन लिव्ह ॲण्ड लायसेन्सी तत्वावर गाळयास मुदतवाढ देण्यात आली होती. आता दि.०९.०९.२००८ रोजी सदर मुदत संपलेनंतर गुरुकृपा सेल्स, कोपरगांव यांनी दि.३०.०९.२००८ रोजी आवक नं.३२८५७/ ३०.०९.२००८ रोजीचे पत्र देऊन पुढील मुदतवाढ मिळावी, अशी विनंती केलेली आहे. साईभक्तांना व संस्थानला उपरोक्त गाळयाचा होणारा उपयोग लक्षात घेता, गुरुकृपा सेल्स, हॉटेल स्पॅन, कंपाऊंड, साई कॉर्नर, कोपरगांव, जिल्हा- अहमदनगर यांना दि.१०.०९.०८ पासून दि.३१.०३.२००९ अखेर ७ महिने कालावधीकरिता डिपॉझीट रु.१०,०००/- (अक्षरी रु.दहा हजार मात्र) मागील मासिक परवाना फी रु.२,४२०/- (अक्षरी रु.दोन हजार चारशे वीस मात्र) मध्ये १०% वाढ करुन दरमहा रक्कम रु.२,६६२/- (अक्षरी रु.दोन हजार सहाशे बासष्ट मात्र)आकारुन व तसेच दरमहा मिटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन पुर्वीचेच अटी व शर्तीस अनुसरुन लिव्ह ॲण्ड लायसेन्सी तत्वावर गाळयास मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी येथे जागेचे भाव मोठ्या प्रमाणावर वाढलेले आहे. संस्थानचे भक्तनिवासस्थान इमारतीत देण्यात आलेले सर्व गाळे खाली करुन घेऊन त्यांची वर्तमानपत्रात जाहिरात देऊन जाहिर लिलावाने विक्री करण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-विधी अधिकारी )

**विषय नं.५४ संस्थान कर्मचाऱ्यांना गणवेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.८७१** संस्थान कर्मचा-यांना सन २००६ ते २००८ या सालासाठी प्रत्येकी दोन गणवेष देण्यात आले होते. माहे जुलै २००८ मध्ये त्यांस दोन वर्षे पूर्ण होत आहेत. सन २००८ या सालात शिवलेल्या संस्थान कर्मचा-यांचे गणवेषासाठी म्हणून साधारणपणे रु. ९,५२,१७१/- (अक्षरी रु.नऊ लाख बावन्न हजार एकशे एक्काहत्तर मात्र)इतका खर्च आलेला आहे. सन २००६-२००८ चे दरम्यान सर्व पुरुष कर्मचा-यांना सफारी गणवेष शिवण्यात आला होता.

संस्थान कर्मचा-यांना यावर्षी परत गणवेष द्यावे लागतील. पगार पत्रकानुसार कर्मचा-यांची संख्या एकूण १,८९० अशी आहे. तसेच मा.कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखाधिकारी व संरक्षण अधिकारी यांची नांवे पगारपत्रकात नाहीत. त्यांचा समावेश यांत केल्यास ही संख्या १८९३ इतकी होईल. सदरच्या गणवेषामध्ये संरक्षण विभाग-पहारेकरी, रुग्णालय-आया, वॉर्डबॉय, इं.मि.स्कुल, क.वि.मंदिर व औ.प्र.संस्था-शिक्षक,शिक्षिका यांचे गणवेष हे वेगळे असतात. मंदिरातील -चोपदार,पुजारी,सहा.पुजारी यांना दरवर्षी दसरा उत्सवाला नविन गणवेष दिला जातो. त्यामुळे त्यांचा समावेश ह्या गणवेषात केलेला नाही. तसेच श्री साईबाबा हॉस्पीटल, शिर्डी (सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल) व श्री साईनाथ हॉस्पीटल शिर्डी मधील डॉक्टर, मेट्रन, नर्स, फार्मासिस्ट, टेक्निशियन्स, मॅनेजर्स इ.चे गणवेष हे संबंधीत विभाग टिपणी तयार करुन त्यास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेईल.

कर्मचारी संख्या १८९३ पैकी जुने ७४६ पूरुष व ११४ स्त्री कर्मचारी, तसेच रु. ४,५००/- मानधनावर असलेले ९५२ पुरुष व ८१ स्त्री कर्मचारी आहेत.

जुन्या ११४ स्त्री कर्मचा-यांपैकी ९० स्त्री कर्मचारी हया ६ वारी साडया (पैकी रुग्णालयातील ४ लिपीक, २३ शिक्षीका, ६० स्त्री मदतनीस इतर विभाग, व ३ स्त्री पहारेकरी-खाकी.) वापरतात. तसेच त्यांना ९० ब्लाऊज पीस, ९० परकर द्यावे लागणार आहेत. २४ स्त्री कर्मचारी(२४ इतर विभागातील स्त्री मदतनीस) हया ९ वारी साडी वापरतात त्यांनाही २४ ब्लाऊजपीस द्यावे लागणार आहेत. तर नविन म्हणजे रु. ४,५००/- मानधनामधील ८१ स्त्री कर्मचा-यांपैकी ६० स्त्री कर्मचारी ६ वारी (पैकी ४-स्त्री कर्मचारी संरक्षण विभाग, २- शिक्षण सेवक, ५४ - इतर विभागातील स्त्री मदतनीस) तसेच त्यांना ६० ब्लाऊज पीस, ६० परकर द्यावे लागणार आहेत. २१ स्त्री कर्मचारी ह्या ९ वारी साड्या वापरतात त्यांनाही २१ ब्लाऊजपीस द्यावे लागणार आहेत. जुने ११४ व रु.४५००/- मधील ८१ यांना एकूण १९५ मी. ब्लाऊजचे कापड मॅचींगनुसार घ्यावे लागणार आहे.

हयात ७४६ पुरुष कर्मचा-यांपैकी १२१ पुरुष कर्मचारी (४-प्र.अ., १-मुख्य लेखाधिकारी, ५०-शिक्षक,४९-पहारेकरी-खाकी,१७- वाहनचालक इ.) तसेच रु. ४,५००/- मानधनामधील ९५२ पुरुष कर्मचा-यांमधील १२७ पुरुष कर्मचारी ( १०७ पहारेकरी- खाकी, १७ वाहन चालक, ३ मेकॅनिक ) इ. यांचे गणवेष हे वेगळे असतात. तथापि यावेळी पँट शर्ट शिवावयाचे असलेने तसा फारसा फरक पडणार नाही.

सर्व १८९३ कर्मचा-यांना यावर्षी १६९८ पुरुष कर्मचा-यांना शर्ट पँट असे प्रत्येकी २ गणवेषाचे कापड अंदाजे २.५० मी.प्रमाणे एकूण ८,४९० मीटर शर्टचे कापड व १.२० प्रमाणे एकूण ४,०७६ मीटर पँटचे कापड खरेदी करुन शिवावयाचे आहेत. तसेच १९५ स्त्री कर्मचा-यांना २ गणवेष प्रमाणे ३९० साड्या, ३९० मी.ब्लाऊज पीस व ३०० नग परकर खरेदी करावे लागणार आहेत.

एकूण १८९३ स्त्री व पुरुष कर्मचा-यांच्या गणवेषाचे कापड, साडया, परकर, ब्लाऊज इ.खरेदी व त्याकामी लागणा-या शिलाई खर्चाबाबतचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं. | तपशील | रु.४,५०० मानधन | कायम कर्मचारी |
|---|---|---|---|
| ०१. | पुरुष कर्मचारी गणवेष खरेदी अंदाजे खर्च | ५,१२,०४०.०० | ८,२२,६००.०० |
| ०२. | पुरुष कर्मचारी गणवेष शिलाई अंदाजे खर्च | १,६६,२००.०० | २,२३,५००.०० |
| ०३. | स्त्री कर्मचारी साडया खरेदी अंदाजे खर्च | ४८,६००.०० | ७३,८००.०० |
| ०४. | स्त्री कर्मचारी ब्लाऊज कापड खरेदी अंदाजे खर्च | १०,५६०.०० | १५,४४०.०० |
| ०५. | स्त्री कर्मचारी ब्लाऊज शिलाई अंदाजे खर्च | ८,१००.०० | ११,४००.०० |
| ०६. | स्त्री कर्मचारी परकर खरेदी अंदाजे खर्च | १२,६००.०० | १८,०००.०० |
| | रु. ४,५००/- मानधन-एकूण गणवेष खर्च अंदाजे | ७,५८,१००.०० | ११,६४,७४०.०० |
| | कायम कर्मचारी एकूण गणवेष खर्च अंदाजे | ११,६४,७४०.०० | |
| | दोन्ही मिळून एकूण गणवेष खर्च अंदाजे | १९,२२,८४०.०० | |

तरी उपरोक्तप्रमाणे एकूण कर्मचारी (स्त्री व पुरुष) १८९३ साठी गणवेषाचे कापड, साडया, ब्लाऊज, परकर इ. खरेदी व शिलाई कामी अंदाजे रु. **१९,२२,८४०.००** मात्रचा खर्च येणार असून सदरच्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, मफतलाल, एसकुमार, बेलमेंट, रेमंड, सियाराम या नामांकित कंपन्यांचे कापडाचे युनिफॉर्मसाठी शिलाईसह कोटेशन्स मागविण्यात यावे, याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १९,२२,८४०/- चे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५/अधिक्षक,खरेदी विभाग)

**विषय नं.५५ श्रीसाईसच्चरित पारायण सोहळा-२००८ खर्च मंजूरी**

**निर्णय क्र.८७२** सन २००८ सालात दि.०७/०७/२००८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत विषय नं.३७, व निर्णय क्र.५९५ अन्वये श्री साई सत् चरित पारायण सोहळा -२००८ साठी एकूण खर्च रु. ६,५०,०००/- इतका मंजूर करण्यात आलेला होता. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) आयोजित, नाट्य रसिक संच, शिर्डी व शिर्डी ग्रामस्थ, यांचे सहकार्याने श्री साईसच्चरीत पारायण सोहळा शनिवार, दि.०२/०८/२००८ ते रविवार, दि.१०/०८/२००८ अखेर नऊ दिवस हनुमान मंदिराचे शेजारील मैदानात साजरा करण्यात आला. यात १९७५ वाचकांनी सहभाग घेतला होता. सदर पारायण सोहळयासाठी खालीलप्रमाणे खर्च आलेला आहे.

| अ.नं. | तपशील | अंदाजीत खर्च | प्रत्यक्ष खर्च | शेरा(जादा खर्च) |
|---|---|---|---|---|
| ०१. | मंडप व्यवस्था खर्च | १,२५,०००.०० | **१,३६,०००.००** | **११,०००.००** |
| ०२. | बोर्डस्, बॅनर्स व निमंत्रण पत्रिका इ. खर्च | ५०,०००.०० | २४,५८४.०० | ---- |
| ०३. | प्रवचनकारी/कीर्तनकार इ. चे मानधन, प्रवासभाडे इ.खर्च | १,५०,०००.०० | ९०,०५१.०० | ---- |
| ०४. | मिरवणुक, बँड, सत्कार - बक्षिसे इ. खर्च | ५०,०००.०० | ००.०० | ---- |
| ०५. | इतर किरकोळ खर्च | ७५,०००.०० | २०,१८४.०० | ---- |
| ०६. | चहा,नाष्टा,फराळ व शेवटच्या दिवशी भंडारा इ.चा खर्च | २,००,०००.०० | १,८६,८९५.०० | ---- |
| ०७. | जादा कंत्राटी कर्मचारी खर्च | ००.०० | **०४,५११.००** | **०४,५११.००** |
| | **एकूण खर्च** | **६,५०,०००.००** | **४,६२,२२५.००** | |

अ.नं.०१ मध्ये जादा झालेल्या खर्चाबाबत - मंडप व्यवस्था खर्च रु. १,२५,०००/- मात्र अंदाजीत धरला होता. तथापि रु.१,३६,०००/-मात्र इतका खर्च झालेला असून जागेची लेव्हल करणेकामी मुरुम खरेदी व रोलरचे भाडे इ.साठी रु. ११,०००/- इतका खर्च जादा झालेला आहे.

अ.नं.०७ मध्ये जादा झालेल्या खर्चाबाबत - अंदाजीत खर्चामध्ये जादा कंत्राटी कामगार खर्च अपेक्षीत धरला नव्हता. तथापि भंडा-याच्या दिवशी आय.टी.आय.विद्यार्थी व साफसफाईकामी स्वच्छता कामगार नेमले होते. त्यांचा खर्च रु. ४,५११/- इतका जादा झालेला आहे.

श्री साई सत् चरित पारायण सोहळयासाठी एकूण अंदाजीत खर्च रु. ६,५०,०००.०० इतका धरण्यात आला होता तथापि रु. ४,६२,२२५.०० (अक्षरी रु. चार लाख बासष्ठ हजार दोनशे पंचवीस मात्र) खर्च आलेला आहे. उपरोक्तनुसार अपेक्षीत खर्चापेक्षा रु.०१,८८,७७५०० इतका कमी झालेला आहे त्याची नोंद घेण्यात आली. त्याप्रमाणे मंडप व्यवस्थेसाठी झालेल्या रुपये ११,०००/- व जादा कंत्राटी कर्मचाऱ्यांसाठी झालेल्या रुपये ४,५११/- चे जादा झालेल्या खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

**विषय नं.५६ श्रीगुरुपौर्णिमा उत्सव-२००८ जादा खर्च मंजूरी मिळणेबाबत**

**निर्णय क्र.८७३** दि.२४/०५/२००८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत विषय नं.६९, व निर्णय क्र.४८२ अन्वये श्रीगुरुपौर्णिमा उत्सव २००८ साठी एकूण खर्च रु. ३०,२५,०००/- इतका मंजूर करण्यात आलेला होता. प्रत्यक्षात मात्र अंदाजीत खर्चापेक्षाही जादा खर्च झालेला आहे. त्याचा अहवाल खालीलप्रमाणे -

| अ.नं. | तपशील | मा.व्य.समितीने मंजूर केलेली रक्कम | प्रत्यक्ष खर्च | शेरा (जादा खर्च) |
|---|---|---|---|---|
| ०१. | मंडप,कमानी स्टेज, उन्हाळी मंडपासह व पाणपोई इ. | ०५,००,०००.०० | १५,३२,५१६.०० | १०,३२,५१६.०० |
| ०२. | कलाकार बिदागी, | ०५,००,०००.०० | ०१,०२,७१९.०० | ---- |
| ०३. | भक्तांना मिष्टान्न मजूरीसह | ०२,७५,०००.०० | ०३,१८,२५०.०० | ००,४३,२५०.०० |
| ०४. | विद्युत रोषणाई | ००.०० | ००,०३,६००.०० | ००,०३,६००.०० |
| ०५. | निमंत्रणपत्रिका, जाहिरात, पोष्टेज, उदीप्रसादासह. | १५,२०,०००.०० | १२,७५,५१.०० | ---- |
| ०६. | जादा कामगार | ०१,२५,०००.०० | ०२,८९,१७५.०० | ०१,६४,१७५.०० |
| ०७. | इतर खर्च - मंदिर रंगकाम, कुस्त्या, मंदिर प्रसाद, कावडी, जादा फर्निचर, लस्सी, शोभेच दारुकाम, गेस्ट हाऊस, व्ही.डी.ओ.शुटींग, पेंटर बिले, पोलीस स्टेशन इंधन बीलासह. | ०१,००,०००.०० | ००,६०,४४६.०० | ---- |
| ०८. | पालख्या, पिण्याचे पाणी इ. | ००,०५,०००.०० | ००,०७,८६४.०० | ००,०२,८६४.०० |
| | एकूण खर्च | ३०,२५,०००.०० | ३५,९०,०८०.०० | ०५,६५,०८०.०० |
| ०९. | भक्तांमार्फत तिन्ही दिवस भोजन देणगी म्हणून जमा. | | ६,५०,०००.०० | |

अ.नं.०१ मध्ये जादा झालेल्या खर्चाबाबत - श्री गुरुपौर्णिमा उत्सव २००८ मध्ये मंडप, कमानी व स्टेजवर रु. ०५,००,०००.०० इतका खर्च मा.व्यवस्थापन समितीने मंजूर केला होता व श्री गुरुपौर्णिमा उत्सव २००८ मध्ये मंडप, कमानी व स्टेज इ.साठी प्रत्यक्षात रु. १५,३२,५१६.०० इतका खर्च आलेला आहे. विविध ठिकाणी जादा मंडप टाकण्यात आलेमुळे रु. १०,३२,५१६.०० इतका जादा खर्च झालेला असुन त्यास दि. ०७/०७/२००८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत विषय क्र.१६ व निर्णय क्र.६२१ अन्वये मंजुरी घेतलेली आहे.

अ.नं.०३ मध्ये जादा झालेल्या खर्चाबाबत - श्री गुरुपौर्णिमा उत्सव २००८ मध्ये भक्तांना मिष्टान्न मजुरीसह रु. २,७५,०००.०० इतका खर्च मा.व्यवस्थापन समितीने मंजूर केला होता व श्री गुरुपौर्णिमा उत्सव २००८ मध्ये भक्तांना मिष्टान्न मजुरीसह इ.साठी प्रत्यक्षात रु. ३,१८,२५०.०० इतका खर्च आलेला आहे. यात श्री गुरुपौर्णिमा उत्सव २००८ मध्ये मजुरी वाढलेने रु. ४३,२५०.०० इतका जादा खर्च झालेला आहे.

अ.नं.०४ मध्ये जादा झालेल्या खर्चाबाबत - श्री गुरुपौर्णिमा उत्सव २००८ मध्ये विद्युत रोषणाईसाठी रु. ००.०० इतका मंजूर झालेला होता व श्री गुरुपौर्णिमा उत्सव २००८ मध्ये प्रत्यक्ष विद्युत खर्च हा रु. ३,६००.०० इतका झालेला आहे. यामध्ये जिल्हा परिषदेच्या ठिकाणी पर्यायी व्यवस्था म्हणून भाडोत्री जनरेटर इ.साठी खर्च झाला असलेने रु.३,६००.०० इतका जादा खर्च झालेला आहे.

अ.नं.०६ मध्ये जादा झालेल्या खर्चाबाबत - श्री गुरुपौर्णिमा उत्सव २००८ मध्ये जादा कामगार खर्चासाठी रु. १,२५,०००/- इतका मंजूर झालेला होता व श्री गुरुपौर्णिमा उत्सव २००८ मध्ये प्रत्यक्ष जादा कामगार खर्च हा रु. २,८९,१७५.०० इतका झालेला आहे. यात श्री गुरुपौर्णिमा उत्सव २००८ मध्ये विविध ठिकाणी जादा कंत्राटी कामगार व सुरक्षा गार्ड नेमण्यात आले होते, तसेच मानधनात वाढ झालेने रु. ०१,६४,१७५.०० इतका जादा खर्च झालेला आहे.

अ.नं.०८ मध्ये जादा झालेल्या खर्चाबाबत - श्री गुरुपौर्णिमा उत्सव २००८ मध्ये पालख्या, पिण्याचे पाणी इ.साठी रु. ५,०००/- मंजुरी घेण्यात आली होती. प्रत्यक्षात रु. ७,८६४.०० इतका खर्च झालेला आहे. यात २ टँकर नविन मराठी शाळा येथे पिण्याचे पाणी पुरविणेसाठी वापरण्यात आला, त्या टँकरसाठी डिझेल खर्च केल्याने रु. २,८६४/- इतका जादा खर्च झालेला आहे.

मा.व्यवस्थापन समितीने श्री गुरुपौर्णिमा उत्सव २००८ चा मंजूर केलेला खर्च हा अंदाजित असून सन २००७ मधील खर्चामध्ये १० टक्के जादा धरुन कळविण्यात आलेला होता प्रत्यक्षात मात्र टाकण्यात आलेले जादा मंडप, भाडोत्री जनरेटर, डिझेल, मिष्टान्न मजुरी, जादा कंत्राटी कामगार इ. तसेच भाववाढ व इतर कारणामुळे जादा खर्च झालेला आहे.

श्रीगुरुपौर्णिमा उत्सवात अंदाजीत खर्च रु. ३०,२५,०००.०० इतका अपेक्षीत होता मात्र प्रत्यक्षात खर्च रु. ३५,९०,०८०.०० इतका झालेला आहे. उपरोक्तनुसार अपेक्षीत खर्चापेक्षा रु. ०५,६५,०८०.०० इतका जादा खर्च झालेला असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

**विषय नं.५७** **शिर्डी महोत्सव-२००८ बाबत**

**निर्णय क्र.८७४** सन २००७ सालात दि.०८/१२/२००७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.८२६ अन्वये शिर्डी महोत्सव-२००७ साठी एकूण खर्च रु. ७,००,०००/- इतका मंजूर करण्यात आलेला होता. मागिल वर्षी सदरच्या कार्यक्रमास साधारणपणे रु. ०३,२५,५४१.०० (अक्षरी रु. तीन लाख पंचवीस हजार पाचशे एक्केचाळीस मात्र) खर्च आलेला आहे. " शिर्डी महोत्सव - २००७ " हा दि.२८/१२/२००७ ते दि.३१/१२/२००७ अखेर चार दिवस साजरा करण्यात आलेला आहे. सदर कार्यक्रमाचा उद्देश हा चालू वर्षाचा शेवट व नविन वर्षाची सुरुवात चांगल्यारितीने व्हावा असा आहे. तसेच दि.३१/१२/२००८ रोजी समाधी मंदिर रात्रभर दर्शनासाठी खुले रहाणार आहे. याहीवर्षी मागिल वर्षाप्रमाणे शिर्डी महोत्सव साजरा करणेबाबत व त्या अनुषंगाने मान्यवर गायकांचे व कलाकारांचे दि.२९/१२/२००८ ते दि.३१/१२/२००८ रोजी गायन व नृत्य कार्यक्रमास परवानगी मिळावी म्हणून अनेक पत्रे येत असतात.

दि.१६/१०/२००८ रोजीचे मा.अध्यक्षसो. व मा.आ.श्री.राधाकृष्ण विखे पा. यांचेशी झालेल्या चर्चेत संस्थानमध्ये पुर्वीपासून जे उत्सव साजरे केले जातात त्यांचे स्वरुप मोठ्या प्रमाणावर वाढवावे. तसेच यासाठी महत्वाच्या व अतिमहत्वाच्या व्यक्तींना निमंत्रीत करण्यात यावे. असे ठरलेले आहे. त्यानुसार जर मोठमोठ्या कलाकाराना जर आमंत्रित केले तर कलाकार मानधन खर्च वाढेल.

०२) तीन दिवसांच्या या महोत्सवासाठी खालीलप्रमाणे अंदाजित खर्च अपेक्षीत आहे.

| अ.नं. | तपशील | तीन दिवस खर्च रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१. | स्टेज, ड्रेसींग रुम व ५०० खुर्च्यासह बैठक व्यवस्था | ५५,०००.०० |
| ०२. | जाहिरात, कापडी बॅनर्स व बोर्ड | २५,०००.०० |
| ०३. | कलाकार मानधन व प्रवास खर्च (अंदाजे तीन दिवसाकरीता कलाकार ) | ६,००,०००.०० |
| ०४. | व्हि.डी.ओ.शुटींग व फोटोग्राफी | १०,०००.०० |
| ०५. | इतर किरकोळ खर्च | १०,०००.०० |
| | **एकूण खर्च** | **७,००,०००.००** |

सदरचा कार्यक्रम हा श्री साईसत्चरित्र पारायण सोहळा ज्याठिकाणी झाला त्याठिकाणी केल्यास उत्तम प्रतिसाद मिळेल. मागीलवर्षी साईनगर मैदानावर कलाकार कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते, त्यावेळी प्रतिसाद म्हणावा तसा मिळाला नव्हता, नंतरचे कार्यक्रम हनुमान मंदिराशेजारील जागेवर घेतलेने चांगला प्रतिसाद मिळाला होता. सदर कार्यक्रमाचा उद्देश हा चालू वर्षाचा शेवट व नविन वर्षाची सुरुवात चांगल्यारितीने व्हावा असा आहे. त्यामुळे या वर्षी फक्त दि.३१/१२/२००८ रोजी एकच दिवस सायं.७.०० ते ९.०० व रात्रौ ९.३० ते १२.३० असे कार्यक्रम ठेवण्यात यावेत असे नम्र मत आहे.

तथापि सदरचा शिर्डी महोत्सव कार्यक्रम मागिलवर्षाप्रमाणे तीन दिवस ठेवलेस दि. २९/१२/२००८ ते ३०/१२/२००८ - दोन दिवस वेळ सायं. ७.०० ते ९.३० पर्यंत दररोज एक कार्यक्रम ठेवावा व दि. ३१/१२/२००८ रोजीचा कार्यक्रम हा रात्रौ ०७.०० ते ९.३० व रात्रौ १०.०० ते पहाटे ०१.०० पर्यंतच ठेवावा, म्हणजे एकूण ४ कार्यक्रम सादर करता येतील, याबाबत योग्य तो निर्णय होणे आवश्यक आहे.

तीन दिवसाच्या या शिर्डी महोत्सवासाठी साधारणपणे अंदाजीत रु. ७,००,००० र्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात देण्यात आली. सदरचे शिर्डी महोत्सवातील कार्यक्रम निश्चितीबाबत उपसमितीचे सभेत निर्णय घेण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

**मा.अध्यक्ष यांचे परवानगीने खालील विषयावंर चर्चा सुरु करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०१** **नाताळ सुट्टीतील गर्दीचे कालावधीत साईभक्तांचे सोयीकरीता मंडप टाकणे बाबत**
**निर्णय क्र.८७५** नाताळ (ख्रिसमस ) सणाचे सुट्ट्यांचे दि. २४/१२/२००८ ते दि. ०२/०१/२००९ या कालावधीत शाळा / कॉलेज यांना शैक्षणिक सुट्ट्या आहेत. तसेच वर्षाअखेर व नूतनवर्षारंभ या कालावधीत साईभक्तांचा मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता आहे. येणारे साई भक्तांची निवासस्थानचे परिसरातील इमारतीचे दक्षिण बाजू पार्किंग, पश्चिम बाजू पार्किंग या ठिकाणी शामियाना मंडप व्यवस्था बिछायत व कनातीसह करुन मिळणेबाबत दि. ३१/१०/२००८ चे पत्रान्वये अधिक्षक श्री साईबाबा भक्तनिवासस्थान यांनी कळविले आहे.

दि. २४/१२/२००८ ते दि. ०२/०१/२००९ पर्यंत १० दिवसांकरीता भक्तनिवासस्थान (५०० रुम ) परिसर तसेच प्रसादालय परिसर, साईनगर परिसर, इत्यादी ठिकाणी साईभक्तांचे अतिरिक्त निवास व्यवस्थेसाठी तात्पुरते शामियाना मंडप व्यवस्था बिछायत व कनातीसह खालीलप्रमाणे करता येईल.

**अ) साईबाबा भक्तनिवासस्थान परीसरातील मंडप :-**

| **अ.नं.** | **मंडप तपशिल** | **चौरस फुट** |
|---|---|---|
| ०१ | पार्किंग दक्षिण बाजू ४५'x ३९०' | १७,५५०.०० |
| ०२ | पार्किंग पश्चिम बाजू ३०'x ९०' | २,७००.०० |
| ०३ | साईबाबा भक्तनिवासस्थान आतिल बगीचा (लॉन) २००'x २००' | ४०,०००.०० |
| | एकुण | ६०,२५०.०० |

**ब) मंदीर परिसर व प्रसादालय परिसरातील मंडप :-**

| अ.नं. | मंडप तपशिल | चौरस फुट |
|---|---|---|
| ०१ | प्रसादालय तिकीट काऊंटर समोर (बिछायतीसह) १५' उंची असलेला<br>जेवण रेलिंग पुर्व / पश्चिम बाजु १२२'X४२'<br>७०'x३०' | ५,१२४.००<br>२,१००.०० |
| ०२ | जेवण शेड पुर्वबाजू (बिछायत व कनातीसह )<br>४०'x८०'<br>१५'x७०' | ३,२००.००<br>१,०५०.०० |
| ०३ | प्रसादालय पार्किंग चे ठिकाणी १२ ते १५ फुट उंची असलेला ( बिछायत व कनतीसह ) १००' x १५०' | १५,०००.०० |
| ०४ | साईउदयान इमारती समोर ६०'x ४५' | २,७००.०० |
| ०५ | चौकशी कार्यालयासमोर ६०'x१५' | ९००.०० |
| ०६ | जुना पिंपळवाडी रस्ता फुटपाथ दर्शनरांगेसाठी नगर-मनमाड रोड ते जुनी जि.प.शाळा ६५०'x२०' | १३,०००.०० |
| ०७ | गेट न. १ करीता २५'x३०' | ७५०.०० |
| ०८ | गेट नं. ५ करीता २५'x३०' | ७५०.०० |
| ०९ | गेट नं. ४ चे बाहेरील बाजूस ४०'x२५' | १०००.०० |
| १० | प्रसादालय पुरीसाठी ४०'x३०' | १२००.०० |
| ११ | जुना पिंपळवाडी रस्ता फुटपाथ दर्शन रांग सुरुवातीला (नगर-मनमाड रस्त्याकडील बाजू ) ६०'x३०' | १,८००.०० |
| १२ | समाधि मंदिर दक्षिण बाजू सुरक्षा रक्षकाकरीता २०x२० | ४००.०० |
| | एकुण चौ. फुट. | ४८,९७४.०० |

**ब) साईनगर परिसरातील मंडप :-**

| अ.नं. | मंडप तपशिल | चौरस फुट |
|---|---|---|
| ०१ | मैदानावर<br>२००'x१००'<br>२००'x१००' | २०,०००.००<br>२०,०००.०० |
| | एकूण चौ.फुट | ४०,०००.०० |

एकूण अ + ब + क चौ.फुट = १,४९,२२४.००

उपरोक्त तपशिलाप्रमाणे नाताळ सुट्टीतील गर्दीतील कालावधी करीता दि. २४/१२/२००८ ते दि. ०२/०१/२००९ अखेर १० दिवसासाठी १,४९,२२४.०० चौ. फुट शामियाना मंडप उभारणेकामी अंदाजे रु. ३,००,०००.०० खर्च अपेक्षीत असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, ा नाताळ सुट्टीतील गर्दीतील कालावधी करीता दि. २४/१२/२००८ ते दि. ०२/०१/२००९ अखेर १० दिवसासाठी १,४९,२२४.०० चौ. फुट शामियाना मंडप उभारणेकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ३ लाख खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच आवश्यकतेनुसार भाडोत्री गाद्या नेहमीप्रमाणे कोटेशन्स पध्दतीने घेणेस व गर्दीचे स्वरुप पाहून वाढीव मंडप व्यवस्था व कालावधी वाढविण्याची आवश्यकता पडल्यास सुविधा करण्यात यावी त्यासाठी येणारे सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. याकामी कोटेशन्स मागविण्यात यावीत असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०२ स.नं.१४८ मधील व्दारावती भक्तनिवास इमारतीचे फर्निचर (लगेज रॅक )बाबत**
**निर्णय क्र.८७६** संस्थानचे शिर्डी येथील स.नं. १४८ मधिल द्वारावती भक्तनिवास इमारतीचे तळमजला (पार्कींग) अधिक चार मजले प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात असून चौथा मजला बांधकाम, रस्ता, पाणीपुरवठा, ड्रेनेज व इलेक्ट्रीकल काम प्रगतीपथावर आहे.

भक्तनिवास इमारतीचा वापर जानेवारी २००८ मध्ये सुरू करणेसाठी रुममधील फर्निचर व काउंटरचे काम हाती घेण्यात आले आहे. सिंगल बेड व गाद्या खरेदी करणेचे काम प्रगतीपथावर आहे.

मा.अध्यक्षसो., मा.कार्यकारी अधिकारीसो. यांनी दि. १५/०९/२००८ व स्थानिक विश्वस्तांनी दि. १६/०९/२००८ रोजी स्टील फर्निचर पाहणी केली. त्यावेळी त्यांनी कडप्पा ग्रीन मार्बल मधील लगेज रॅकचे नमुन्याची पाहणी करून सदर नमुन्याप्रमाणे कडप्पा ग्रीन मार्बल मधील लगेज रॅक करणेस मान्यता दिली आहे. याकामी अंदाजे रु.११,१०,०००/-मात्र खर्च अपेक्षित आहे.

ठेकेदार गोलानी बिल्डर्स यांना दि.०७/११/२००८ चे पत्रान्वये कडप्पा ग्रीन मार्बल मधील लगेज रॅक करणे कामासाठी दर सादर करणेबाबत कळविले आहे. तसेच याबाबत तोंडी विचारणा करूनही अद्याप त्यांनी दर सादर केलेले नाहीत. यावरून त्यांची सदर काम करणेची इच्छा दिसून येत नाही. तुर्त स्थानिक ठेकेदार यांचेकडून नमुनादाखल आठ लगेज रॅक्स तयार करुन घेण्यात येत आहेत. याप्रमाणेच उर्वरीत लगेज रॅकचे काम लवकरात लवकर पूर्ण करणेचे दृष्टीने अशा प्रकारचे काम करणा-या स्थानिक ठेकेदारांकडून कोटेशन्स मागवून करून घेता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०३ इंग्लीश मिडीयम स्कूल चिल्ड्रन पार्क मधील कारंजा स्थलांतरीत करणे व तेथे पेव्हींग ब्लॉक बसविणे बाबत.**
**निर्णय क्र.८७७** संस्थानचे इंग्लिश मेडीअम स्कूलकडील बगिच्यात (चिल्ड्रन पार्क) सध्या कारंजा आहे. परंतू तो शाळेतील विद्यार्थी / विद्यार्थीनीकरीता उपयोगात येत नाही. तसेच ज्यु. के.जी. व सि.के.जी. तील लहान मुलांना बगिच्यात खेळत असतांना त्यांचा बराचसा अडथळा होतो. व आता स्कुल मधील मुले आपण बगीच्या गेट मधून सोडणार आहे. त्यामुळे सदर कारंजा काढून टाकल्याशिवाय बगीचा गेट पर्यंत (ब्लॉक टाकून) रस्ता करता येणार नाही. तरी शाळेच्या बगिच्या मधील कारंजा काढून तेथून बगीचा गेट पर्यंत रस्ता (ब्लॉक टाकून ) करुन मिळणेबाबत", दि. १२.०८.२००८ चे पत्रान्वये, प्राचार्या, इं.मे.स्कूल यांनी कळविले आहे.

याबाबत समक्ष पहाणी केली असता, सध्या स्कूल बस करीता नगर-मनमाड रोडचे बाजुकडील कंम्पाउंडला गेट केलेले आहे. सदर गेट पासून Lay - out Plan मध्ये दाखविले प्रमाणे अंदाजे ६० फुट अंतरावर सदरचा कारंजा आहे. तरी सदर ठिकाणी असलेल्या कारंजा काढून साई आश्रम प्रकल्पाचे ठिकाणी अथवा नविन प्रसादालय परिसरात बसविणेबाबत समक्ष पहाणी करुन निर्णय घेता येईल.

तरी सदर ठिकाणी असलेला कारंजा काढणे व कांरजाचे जागेवर Block बसविणे तसेच नगर-मनमाड गेट पर्यंत पाथवेकरीता ४ फुट रुंदीचे पेव्हिंग ब्लॉक बसविणेकामी अंदाजे रुपये ४४,०५५.०० खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०४ साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व्यवस्था करणे बाबत**

**निर्णय क्र.८७८** साईभक्तांचे सोयीसाठी पावसाळी मंडप -२००८ व्यवस्था करणेकामी पत्र्याचे छत असलेले मंडप व इतर अनुशंगीक सुविधा उपलब्ध करुन देणेकरीता मंडप ठेकेदार कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर यांना इकडील जा. नं. १५८७९/२००८ दि. २७.१०.२००८ चे कार्यादेशान्वये दि. ११.१०.२००८ ते दि. ०५.११.२००८ पर्यंत वाढीव मुदतीचा कार्यादेश रु. ०.३४ प्रति दिवस प्रति चौ. फुट दराने देणेत आला होता. त्यानूसार खालील प्रमाणे मंडप उभारणी करणेत आले होते.

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण | मंडपाचा आकार | | | मंडपाचा एकुण आकार चौरस फुट |
|---|---|---|---|---|---|
| | | लांबी (फुट) | रुंदी (फुट) | उंची (फुट) | |
| ०१ | जुना पिंपळवाडी रस्ता फुटपाथ दर्शनरांगेसाठी | ४५० | १० | १५ | ४,५००.०० |
| ०२ | गेट न. १ करीता | २५ | ३० | १५ | ७५०.०० |
| ०३ | गेट नं. ५ करीता | २५ | ३० | १५ | ७५०.०० |
| ०४ | गेट नं. ४ चे बाहेरील बाजूस | ४० | २५ | १५ | १०००.०० |
| ०५ | जुना पिंपळवाडी रस्ता फुटपाथवर दर्शन रांगेकरीता (पुर्व बाजु) | २२० | ०८ | १५ | १७६०.०० |
| ०६ | जुना पिंपळवाडी रस्ता फुटपाथ दर्शन रांग सुरुवातीला (नगर - मनमाड रस्त्याकडील बाजू) | ६० | ३० | १५ | १८००.०० |
| ०७ | समाधि मंदिर उत्तर बाजू | २८० | २० | १८ | ५६००.०० |
| ०८ | समाधि मंदिर दक्षिण बाजू सुरक्षा रक्षकाकरीता | १५ | १५ | १५ | २२५.०० |
| | | | | | १६३८५.०० |

दि. १०.११.२००८ रोजी मा. कार्यकारी अधिकारी सो, यांचे राउंडमध्ये साईभक्तांचे उन, वारा व थंडी यापासून संरक्षण होणेकरीता उपरोक्त पैकी खालील खालील ठिकाणचे मंडप पुढील व्यवस्था होईपर्यंत तूर्त ठेवण्यात यावेत अशा सूचना केल्या आहे.

| अ.नं | तपशिल / ठिकाण | साईज | एकुण चौ. फुट |
|---|---|---|---|
| ०१ | जुना पिंपळवाडी रस्ता फुटपाथवर दर्शन रांगेकरीता (पश्चिम बाजु) | ४५०'x०८' | ३६००.०० |
| ०२ | जुना पिंपळवाडी रस्ता फुटपाथ दर्शन रांग सुरुवातीला (पुर्व बाजू) | २२०'x८' | १७६०.०० |
| ०३ | जुना पिंपळवाडी रस्ता फुटपाथ दर्शन रांग सुरुवातील (नगर - मनमाड रस्त्याकडील बाजू) | ६०'x३०' | १८००.०० |
| ०४ | गेट नं. १ करीता | ३०'x१५' | ४५०.०० |
| | गेट नं. ५ करीता | ३०'x१५' | ४५०.०० |
| | | एकुण चौ. फुट | ८०६०.०० |

सध्या पावसाचे दिवस नसल्यामुळे ठेकेदार यांना मंडपाचे छतावरील पत्रा काढून फक्त कापडी मंडप ठेवावेत अशी सूचना केली आहे.

उपरोक्त प्रमाणे मंडप व्यवस्था दि. ११.१०.२००८ ते दि. २२.१२.२००८ अखेर ४१ दिवसाकरीता करता येईल. इकडील जा. नं. ३४८६/२००८ दि. ०६.०३.२००८ चे ऑर्डर अन्वये शामियाना मंडप उभारणी करीता रु. ०.२५ प्रति दिवस प्रति चौ. फुट दर मंजूर आहे. त्याच मंजूर दरात सदरचा कापडी मंडप उभारणी करणे बाबत कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर यांना विचारणा केली असता त्यांनी सदर मंडपाचे काम रु. ०.२५ प्रति दिवस प्रति चौ. फुट दरात करणेस तयार असल्याचे कळविले आहे. करीता सदरचा मंडप उभारणीचे काम ठेकेदार कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर यांचेकडून करुन घेता येईल.

तरी याकामी येणारे अदाजे रु. ८२,६१५.०० मात्रचे खर्चास व सदरचे काम मंडप ठेकेदार कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर यांचेकडून करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०५** **साईनाथ रुग्णालय नुतनीकरण नियोजित करणेकामी केसपेपर विभागाबाहेर शेड उभारणे बाबत**

**निर्णय क्र.८७९** दि. २०/०९/२००८ रोजी झालेल्या मा. उपसमिती सभेमध्ये संस्थानची धर्मशाळा क्र. ०१ ची इमारत पूर्णपुणे श्री साईनाथ रुग्णालयाचे वापरासाठी उपलब्ध करुन देणेस तसेच याकामी येणारे अपेक्षीत योग्य त्या सर्व समावेशक खर्चास मान्यता मिळाली आहे.

मा. कार्यकारी अधिकारी सो., वैद्यकिय संचालक व वैद्यकीय अधिक्षीका यांनी साईनाथ रुग्णालयाचे पहाणी दरम्यान सध्दाचे धर्मशाळा विभागाचे कार्यालयाचे ठिकाणी साईनाथ रुग्णालयात

येणाऱ्या पेशंटसाठी केसपेपर विभाग व मेडीकल रेकॉर्ड विभाग करण्याचे ठरविले आहे. केसपेपर घेण्यासाठी पेशंटची मोठ्या प्रमाणात गर्दी असते. त्यामुळे केसपेपर काढणेसाठी पेशंट व त्यांचे नातेवाईकांना रांगा लावणे कामी शेड बनविणे आवश्यक आहे. त्यासाठी इमारतीचे बाहेरील बाजूस १० मी. x ६ मी. आकाराचे शेड करता येईल. सदरचे शेड बनवणेकामी अंदाजे रक्कम रुपये १,८८,०००.०० मात्र खर्च अपेक्षीत आहे. साईनाथ रुग्णालयासमोर सध्दा ठेकेदार मे . संतोष नागनाथ गुंजेगावकर यांचेमार्फत गोळ्या - औषध वाटप, बिलींग व पेशंटचे नातेवाईकांना बसणेसाठी शेड बनविण्यात येत आहे. यांचे मंजूर दरात केसपेपर विभागासाठी शेड बनवून घेता येईल.

तरी नियोजीत केसपेपर विभागाचे बाहेरील बाजूस रुग्णांना व त्यांचे नातेवाईकांना केसपेपर काढणेसाठी रांगा लावणेसाठी शेड उभारणेस तसेच सदरचे काम ठेकेदार मे. संतोष नागनाथ गुंजेगांवकर यांचे मंजूर दरात करणे व याकामी येणारे रक्कम रुपये १,८८,०००.०० मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा विषय नं.०६ निर्णय क्र.८८०**

**कार्डीयाक ऑपरेशन थिएटरमधील लाईट सोर्सकरीता फायबर ऑप्टीक केबल खरेदी करणे बाबत**

श्री साईबाबा हॉस्पिटलचे कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागाकरीता मा.व्यवस्थापन समितीच्या दि.११.०२.२००६ चे सभेतील निर्णय क्र.२२ अन्वये मे.बी.एल.लाईफ सायन्सेस प्रा.लि., मुंबई यांचेकडून एक झेनॉन लाईट सोर्स (Luxtec LX ३००) सर्व करांसहीत एकूण रु.२,८६,०००/- इतक्या रकमेत खरेदी करण्यात आला आहे. सदर लाईटसोर्स श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये कार्यान्वीत करण्यात आला असून कंपनीने सदर लाईटसोर्स करीता दिलेला एक वर्षाचा वॉरंटी कालावधी दि.०४.०४.२००६ रोजी संपला आहे. सदर लाईटसोर्सची दुरुस्ती व देखभाल बायोमेडीलकल इंजिनीअरींग विभागामार्फत येथेच केली जात आहे. परंतु दुरुस्ती करीता आवश्यक असणारे स्पेअर पार्ट पुरवठाधारक कपंनीकडूनच खरेदी करावे लागतात.

सदर लाईटसोर्समध्ये निर्माण होणारा प्रखर प्रकाश सर्जनच्या हेडबॅन्ड पर्यंत तेवढयाच प्रखरतेने वाहुन नेण्यासाठी एक फायबर ऑप्टीक केबल वापरलेली असते. बायपास सर्जरी करताना सर्जनला रुग्णाच्या हृदयाचे सर्व भाग स्पष्ट दिसणे गरजचे असते. हे काम फायबर ऑप्टीक केबलद्वारे केले जाते. परंतु सदर लाईटसोर्स कार्यान्वीत झाल्यापासुन आजपावेतो अंदाजे २,५०० तासांपेक्षा अधिक काळ वापरला गेला असल्याने फायबर ऑप्टीक केबलची प्रकाश वाहुन नेण्याची क्षमता कमी झाली आहे व सर्जनला हेडबॅण्डमधुन मिळणारा प्रकाश कमी झाला आहे. त्यामुळे सदर फायबर ऑप्टीक केबल तातडीने बदलणे आवश्यक आहे. सदर बाबतीत कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागाने त्यांचे पत्र क्र.६५६९, दि.०९.०९.२००८ अन्वये मागणीपत्रही पाठविले आहे. त्यामुळे सदर फायबर ऑप्टीक केबलकरीता कंपनीकडे विचारणा केली असता त्यांनी त्यांचे पत्र क्र. BLL/ MUM/ २८९/ ०८-०९ दि.२२.१०.२००८ अन्वये खालीलप्रमाणे कोटेशन पाठविले आहे.

| Sr. no. | Description | Qty | Rate per | Total amount |
|---|---|---|---|---|
| | Fiber Optic Cable for LUXTECH Light Source Model- LX 300 | 01 | 53,000.00 | 53,000.00 |
| | | | Special Discount 10% | -5300.00 |
| | | | +VAT 12050% | 5962.50 |
| | | | Net (R.off) total in Rs | 53662.00 |

वरीलप्रमाणे मे.बी.एल.लाईफ. सायन्सेस. प्रा.लि., मुंबई यांचेकडून लाईटसोर्सकरीता फायबर ऑप्टीक केबल खरेदी करणेसाठी सर्व करांसहीत एकुण रु.५३,६६२/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर रकमेची कंपनीने आगाऊ मागणी केली आहे. सदर लाईटसोर्स मे.बी.एल.लाईफ. सायन्सेस. प्रा.लि., मुंबई यांनी पुरवठा केला असून त्यांचे स्पेअर पार्ट फक्त त्यांचेकडेच मिळतात.

कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागातील लाईटसोर्सकरीता फायबर ऑप्टीक केबल मे.बी.एल.लाईफ. सायन्सेस. प्रा.लि., मुंबई यांचेकडुन खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या सर्व करांसहीत एकुण रु.५३,६६२/- चे खर्चास व सदरची रक्कम कपंनीस आगाऊ पाठविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

**आयत्या वेळेचा विषय नं. ०७ निर्णय क्र.८८१**

**रुग्णालयाकडील पूर्व लेखापरिक्षक श्री व्ही.व्ही.कोठारी चार्टर्ड अकौंटंट यांचे मानधन वाढीबाबत**

श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाच्या वाढत्या आर्थिक व्यवहारावर परिणामकारक नियंत्रण राहण्यासाठी आर्थिक वर्ष २००८-०९ साठी मे व्ही.व्ही कोठारी चार्टर्ड अकौंटट यांची दि.१६.०३.२००८ रोजीचे मा.व्य.स.चे सभेत निर्णय क्र.२३६ अन्वये वार्षिक रु.१,५०,०००/- एकत्रित मानधनावर नियुक्ती करण्यात आली आहे.

दि.१ एप्रिल २००८ पासुन दोन्ही हॉस्पिटलांची लेखाविषयक कार्यप्रणाली स्वतंत्र पणे सुरु करण्यात आली आहे. अंतर्गत लेखापरीक्षक व पुर्व लेखापरीक्षक म्हणुन श्री व्ही.व्ही. कोठारी यांची मागील आर्थिक

वर्षासाठी ठरविण्यात आलेल्या मानधनावर नियुक्ती करण्यात आली आहे. श्री व्ही.व्ही कोठारी यांनी सदर मानधनात वाढ होणेबाबत दि.२५.०७.२००८ रोजीचे पत्रानुसार विनंती केली आहे. सदर प्रस्ताव दि.२०.०९.२००८ रोजीचे मा.व्य.स.सभेत ठेवण्यात आला होता यावर निर्णय झाला नाही. श्री व्ही.व्ही. कोठारी यांनी लेखापरीक्षण कामाचे स्वरुप व व्याप यांचा उल्लेख असलेले पत्र दि.०६.१०.२००८ रोजी फेरसादर केले आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाच्या कामकाजाचा वाढता व्याप लक्षात घेता, त्यांनी त्यांचे दि.२४.०५.२००८ चे पत्रान्वये त्यांचे मानधनामध्ये रु.२,५०,०००/- ते रु.२,६५,०००/- पर्यंत वाढ करण्याबाबत विनंती केलेली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सदर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाच्या कामकाजाचा वाढता व्याप लक्षात घेता, अंतर्गत लेखापरीक्षक व पुर्व लेखापरीक्षक म्हणुन श्री व्ही.व्ही. कोठारी यांना रुपये २ लाख मानधन देण्यात यावे व त्यांच्याकडून सर्व काम व्यवस्थीत पूर्ण करुन घ्यावे,असे ठरले.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/मुख्य लेखाधिकारी)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०८** **चावडी मंदिर पूजन शताब्दी महोत्सवाबाबत**

**निर्णय क्र.८८२** श्री साईबाबांचे व्दारकामाईमध्ये हयातभर वास्तव्य असे तसेच श्री साईबाबा व्दारकामाईत व चावडीमध्ये शयन करीत असत. त्यांचा असा नित्यक्रम महानिर्वाणापर्यंत चालू होता. १० डिसेंबर, १९०९ रोजी बाबांच्या भक्तांनी चावडीमध्ये बाबांचे भजन-पुजन सुरु केले असून तसा संदर्भ कै. दाभोळकर लिखित श्री साई सच्चरित ग्रंथात अध्याय क्र. ३७ मध्ये ओवी क्रं. १८८ मध्ये आहे. या घटनेस सन २००९ मध्ये १०० वर्ष होत आहेत.

या वर्षी १० डिसेंबर, २००८ सालापासुन शताब्दी वर्षास सुरुवात होत असुन पुढील वर्षी १० डिसेंबर, २००९ मध्ये १०० वर्षे पुर्ण होतील. त्यामुळे हा कालावधी चावडी मंदिर पूजन शताब्दी वर्ष म्हणून साजरा करता येईल.

यामध्ये दि.१० डिसेंबर, २००८ रोजी महोत्सवाची सुरुवात म्हणून उत्सवातील कार्यक्रमाप्रमाणे सकाळी ६.०० वा समाधी मंदिरातुन फोटोची मिरवणूक काढण्यात यावी व चावडीमध्ये श्रींच्या चांदीच्या पादुकांची अभिषेक पूजा करता येईल.

हा महोत्सव साजरा करण्याकरिता नामवंत किर्तनकार व कलाकार निमंत्रित करुन भजन संध्या, कीर्तन, प्रवचन, नाटयप्रयोग, साई सा रे ग म तसेच तीर्थ क्षेत्रावरुन पवीत्र नद्यांचे जल आणून बाबांना मंगल स्नान घालणे असे कार्यक्रम आयोजित करता येतील. त्याच प्रमाणे शताब्दी महोत्सवाचा समारोप म्हणून दि. ०८.१२.२००९ अखेर असे ०३ दिवस भव्य प्रमाणात कार्यक्रम करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, दिनांक १० डिसेंबर २००८ रोजी चावडी पूजन करुन कार्यक्रमाची सुरुवात करावी. दिनांक १३-१४ जानेवारी रोजी श्री श्री रविशंकर यांचे कार्यक्रमाचे आयोजन करुन कार्यक्रमाची सुरुवात करावी. ज्या राज्यात श्री साईबाबांचे जीवन व कार्याचा प्रसार नाही अशा राज्यात जाहिर कार्यक्रम करावे. त्यासाठी प्रोफेशनल इव्हेंट मॅनेजमेंटची नेमणूक करावी स्थानिक भाषेत श्री साईबाबांवरील साहित्य प्रसिध्द करावे. २-३ विश्वस्तांनी मिळून एक राज्यात जावून राज्यातील चांगल्या भजनसम्राटाशी भेट घेऊन कार्यक्रम ठेवण्यात यावा. या कार्यक्रमासाठी चांदीच्या पादूका न्याव्यात. याबाबत मंदीर विभागाने सविस्तर प्रस्ताव सादर करावा याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक, मंदिर विभाग)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०९** **श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी तर्फे मान्यवरांना श्री साई दैनंदिनी /दिनदर्शिका विनामुल्य भेट देणेबाबत**

**निर्णय क्र.८८३** विधानपरिषद व विधानसभेतील सर्व सदस्यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी तर्फे श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका विनामुल्य भेट देण्यात यावी.तसेच उर्वरित मान्यवरांना श्री साई दैनंदिनी/दिनदर्शिका विनामुल्य भेट देण्याबाबत विषय स्थगित ठेवण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१०** **श्री राजेंद्र वामन त्रिभुवन, मदतनीस प्रसादालय यांचे गैरशिस्तवर्तनाबाबत**

**निर्णय क्र.८८४** श्री.त्रिभुवन हे दि.०१.०७.२००८ ते दि.०६.०७.२००८ या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहीले होते. इकडील जा.नं. एसएसएस/ वशी-७ए/ २१४६/ २००८, दि.२९.०७.२००८ अन्वये कारणे दाखवा नोटीस काढून त्यांचा लेखी खुलासा मागविणेत आला होता. परंतू त्यांनी लेखी खुलासा सादर केला नाही.

श्री.त्रिभुवन हे दि.२३.०७.२००८ ते दि.०१.०८.२००८ व दि.०५.०८.२००८ ते दि.२०.०८.२००८ या कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहीले होते. इकडील जा.नं. एसएसएस/ वशी-

७ए/ २६४३/ २००८, दि.१५.०९.२००८ अन्वये कारणे दाखवा नोटीस काढून त्यांचा लेखी खुलासा मागविणेत आला होता. परंतू त्यांनी लेखी खुलासा सादर केला नाही.

श्री.त्रिभुवन हे दि.०५.०८.२००८ पासून सतत सलग पुर्वपरवानगी शिवाय व रजा अर्जाशिवाय गैरहजर आहेत. अशाप्रकारे विनापरवानगी गैरहजेरीबाबत यापूर्वी त्यांना अनेकवेळा कडक शासन केलेले आहे. परंतू त्यांचे वर्तनात व कामात सुधारणा होत नाही. त्यांचे अचानक गैरहजेरीमुळे कामाची पर्यायी व्यवस्था करणे अडचणीचे होत आहे. त्याबद्दल त्यांना जा.नं.१५२३३ दि.१४.१०.२००८ रोजीची कारणे दाखवा नोटीस रजि.ए.डी. पोस्टाने बजावली आहे. नोटीस प्राप्त होऊन देखील त्यांनी खुलासा सादर केलेला नाही. व कामावरही हजर झाले नाही.

श्री.त्रिभुवन यांचा संस्थान सेवेतील पुर्व इतिहास बघता, त्यांना यापुर्वी ३७ वेळा शासन झालेले आहे. श्री.त्रिभुवन हे दि.०७.०८.१९८४ पासून संस्थान सेवेत आहे. परंतू त्यांचे उपस्थितीचे प्रमाण खुपच अत्यल्प आहे. त्यांचे सन १९९८ पासून सेवेतील खाडे विनावेतनबाबतची माहिती खालीलप्रमाणे-

०१) वर्ष- १९९८ खाडे विनावेतन कालावधी १५४ दिवस,
०२) वर्ष- १९९९ खाडे विनावेतन कालावधी ११३ दिवस,
०३) वर्ष- २००० खाडे विनावेतन कालावधी ५५ दिवस,
०४) वर्ष- २००१ खाडे विनावेतन कालावधी १३३ दिवस,
०५) वर्ष- २००२ खाडे विनावेतन कालावधी ११४ दिवस,
०६) वर्ष- २००३ खाडे विनावेतन कालावधी १२९ दिवस,
०७) वर्ष- २००४ खाडे विनावेतन कालावधी २७२ दिवस,
०८) वर्ष- २००५ खाडे विनावेतन कालावधी २७३ दिवस,
०९) वर्ष- २००६ खाडे विनावेतन कालावधी २९० दिवस,
१०) वर्ष- २००७ खाडे विनावेतन कालावधी २२९ दिवस,

अशाप्रकारे अनेकवेळा आरोपपत्र बजावून खातेचौकशी देखील केलेली आहे, त्यांना त्यांचे वर्तन सुधारणेसाठी अनेक वेळा अंतिम संधी देणेत आलेली आहे. परंतू श्री.त्रिभुवन हे झालेल्या शिक्षेंना जुमानत नाही, त्यांचे वर्तनात कुठल्याही प्रकारची सुधारणा झालेली नाही. त्यांचे सदरचे वर्तन स्थायी आदेश कलम नं.२४ (ए), (एफ), (एच), (एल) अनुसार गंभीर गैरशिस्तवर्तन ठरते ते संस्थान सेवेतून बडतर्फ करणेस पात्र झाले आहेत.

स्थायी आदेश कलम २३ (४) नुसार श्री.राजेंद्र वामन त्रिभुवन यांना एक महिन्याचे नोटीस ऐवजी एक महिन्याचा नोटीस पगार आदा करुन त्यांची सेवा समाप्त करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-कामगार अधिकारी/अधिक्षक,आस्थापना विभाग)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ११** **गाळेधारकांना मुदतवाढ देणे बाबत**
**निर्णय क्र.८८५** संस्थानचे नवीन भक्त निवास इमारतीमध्ये लिव्ह अॅन्ड लायसन्स तत्वावर देणेत आलेले गाळा धारकांचे वापर मुदतीत तारखामध्ये खालील प्रमाणे बदल करणेत आलेले आहेत.

| अ.नं. | गाळेधारकाचे नांव | कालावधी | कालावधी |
|---|---|---|---|
| ०१. | श्री साई संस्थान एम्प्लाईज क्रेडीट को-ऑप सोसायटी , शिर्डी | दि.१/०६/२००८ ते दि. ३१/०५/२००८ | दि.०१/०६/२००८ ते दि. ३१/०३/२००८ |
| ०२. | महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी | दि. २५/०२/२००७ ते दि.२४/०१/२००८ | दि. २५/०१/२००८ ते दि.३०/०९/२००८ |
| ०३. | श्री संदीप अशोक जगधने , श्रीरामपुर | दि.०१/११/२००७ ते दि. ३०/०९/२००८ | दि.१/११/२००७ ते दि. ३०/०९/२००८ |
| ०४. | श्री नंदु गणपत कोळोपकर , शिर्डी | दि.१३/०६/२००८ ते दि. १२/०५/२००९ | दि.१३/०६/२००८ ते दि. ३१/०३/२००७ |
| ०५. | प्रवरा फळे भाजीपाला उत्पादक व प्रक्रिया संघ | दि. ३०/११/२०००७ ते दि.२९/११/२००८ | दि.३०/११/२००७ ते दि. ३०/०९/२०० |
| ०६. | श्री अजय बोरावके , कोपरगांव गुरुकृपा सेल्स | दि.१०/१०/२००७ ते दि. ०९/०९/२००८ | दि.१०/१०/२००७ ते दि. ३०/०९/२००८ |
| ०७. | श्री प्रविण अशोक शिंदे शिर्डी | दि.१६/१०/२००७ ते | दि.१६/१०/२००७ ते |

| | | | |
|---|---|---|---|
| | | दि. १५/०९/२००८ | दि. ३०/०९/२००८ |
| ०८. | श्रीरामपुर दुध जिल्हा मध्यवर्ती सह-संघ बाभळेश्वर | दि. २०/१२/२००७<br>ते<br>दि. १९/१२/२००८ | दि.२०/१२/२००७<br>ते<br>दि.३०/०९/२००८ |

उपरोक्त गाळा धारकांपैकी अ.क्र.१ महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी यांचे गाळाची मुदत ३०/०९/२००८ रोजी संपुष्टात आली आहे. तर प्रवरा फळे भाजीपाला उत्पादक व प्रक्रिया संघ श्रीरामपुर जिल्हा मध्यवर्ती सह-संघ मर्यादीत बाभळेश्वर यांना दिलेले २००८ व पावेतो संपुष्टात येणार होत्या . आथिक वर्ष मार्च एप्रिल ठेवण्याच्या दृष्टीने मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.६/९/२००८ रोजीचे ठरावा प्रमाणे सदर लायसन्स मुदतीचा कालावधी कमी करुन दि. ३०/०९/२००८ पावेतो करण्यात आलेला आहे. त्या प्रमाणे सदर संस्थेस अलहीदा कळविण्यात येणार आहे. परंतू प्रवरा फळे भाजीपाला उत्पादक व प्रक्रीया संघ मर्या. यांनी त्यांचे गाळयाची मुदतवाढ मिळणेस विनंती केली आहे. त्याच प्रमाणे महात्मा फुले कृषी विद्यापीठ यांचेकडून तसेच श्रीरामपूर दुध जिल्हा मध्यवर्ती सहकारी संघ यांचेकडूनही गाळयास मुदतवाढ मिळणेबाबत प्रस्ताव येत आहे. याबाबतचा विचार करता महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहूरी यांना तसेच प्रवरा फळे भाजीपाला उत्पादक व प्रक्रीया संघ यांना तसेच श्रीरामपूर दुध जिल्हा मध्यवर्ती सहकारी संघ बाभळेश्वर यांना त्यांचे वापरास लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर देण्यात आलेली गाळयाची मुदतवाढ ऑक्टोबर २००८ ते मार्च २००९ पावेतो देणेबाबत विचारार्थ सादर गाळा मुदतवाढ ६ महिण्यासाठीच असल्याने पुर्वीचेच अटी व शर्तीवर गाळा वापरास परवानगी देणेसाठी सादर उर्वरीत गाळा धारकांचे मुदतवाढी बाबत प्रस्ताव अलहीदा सादर केला असलेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषय पुढील व्यवस्थापन समितीचे सभेत फेर सादर करावा,असें ठरलें. (कार्यवाही-विधि अधिकारी)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. १२** **तिर्थक्षेत्र विकास कार्यक्रमाअंतर्गत शिर्डी नगरपंचायत हद्दीतील विकास कामासाठी आर्थिक रक्कम देणे बाबत**

**निर्णय क्र.८८६** शासनाने दि.१७ जानेवारी २००८ चे शुध्दीपत्रकाअन्वये एकूण रु.१,२०,३५,९३७/- किंमतीच्या आराखडयाला मान्यता दिली असून त्यानुसार शासन मंजुर रक्कमेच्या (५०%) रु.६०,१७,९६८/- इतकी रक्कम देणार आहे. नगरपंचायतीचा (२५ %) हिस्सा रु. ३०,०८,९८५/- व श्री साईबाबा संस्थानचा (२५ %) हिस्सा रुपये ३०,०८,९८४/- कळविला आहे.

त्यास अनुसरुन शिर्डी नगरपंचायतीने दि.२३/०६/२००८ चे पत्रान्वये, शिर्डी नगरपंचायत व श्री साईबाबा संस्थान अशी दोन्ही हिस्स्याची रक्कम रुपये ६०,१७,९६९/- व तांत्रीक मंजुरीनुसार जादा होणारा खर्च रुपये ७९,३२,१७०/- अशी एकूण रक्कम रुपये १,३९,५०,१३९/- (एक कोटी,एकोनचाळीस लाख, पन्नास हजार, एकशे एकोणचाळीस मात्र.) संस्थानकडुन अनुदान म्हणून नगरपंचायतीस मिळणेस विनंती केली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७/०७/२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६०४ अन्वये शासनाने मंजुर केलेला श्री साईबाबा संस्थानचा हिस्सा रुपये ३०,०८,९८४/- मात्र शिर्डी नगरपंचायतीस शासनाचे मान्यतेने अदा करणेस मान्यता दिलेली आहे.

त्यास अनुसरुन इकडील जा.नं.एसएसएस,वशी-३/१३९४०/२००८, दि.२२/०९/२००८ चे पत्रान्वये मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई यांचे मान्यतेसाठी पत्र पाठविलेले आहे.

तथापी शिर्डी नगरपंचायतीने दि.१३/०८/२००८ चे पत्रान्वये, श्री साईबाबा संस्थानने व्यवस्थापन समितीचे सभेत त्यांचा हिस्सा रुपये ३०,०८,९८४/- इतका मंजुर केलेला आहे. शिर्डी नगरपंचायतीस त्यांचा हिस्सा रु. ३०,०८,९८५/- व तांत्रीक मंजुरीनुसार जादा होणारा खर्च रुपये ७९,३२,१७०/- अशी एकूण रक्कम रुपये १,०९,४१,१५५/- शिर्डी नगरपंचायतीच्या फंडातुन करणे शक्य नाही. तरी आपणांस पुन्हा विनंती करण्यात येत आहे की, रक्कम रुपये १,०९,४१,१५५/- संस्थानकडुन उपलब्ध करुन देणेत यावी असे कळविले असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम २१ (२) (एक) छाननी समितीच्या शिफारसीनुसार राज्य शासनाचे मान्यतेने अनुदान देण्याची तरतुद आहे, याकामी मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व मा.श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे यांनी शिर्डीतील रस्त्यांची पहाणी करुन आर्थिक अनुदान देणेबाबत सुचवावे असे ठरले.(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०६)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. १३** **चिक्कू झाडांची खोतीस कार्योत्तर मंजूरी देणेबाबत.**

**निर्णय क्र८८७** संस्थानचे मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१२४ मधील चिक्कू झाडांची फळे जुलै- २००८ ते जून-२००९ या कालावधीसाठी खोती देणेसाठी बागवान यांच्याकडून जा.नं. एसएसएस/ वशी-बगीचा/ १०११६/ २००८ दि.०९.०७.२००८ कोटेशन मागविण्यात आले होते.

प्राप्त झालेल्या कोटेशनचा दि.२७.०९.२००८ रोजी मा.प्रशासकिय अधिकारी सो. यांचे समक्ष उघडण्यात आले त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | कोटेशनधारकांचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| ०१ | अन्सार आयाज पठाण, शिर्डी | रु.६१,०००/- |
| ०२ | माजाब दिलनवाज पठाण, शिर्डी | रु.५५,०००/- |
| ०३ | शब्बीर भिकन सय्यद, शिर्डी | रु.५०,०००/- |
| ०४ | बब्बु रफिक पठाण, शिर्डी | रु.६५,०००/- |
| ०५ | शप्पुखॉं सखरखॉं पठाण | रु.४२,०००/- |

त्यामध्ये अ.नं.४ बब्बु पठाण, शिर्डी यांनी सर्वात जास्त म्हणजे रु.६५,०००/- रकमेचे कोटेशन दिले आहे. गत वर्षी सदरचा बाग फळासाठी रु.७१,०००/- रकमेस एक वर्षासाठी खोती दिली होती. गत वर्षीच्या प्रमाणात चालु वर्षी झाडांना फळे कमी आहेत. तथापी, काही रक्कम वाढवुन मिळावी यासाठी श्री.पठाण यांना दि.०४.१०.२००८ रोजी समक्ष चर्चेसाठी मा.प्रशासकीय अधिकारी यांचे कार्यालयात बोलविण्यात आले होते. श्री पठाण यांच्या समवेत झालेल्या चर्चेत त्यांनी रु.६५,०००/- ऐवजी रु.७१,०००/- ला खोती घेण्याचे मान्य केले आहे. तसा लेखी अर्ज सादर केला आहे.

तरी बागवान श्री.पठाण यांना रु.७१,०००/- मात्र रकमेस एक वर्षासाठी सर्व्हे नं.१२४ मधील झाडे खोती देण्यात आलेली असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. याचवेळी येथूनपूढे अशाप्रकारे व्यवस्थापन समितीचे मान्यतेशिवाय चिक्कू झाडांची खोती देऊ नये असे प्रशासनास सांगण्यात आले. (कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. १४** **मा.विश्वस्तांचे सुचनेबाबत.**
**निर्णय क्र८८८** मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-

(०१) भक्तनिवासस्थान येथे साईभक्तांचे सोयीसाठी प्रसादलाडू विक्री काऊंटर सुरु करण्यात यावे.
(कार्यवाही-कॅन्टीन विभाग प्रमुख)

(०२) श्रीसाईबाबा हॉस्पिटमध्ये हृदय शस्त्रक्रिया करण्यात येतात रुग्णांकडून सर्व पैसे वसूल केले जातात व नंतर त्यास विविध संस्थांकडून अनुदान प्राप्त होते. असे अनुदान रुग्णांना सात दिवसांचे आत संस्थान खर्च वजा जाता रुग्णांस आदा करण्यात यावे. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

(०३) दिनांक २४ नोव्हेंबर,२००८ रोजी संस्थानचे नविन प्रसादालय येथे पेरु परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमाचे उद्‌घाटन मा.खा.श्री शरद पवार,कृषी मंत्री, भारत सरकार यांचे शुभहस्ते संपन्न होणार आहे. तरी नॅशनल गवा सिम्पोझियम, साकुरी यांनी नवीन प्रसादालय येथे पेरु परिषदेचे आयोजन करण्यास परवानगी देण्यात यावी. तसेच या कार्यक्रमासाठी संस्थानतर्फे स्टेज, खुर्च्या, सोफे, जेवणाकरीता मंडप व इतर अनुषंगिक व्यवस्था करण्यात यावी. याकामी येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय/प्रशासन शाखा,वशी-०५/बांधकाम विभागप्रमुख)

(०४) व्यवस्थापन समितीचे मा.अध्यक्ष,मा.उपाध्यक्ष, मा.सदस्य व मा.जिल्हाधिकारी यांनी दि.२.६.२००८ ते दि.५.६.२००८ या कालावधीत तिरुपती देवस्थानला भेट देऊन तेथील नियोजन व उपाययोजना आदिंची पहाणी करुन आपला अहवाल आजचे सभेत सर्व सदस्यांना पुरविणेत आला होता. या अहवालावर चर्चा करुन निर्णय घेणेकामी सभा पुढील आठवड्यात बोलविण्यात यावी. (कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी)

(०५) तिरुपती देवास्थान यांना संस्थानमार्फत निवासस्थान बांधकामासाठी जागा देणेबाबत सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे पूढील सभेपुढे ठेवण्यात यावा. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

(०६) संस्थान रुग्णालयामार्फत अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगांव,राहाता,नेवासा,श्रीरामपूर या तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी बेसिक हेल्थ चेकअप पॅकेज सुरु करण्यात यावे याकामी रुपये ६००/- एकत्रित आकारण्यात यावे. (वैद्यकीय संचालक)

वरील निर्णय क्र ८१८ ते ८८८ सर्वानुमते घेण्यात आले आहेत.

यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

(किशोर रा.मोरे)
कार्यकारी अधिकारी
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

(जयंत मुरलीधर ससाणे )
अध्यक्ष
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)